
# महाभारत

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे

खंड ३९

शांतीपर्व



# महाभारत

## महाभारत खंड एकोणचाळीसावा

## शांती पर्व भाग चौथा

## अपधर्मानुशासन पर्व अथवा आपद्धर्म विचार

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235 0.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## प्रकाशन : १० एप्रिल २०२१

## अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल.

आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा एकोणचाळीसावा खंड, शांती पर्व भाग चौथा, अधर्मानुशासन अथवा आपद्धर्म विचार आपण आता वाचणार अहात. ह्या खंडात आपद्धर्म म्हणजे पापातून पुण्य साधण्याचा विचार समजावून सांगण्याचा प्रयत्न भिष्म करत आहेत.
शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुप कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू

समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत

त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in
ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

## - शांती पर्व भाग चौथा-

## अपधर्मानुशासन पर्व सुरू

## भाग एकशे तिसावा

युधिष्ठीर विचारतो, "त्याशिवाय आणखीन काय तो राजा करू शकतो जो कमजोरीमुळे हवालदिल झाला आहे व त्याला त्याच्या सहकर्यांचा मृत्यू नको म्हूणून युद्ध करणे टाळावयाचे आहे. तशा कारणाने तो सतत भयाच्या सावलीत वावरत आहे. त्याच्या मंत्र्याचे पटत नाही एकमेकांत, त्यांमुळे त्याच्या कारवाया गुप्त रहात नाहीत. तसेंच ज्या राजाचे राज्य कांही भाग शत्रूने गिळंकृत केले आहे. त्यामुळे त्याची संपत्तीसुद्धा कमी झाली आहे. तो त्याच्या अशा हालाखीच्या परिस्थितीत तो काय करू शकतो"?

भिष्म सांगतात, जर चालून येणारा राजा सात्त्विक प्रवृत्तीचा असेल तर त्याला समजावून घेणे शक्य असते कारण असा राजा त्याच्या निजी स्वार्थासाठी चालून येत नसतो तर ब्रह्माच्या सेवेचा भाग म्हणून तो त्या असमर्थ राजाचे राज्य ताब्यात घेऊन तेथे सुराज्य आणण्याच्या इराद्याने येत असतो. जर असे असेल तर त्या राजाशी बोलणी करून व त्याच्या मदतीने तो अडचणीत असलेला राजा त्याचे प्रश्न निकालात काढू शकतो. पण जर तो चालून येणारा राजा रजोगुणी अथवा तमोगुणी असेल तर मात्र आपद्धर्माच्या विविध युक्त्यांचे प्रयोग त्या राजाला करावे लागतील. जर कांहींच करणे अशक्य असेल तर मात्र तो अभागी राजा त्याच्या अगदी जवळच्या व निष्ठावंतांच्या मदतीने ते राज्य सोडून परागंदा होईल त्यातच त्याचे भले असेल. राजा त्याच्या स्त्रीवर्गाचे संरक्षण करण्यासाठी जीवाची बाजी लावेल कारण तसे करण्याने जरी तो मृत्यू मुखी पडला तरी खात्रीने स्वर्गात जात असतो. सज्जन स्त्रियांचे संरक्षण करण्यासारखे मोठे पुण्यकर्म नाही. राजा स्वताला कधी शत्रूच्या हवाली करणार नाही त्यापेक्षा तो मृत्यू पत्करेल.

युधिष्ठीर विचारतो, "ज्या राजाचे सगळे त्याच्या विरुद्ध गेले आहेत अशाने काय करावे"?

भिष्म सांगतात, अशा परिस्थितीत तो राजा त्या शत्रूशी समझौता करण्याचा प्रयत्न करील. शत्रू वाईट असेल तर मात्र राजा त्याच्या सगळ्या शक्तीनिशी लढेल. सरळ युद्ध करणे नेहमी सोपे नसते त्यावेळी गनिमीकावा व तशा युक्त्या वापरून शत्रुला सतावण्याचे काम त्याचे सैनिक करतील. जसे वाघाला मारणारा योद्धा डांसांना शरण जातो तसे ते असेल. प्रत्यक्ष युद्धापेक्षा सतावणूकीची युद्धनिती तो अजमावेल. कारण ती कमी खर्चाचीसुद्धा असते. त्यासाठी राजा नेहमी असा वागेल कीं, त्याचे खालच्या थरातून सैनिक त्याला फार मानतील. कारण अशा परिस्थितीत तेंच उपयोगाचे असतात. असे सामान्य सैनिक राजाला जास्त उपयोगाचे असतात. ते जास्त प्रामाणिक असतात. तशा वेळी राजा लढतांना मेला तर त्याच्या मृत्यूमुळे राज्यात क्रांती होऊन जिंकणार्या राजाचा पराभव झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. असा राजा इंद्राबरोबर जाऊन बसतो.

शांती पर्व भाग एकशे तिसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे एकतिसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, पुण्यकर्मात असलेला ब्राह्मण चोराच्या तावडीत सापडला तर त्याचे पवित्र कार्य नष्ट होते. तसा ब्राह्मण जो त्याच्या मुलाबाळांत रमला आहे त्याने कसे जगावे.

भिष्म बोलतात, अशावेळी ब्राह्मणाच्या ज्ञानानी त्याचे संरक्षण करावयाचे असते. कोणताही चोर त्याचे ज्ञान चोरू शकत नाही. त्यामुळे खरे पहाता खरा ब्राह्मण कधींच असुरक्षित नसतो. त्याच्या साधनांचे व सामुग्रीचे तो संरक्षण करत असतो. ब्राह्मणांनी त्यांच्या संरक्षणासाठी कित्येक देवता विशिष्ट प्रकारच्या साधना करून प्रसंन्न केलेल्या असतात. त्या देवता विशेष करून पिशाच्च देवता, यक्ष देवता, यक्षिणी ह्यांचा तो उपयोग करून त्याचे व त्याच्या परिवाराचे संरक्षण करत असतो. ते ब्राह्मण मात्र चोराच्या त्रासाने व्यथीत होतात जे ज्ञानी झालेले नाहीत. राजाच्या दृष्टीने सगळे जे चांगले आहे ते राज्यातील चांगल्या लोकांसाठी असते. वाईट लोकांसाठी राजा कांहीं करण्यास बांधलेला नाही. स्वबळावर जगणारे नेहमी त्यांच्या क्षमतेचाच उपयोग करत असतात. धन मिळवण्यासाठी राजा सगळ्या प्रजेला लुटू शकतो परंतु, तो ऋग्द्विजांना व पुरोहितांना हात लावणार नाही. तसेंच शिक्षणाचे काम करणारे व साधना करणारे ब्राह्मण ह्यांना सुद्धा त्रास देणार नाही. वेदातील शिकवणी प्रमाणे त्यांना त्रास देणे पाप कर्म ठरते. आपत्काळी राजासुद्धा वाईट ठरत असतो कारण त्याच्या सुद्धा एक मनुष्य म्हणून मर्यादा असतात. मनुष्याचे दोन दोष मत्सर आणि गर्व (मद) त्याला इतरांशी लढण्यास कारणीभूत करत असतात त्यामुळे वस्तीत कांहीं ना कांहीं वाद विकार चालूच असतात. त्याचा फायदा वाईट लोक घेत असतात. राजाने कोणाची स्तुती केली तर ते इतरांना खटकते. राजाला समजत नाही कसे करावयाचे. सगळ्यांना संतूष्ट ठेवणे ह्या दोन दोषांमुळे सोपे रहात नाही. ते असे वाद असतात ज्याला इलाज नसतो अशावेळी

राजाला चाबूक काढावा लागतो. तो काम करतो कारण त्या सगळ्या वाद घालणार्यांना माहित असते कीं, त्यांचे वाद खर्यावर नसतात तर त्यांच्या विकृतीच्या कारणाने असतात. कधी रागावून, कधी गोड समजावणीच्या भाषेत असे खुबीने राजा त्या सगळ्यांना धरून ठेवतो. राजाचे गुण जर उत्तम असतील तर सगळे त्याचे मानत असतात. म्हणून राजाचे चारित्र्य त्याची शक्ती असते. ज्या राजाचे चारित्र्य उत्तम तो प्रजेतील लहान मोठे वाद सहज मिटवत असतो.

राज्यावरील संकटाची कल्पना जनतेला असते त्यावेळी ब्राह्मण जर खरे असतील तर स्वतःहून राजासाठी त्यांचे खजिने उघडतात. असे झाले तर राजाला जबरदस्ती करावी लागत नाही. परिस्थिती सुधारली कीं, राजा त्यांचे धन त्यांना परत करतो. ब्राह्मणांची गंगाजळ राज्यासाठी महत्वाचा ठेवा ठरतो. त्यामुळे ब्राह्मणांचे स्थान राज्यात उंच होते. तसेंच श्रीमंत वैश्य आणि क्षत्रियसुद्धा राजाला आर्थिक मदत करत असतात. गुण्या गोविंदाने रहाणारे लोक सुसंस्कृत समजले जातात. ते राज्य समृद्ध होते. समृद्धीच्या काळी ब्राह्मणांना व पुरोहिताना कर लावू नये. कारण असे समजतात कीं, त्यांच्या पुण्यईमुळे राजावर संकट येत नाहीत. तसेंच कांही वेळा ऋषीमुनीसुद्धा राज्याच्या भल्यासाठी राजा लुटू शकतो. परंतु, राजा त्याच्या खाजगी मतलबासाठी तसे करू शकत नाही. तसा राजा नरकात जातो. परंतु, त्या करता तसे ब्राह्मण व पुरोहत चार गोष्टी करत असले पाहिजेत. त्या अशा, वेदाचा अभ्यास करणे, स्मृतीचा अभ्यास करणे, परंपरा जपणे आणि राजाला मदत करणे. प्राचीन ऋषी तसे करत होते.

शांती पर्व भाग एकशे एकतिसावा संपला.

## शांती पर्व

## भाग एकशे बत्तीसावा

भिष्म पुढे सांगतात, राजा त्याच्या व त्याच्या शत्रूच्या साधनांने त्याचा खजिना भरत असेल. त्यात कांहींच दोष नसतो. कारण ते तो इतरांच्या सुखासाठी करत असतो. खजिना समृद्ध ठेवण्यासाठी राजा काटकसर करत असेल विनाकारणच्या खर्चामध्ये. खर्च नियंत्रण करणे म्हणजे खजिना भरण्यासारखेच असते. राजाचे मंत्रीसुद्धा त्यात सहकर्य करतील. हि फार प्राचीन काळापासूनची प्रथा आहे. केवळ चांगले वागून कधी खजिना भरला जात नाही. त्यासाठी चोर, लुटारू, भ्रष्ट ब्राह्मण, भ्रष्ट क्षत्रिय आणि भ्रष्ट वैश्यांना धरावे लागते. शुद्राना त्रास न देता राजा त्याचे खजिना भरावयाचे कार्य साध्य करत असेल. राजा अशावेळी लुटारु झालेला असतो. खजिना भरलेला असेल तरच राजा शक्तीमान समजला जातो. म्हणून वाट्टेल ते करून कांहीं राजे त्यांचा खजिना भरत असतात. ते सगळे पुण्य मार्ग नसतात. त्यामुळे राजाला पाप लागत असते. गरीब राजाला त्याची जनतासुद्धा मानत नसते. श्रीमंतीच्या प्रभावाने तो आपले दोष झाकू शकतो. जसे झग्याने बायका त्यांचे शरीर झाकत असतात. राजाचे द्वेषी जे त्याचे प्रजाजन आहेत ते त्याची समृद्धी पाहून चडफडतात. जसे दुर्योधन तुम्हा पंडूपुत्रांवर चडफडत होता.

समृद्ध राजाचे वैभव पाहून त्याचा द्वेष करणारे राजे नाराज होतात. ते त्यांचा द्वेष दाखवत नाहीत. ते त्याची मदत करण्याचे सोंग घेऊन रहातात आणि संधी मिळताच त्याच्या नाशाच्या कारवाया सुरू करतात. ते सगळे दुर्लक्ष करणारा राजा मूर्ख असतो. समृद्ध राजा त्याच्या रूबाबात राहीला पाहिजे. अशा संधिसाधूंवर लक्ष ठेवण्याचे काम राजाचे खरे इमानदार लोक करत असतील. त्यांच्या मदतीने त्या द्वेषी लोकांचा काटा राजा काढेल.

प्राचीन काळी लुटारू असलेले कांहीं चोर त्यांच्यात सद्भावना जागृत झाल्यामुळे पुढे राजे बनतात. म्हणून राजा हा एकाप्रकारे चोरच असतो. राजाचा चोर व चोराचा राजा कसे होतात त्याचा इतिहास मोठा विलक्षण आहे युधिष्ठीरा. म्हणून जेव्हां राजा चोर होतो तेव्हां सगळे सज्जन लोक घाबरून जातात. परंतु, जो राजा त्याच्या मर्यादा सांभाळून त्याचे काम करतो त्यास मोठे चोरसुद्धा त्यामुळेंच घाबरत असतात. राजा जनतेचे चोरांपासून संरक्षण करत आहे ह्याची वार्ता सगळीकडे पसरवणे राजासाठी चांगले असते. चोर का झाला एकादा क्षत्रिय ह्याचा शोध राजाला घ्यावयाचा असतो. देव न मानणारे सुद्धा राजाला मानतात जर तो त्यांना संरक्षण देत असेल. जे लुटारू रानात रहातात व फक्त धनाची लुटमार करतात पण कोणाला ठार मारत नाहीत आणि छळ करत नाहीत, त्यांना पाप लागत नाही. पोटासाठी धनाची चोरी ब्रह्माच्या नियमानुसार क्षम्य आहे. अशापैकीच कोण्या लुटारूंमधूनच पहिला राजा तयार झाला आहे. कारण राजाचे मूळ चोरीतच असते. जो स्वतः निर्धन आहे त्याच्याकडे चोरी करणे, त्रास देणे, ब्राह्मणा कडे चोरी करणे हे पापकारक समजले जाते. युद्धातून पाठ दाखवून पळून जाणे, बायकांचा उपमर्द करणे, लहान मुलांना त्रास देणे अशी पापं चोरांसाठी सांगितली आहेत. जो राजा समाजाच्या स्वास्थ्यासाठी दरोडेखारांशी समझौता करतो तो शहाणा समजला जातो. राज्यातील चोर हे एक शक्तीस्थान असते. त्याचा उपयोग राजा चतुराईने करू शकतो. म्हणून चोरांशी समझौता करणे व त्याला दुसऱ्याच्या राज्यात चोरी करण्यास उद्युक्त करणे व स्वताच्या राज्यात आश्रय देणे अशी धोरणं शहाणा राजा अवलंबून त्याच्या प्रजेचे जीवन स्वस्थ करत असतो. चोरात भ्रष्ट क्षत्रिय तो पाहिल व त्याप्रमाणे त्याना प्रसंगी उपयोगात आणेल. चोरांच्या मदतीने राजा शेजारच्या राज्यात मोठे दरोडे घालून त्याच्या खजिन्यात भर करेल.

शांती पर्व भाग एकशे बत्तिसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे तेहतिसावा

भिष्म सांगतात, आपल्या संहितेत ह्याबद्दल काय सांगितले आहे ते सांगतो. बुद्धिमान क्षत्रियाला पुण्य कमावणे आणि संपत्ती मिळवणे हे त्याचे कर्तव्य असते असे सांगितले आहे. त्या कामात त्याला अडवणार्यांना तो अद्दल घडविल्याशिवाय रहाणार नाही. ते करतांना तो ते कार्य (अद्दल घडवण्याचे) पुण्यकारक आहे कां पापकारक आहे त्याची चर्चा करणार नाही. अशा आज्ञा त्यात आहेत. जो ते करण्यात दिरंगाई करतो तो पुढे जात नाही. त्याचे कारण, क्षत्रिय एरव्ही सतत चांगले काम करून पुण्य मिळवत असला पाहिजे त्यामुळे त्याला देवांचे संरक्षण मिळत असते. अशा परिस्थितीत चांगल्या वाईटाचा जास्त विचार करावयाचा नसतो, काम करत रहावयाचे असते. पाप पुण्यासाठी फाजिल चौकस असणे शहाणनपणाचे समजले जात नाही. कोणतेही काम पुर्णतया पुण्याचे अथवा पापाचे असे नसते. त्या दोघांच्या मिश्रणानेच सगळी ऐहिक कार्ये होत असतात. भल्याबुर्या मार्गाने तो (क्षत्रिय) प्रथम सामर्थ्य प्राप्त करेल. त्यानंतर तो यज्ञ इत्यादि चांगली कामं, (विविध प्रकारची दानं करणे, मदत करणे, सेवा करणे) करून तो त्या पापाचे विराकरण करत असतो. त्याचे कारण त्याने जे ते काम करत असतांना पापं केली असतील ती त्याने मुद्दाम ठरवून केलेली नसल्याने त्यांचे पाप फळ सुद्धा तेवढे घातक नसते. ऐहिक जीवनात पुण्यापेक्षा श्रीमंती जास्त ताकदवान असते. कारण श्रीमंतीचे परिणाम ताबडतोब असतात त्या उलट पुण्याचे परिणाम सावकाशपणे बहुधा पुढच्या जन्मी व्यक्त होत असतात ज्याचा त्याला ताबडतोब उपयोग नसतो. सामर्थ्य ज्याच्या कडे असते तो नेहमी खरा ठरत असतो. म्हणून व्यावहारिक जगात सामर्थ्य जास्त महत्वाचे असते. राजा त्याच जगात त्याची सत्ता गाजवत असतो म्हणून त्याला ते नियम लागू होतात. सामर्थ्यवानाला सगळे मानतात व

त्याच्या चुकांकडे दुर्लक्ष करतात. असामर्थवानाला मात्र त्याने न केलेल्या गोष्टींसाठी जबाबदार ठरवून सजा केली जाते. अशी हि दुनियेची रित आहे.
सूज्ञ सांगतात कीं, पापाच्या क्षालनासाठी त्यांने वेदांचे वाचन केले पाहिजे. त्याने ब्राह्मणाची केला केली पाहिजे. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्यांचे पालन केले पाहिजे, असे केले कीं, त्याच्या पापाची त्यास चिंता करण्याचे कारण रहात नाही. ज्या राजाने त्याच्या कारभाराच्या दरम्यान अनेक पाप केली असतील तो इतर काय बोलतात त्याचा विचार न करता त्याचे पापक्षालनाचे काम करत राहिल. तो करत असलेला त्याच्या ह्या क्षम्य पापांपासून त्यामुळे मुक्त होत असतो. त्याच्या अशा व्रतस्थ जीवनामुळे त्याची जगात वहाव्वा होत असते. त्याची प्रतिष्ठा वाढलेली असते. समाजातील लोक त्याची पापं विसरतात व फक्त त्याचे चांगले कार्य आठवतात. त्यामुळे देवतासुद्धा त्याला माफ करतात असे समजले जाते.
शांती पर्व भाग एकशे तेहतिसावा संपला.

## शांती पर्व
## भाग एकशे चौतिसावा

भिष्म सांगतात, ह्या संदर्भात मी एक प्राचीन कथा सांगतो त्याप्रमाणे एक चोर पुण्यवंत म्हणून पुढे गेला. त्या चोराचे नांव होते, कयव्या. तो क्षत्रिय कुळातील होता. तो क्षत्रिय कर्माचे पालन करणारा होता. त्याच्यात शौर्य होते व बुद्धीमत्ता सुद्धा होती. त्याचा वेदाचा अभ्यास सुद्धा होता. त्याच्यात क्रौर्य नव्हते, तो ब्राह्मणांबाबत (विद्वानांबद्दल) सहिष्णू होता. वडीलधार्यांबद्दल आदर बाळगणारा होता. तो त्याच्या अरण्यातील बैराग्यांचे हिंस्त्र श्वापदांपासून संरक्षण करत असे. तरी उपजिवीकेसाठी तो चोर्या करत असें. चोर्या करत असूनही त्याला स्वर्गात जागा मिळाली होती. सकाळी व संध्याकाळी तो हरणांचा पाठलाग करत असे. तो भिल्लाचे सगळे रितीरीवाज जाणत होता. त्याचा संचार त्या भागातील पहाडांवर सतत होता. त्याचा तेथील प्राण्यांच्या स्वभावाचा अभ्यास इतका चांगला होता कीं, त्याचे बाणाचे नेम कधी चुकत नव्हते. त्या भागात येणार्या इतर शत्रूंचा तो पराभव करून त्यांना मागे पाठवत असें. मोठ्या प्रेमाने तो त्याच्या वृद्ध, अंध आणि बहिर्या माता पित्यांना सांभाळत असे. त्याच्याकडे येणार्या अतिथीचे तो मोठ्या प्रेमांने स्वागत करत असे व त्यांचा पाहूणचार मध, मांसाहार, फळं आणि कंदमुळं ह्यांने करत असे. तो बरेच चांगले काम सुद्धा करत असे. त्याच्या भागातील ब्राह्मणांचे तो सन्मानाने स्वागत करत असे. त्या अरण्यात हरणांची संख्या मोठी होती व ती सारखी वाढत असे. तो त्या हरणांची शिकार करत असे. त्याचे वळण पाहून अनेक दरोडेखोर त्याला त्याचा राजा समजत होते व त्याचा सल्ला घेत होते. ते त्याला बोलत कीं, तो चांगले काय व वाईट काय हे चांगले समजतो म्हणून ते त्याचे ऐकत असतात. त्याच्या सांगण्याचे ते आदर करत असतं. तो जसे सांगेल तसे ते करत होते. ते त्याला त्यांचा माता व पिता मानत असतं. तो त्यांना सांगे, कधी कोण्या बाईस मारू नका. जो मारामारी करू शकत नाही त्याला मारू

नका. लहान मुलांना मारू नका, जे बैरागी आहेत त्यांना मारू नका. जे शांतपण रहात आहेत त्यांना मारू नका त्रास देऊ नका. ब्राह्मणांचे संरक्षण करा असे तो सांगत असे. कोणाचे लग्न होत असेल तर त्यात लुटमार करू नका. देवळे, पितरांच्या जागा व जोग्यांचे मठ ह्यांना नुकसान करू नका. सज्जनांचे नुकसान करू नका. असे जर तुम्ही करत असाल तर तुम्ही तुमच्या शिकारीत यशस्वी व्हाल. न्यायदंड गुन्हेगारांसाठी असतो तुम्ही जर मी सांगतो तसे करत असाल तर तुम्ही गुन्हेगार ठरणार नाही व तो न्यायाचा चाबूक तुम्हाला लागणार नाही. बुर्या मार्गाने जे संपत्ती जमा करतात ते मेल्यावर अळ्या, किडे बनून मृत शरीरात राहू लागतात. परंतु, जे त्याच्या सांगण्या प्रमाणे वागतील ते कायम सुखी होतील.

भिष्म पुढे सांगतात, त्याच्या भोवती जमलेले सगळे लुटारू त्याचे ऐकत होते. त्यामुळे ते पाप करत नव्हते व त्यामुळे त्यांचा उद्धार होत होता. त्याच्या भिल्ल शिकार्याना त्यांने योग्य मार्गदर्शन दिल्याने त्याचे कल्याण होते व तो स्वर्गात जातो.

शांती पर्व भाग एकशे चौतिसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे पस्तीसावा

भिष्म पुढे सांगतात, त्याप्रमाणे राजा त्याचा खजिना कसा भरेल त्याबद्दल एक कवन ब्रह्मदेव गातात ते तुला सांगतो, त्यात ते सांगतात कीं, जे यज्ञात दान केले, जे देवांना दिले ते कधी काढून घेऊ नये. जो कधी चांगले काम करत नाही, जो दुसर्यांना लुबाडतो, जो दुसर्यांना फसवतो त्यांची संपत्ती राजाने काढून घेऊन त्या संपत्तीच्या मदतीने तो राजा त्याच्या प्रजेची सेवा करील. ह्या जगातील सगळे प्राणी, जे उपभोग्य आहे, ते सगळे क्षत्रियांचे असते. सगळी संपत्ती क्षत्रियांची असते. सगळी पृथ्वी क्षत्रियांची असते. क्षत्रियांचे कार्य त्या प्राण्यांचे संरक्षण करणे व सगळ्या चांगुलपणाचे संरक्षण करणे असे असते व त्या कामासाठी ब्रह्माने ती संपत्ती त्यांना सांभाळावयाला व वापरावयाला दिली आहे. क्षत्रिय त्याचा उपयोग करून देवांसाठी यज्ञ करेल. ज्या वनस्पती मेल्या आहेत त्या काढून त्यांचा उपयोग अग्नी चेतवण्यासाठी करेल. त्यावर तो त्याचे खाद्य शिजवेल. जो क्षत्रिय त्याच्या धनाने देव, पितर आणि प्राणी ह्यांचे भले करत नाही त्याची संपत्ती व्यर्थ आहे. त्यासाठी राजा ती संपत्ती त्या क्षत्रियाकडून काढून घेईल व त्याचा चांगला विनियोग करील. त्यामुळे सगळ्यांचे भले होईल. जर राजासुद्धा तसा त्याच्या संपत्तीचा योग्य विनियोग करत नसेल तर त्याला सुद्धा कोणी चांगला दुसरा क्षत्रिय लुटू शकतो. ते नितीशास्त्रानुसार योग्य होईल. जसे वनस्पती वाढत असते त्याप्रमाणे चांगला राजा त्याचे राज्य वाढवत असेल व जास्तीत जास्त जनांना त्याच्या चांगल्या कारभाराने सुखी करत असेल तर तो राजा इंद्राला मिळतो त्यासारखं पुण्य कर्म नाही. जे लोक चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या तीन तत्त्वांचे पालन करणार नाहीत त्यांना राज्यातून हाकलून द्यावे. म्हणजे ते अरण्यात पशूंचे खाद्य होतील. त्यांच्यासाठी तेंच योग्य असेल. नितीशस्त्राचे नियम फार सुक्ष्म आहेत. ते समजण्यासाठी तसेंच शहाणपण असले पाहिजे.

शांती पर्व भाग एकशे पस्तीसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे छत्तीसावा

भिष्म पुढे सांगतात, ज्याच्या कडे धन आहे व ज्याच्याकडे प्रसंगावधान सुद्धा आहे असा सुखी होतो. जो त्याच्या जबाबदार्या टाळतो त्याचे काय होते ते एका कथेने तुला सांगतो.

एका तलावात तीन मासे रहात होते, शकूल जातीचे ते होते. त्यातील एक दूरदृष्टीने त्याच्या कामांचे नियोजन करत असे. दुसरा चांगलाच प्रसंगावधानी होता. तिसरा आळशी होता, तो गोष्टी लांबणीवर टाकत असे. एकदा काहीं कोळी तेथे मासे पकडण्यासाठी आले होते. ते त्या तलावातील पाणी उपसून काढू लागतात म्हणजे कमी झालेल्या पाण्यात मासे पकडणे सोपे होईल. त्यामुळे त्या तलावाचे पाणी कमी होऊ लागते. दूरदृष्टी असलेला मासा बोलतो आपल्यावर मोठे संकट आले आहे, ते पाणी काढत आहेत आपल्या भागातील पाणी लवकरच कमी होईल त्या आधी आपण येथून निघून दुसर्या भागात जाऊ. जे पुढच्या संकटाला ओळखतात त्यांना कमी त्रास होतो. तो सगळ्यांना सांगतो चला आपण येथून जाऊ. परंतु, तिसरा मासा जो गोष्टी टाळत असे तो बोलतो, एवढी काय घाई झाली आहे, ते थाबतील पाणी काढण्याचे. दुसरा मासा जो प्रसंगावधानी होता तो बोलतो,

मी येणार्या प्रसंगाला तोंड देण्यास सदैव तयार असतो. पहिला दूरदृष्टी असलेला समजतो कीं, ते ऐकणार नाहीत तेव्हां त्यांच्यासाठी न थांबता तो तात्काळ दुसर्या सखल भागाकडे निघून जातो. तेवढ्यात कोळी समजतात कीं, पुरेसे पाणी काढले आहे तेव्हां आता मासे पकडावयाला हरकत नाही. त्यात टाळा टाळ करणारा मांसा सापडतो. कोळी पकडलेले मासे एका दोर्यात बांधत असतांना प्रसंगावधानी मांसा त्या बांधलेल्या माशात स्वताला लपवून ठेवतो. तो दोरा त्याच्या तोंडात पकडून ठेवतो. कोळ्यांना ते समजत नाही. ते समजतात कीं, त्यांनी सगळे मांसे पकडले आहेत व दोर्यामध्ये बांधले आहेत. त्यानंतर तो कोळी त्या पकडलेल्या माशांना एका सखोल भागात नेतात

धुण्यासाठी. तेथे तो प्रसंगावधानी मासा त्या पाण्यात पळून जातो. टाळाटाळ करणारा आळशी मासा मरतो. अशारितीने तो दूरदृष्टी असलेल्या माशांचे न ऐकल्यामुळे व प्रसंगावधानीची नक्कल न केल्यामुळे मरतो. म्हणून असे सांगतात कीं, जर स्वताला समजत नसेल तर निदान दुसर्यांचे ऐकण्याची तयारी असावी म्हणजे कठीण प्रसंगी स्वताचे सरक्षण करू शकतो. ऋषी सांगतात कीं, ज्याच्यात दूरदृष्टी आहे व प्रसंगावधान आहे ते परिस्थितीवर मात करू शकतात. ते यशस्वी होतात.

शांती पर्व भाग एकशे छत्तिसावा संपला.

## शांती पर्व

## भाग एकशे सदोतिसावा

युधिष्ठीर विचारतो. "ज्या बुद्धीने भविष्य सुधारू शकतो ती सर्वश्रेष्ठ असते. त्याच प्रमाणे दिरंगाई करणे हे नाशाला बोलावा सांगण्यासारखे असते. त्यावरून माझा प्रश्न असा आहे कीं, उत्तम बुद्धिमत्ता असलेला राजा ज्याचे नितिशास्त्राचे ज्ञान चांगले आहे, तो अनेक शत्रूंनी वेढल्यानंतर सुद्धा घाबरणार नाही. तो तशा परिस्थितीत काय करू शकतो त्याबद्दल मी तुमच्याकडून ऐकू इच्छितो. राजाच्या आपत्काळी त्याचे छुपे दुष्मन जुने वैर आठवून त्याचा सूड घेण्यासाठी त्याच्या नाशाच्या योजना आखत असतात. अशा परिस्थितीत तो राजा स्वताला कसा सावरून ते आव्हान घेईल? त्या परिस्थितीत तो राजा नवे मित्र कसे जमवण्यात यशस्वी होऊ शकतो? त्या काळात तो राजा त्याच्या शत्रू व मित्रांना कसे सांभाळू शकेल? राजाच्या कारकिर्दीत असा प्रसंग मोठा आव्हानात्मक असतो. अशा बिकट काळात राजा काय करू शकतो ते फक्त शंतनूचा मुलगाच सांगू शकतो कारण त्याचा अनुभव मोठा आहे. त्याचे नैतिकतेचे ज्ञान पूर्ण आहे. म्हणून तुम्हीच त्यावर बोलावे असे मला वाटते".

भिष्म सांगतो, अरे युधिष्ठीरा, तू हा चांगला प्रश्न विचारला आहेस. त्याचे उत्तर मी तुला आनंदाने सांगणार आहे. ज्या गोष्टी राजाने तशा आपत्काळी करावयाच्या त्या सांगतो. गरजेनुसार माणसें मित्र आणि दुष्मन होत असतात. कोणी कायम मित्र अथवा शत्रू नसतात राजकारणात हे प्रथम लक्षात घे. ते समजून त्यानुसार काय करावयाचे ते सांगतो, जर राजाची तयारी असेल तर तो युद्ध करून शत्रूला त्याची जागा दाखवू शकतो. कधी पडते घेऊन तर कधी उदारता दाखवत तो शत्रूशी मैत्रीसुद्धा करू शकतो जर त्याची युद्धाची तयारी नसेल. ते करतांना कमीपणा वाटण्याचे कारण नसते कारण, तो एक डावपेंच असतो. कांहीं तज्ज्ञ त्याला "यशस्वी माघार", असे म्हणतात. शत्रूशी मिलाफ करतांना प्रसंगी तो मित्राशी भांडतो सुद्धा पण ते एक नाटक असते. त्यात जर तो कामयाब झाला तर त्याचे फायदे विपूल असतात. हे समजावण्यासाठी एक रुपक

कथा सांगितली जाते ती सांगतो, वडाच्या झाडाखालील एका मांजर व उंदराची कथा आहे.

भिष्म पुढे सांगतात, एका मोठ्या अरण्यात एक विशाल वडाचे झाड होते. त्याच्यावर अनेक वेली वाढत होत्या. त्या झाडावर अनेक प्रकारचे पक्षी रहात होते. त्या वडाचे खोड खूप विस्तीर्ण होते. त्या वडाच्या झाडाला अनेक फांद्या होत्या. तो वृक्ष दिसावयाला फार सुंदर होता. त्याच्या सावलीत अनेक पशु विश्रांती घेत असतं. त्या झाडाच्या खालील मातीत एका हुशार उंदराने त्याचे बिळ केले होते. त्या उंदराचे नांव होते पलिटा. त्या वडाच्या झाडाच्या एका मोठ्या फांदीवर एक मांजर रहात होते त्याचे नांव लोमसा होते. ते तेथे मोठ्या मजेत रहात होते. त्या झाडावर वावरणार्या पक्षांना पकडून ते मांजर लोमसा त्याचे पोट भरत असे. कांहीं काळानंतर एक चांडाळ तेथे आला व त्या झाडाखाली त्याचे झोपडे बांधतो. दर संध्याकाळी तो चामडाच्या वादीचे जाळे तेथे पसरून ठेवत होता त्यात रात्री प्राणी सांपडतील अशा प्रकारे ती व्यवस्था होती. दुसर्या दिवशी तो त्यात अडकलेले प्राणी पकडत होता. एकदा असे होते कीं ते मांजर त्या जाळ्यात अडकते. ते झाल्यानंतर तेथे रहाणारा उंदीर पलिटा जो मांजराच्या भयाने फार सावधपणे फिरत असे तो आता बिनधास्तपणे फिरू लागला होता. पलिटा वनात फिरत असतांना तेथे चांडाळाने पसरून ठेवलेले मांसाचे तुकडे पाहिले. तो उंदीर मोठ्या मजेत तेथे असलेल्या सापळ्याला न जुमानता ते मांसांचे छोटे तुकडे खाऊ लागला. तो मोठ्या मजेत ते सगळे करत होता. त्याला त्याचे संकट समजले नव्हते. तो पहातो कीं, त्याचा दुष्मन मुंगूस तेथे येत होता, तेंच मांसाचे तुकडे खाण्यासाठी. त्या मुंगुसाचे नांव होते हरीता. उंदराला पाहिल्यावर तो जोराने त्याच्यावर उडी मारून जातो. हरिता ते करत असतांना वर पहातो ते त्याला एक त्याचा दुष्मन दिसतो तो असतो एक घुबड त्याच नांव होते चंद्रक. उंदीर त्या दोघाना पाहून विचार करू लागतो. त्याच्या भोवती दोन शत्रू उभे आहेत अशावेळी काय करावे ते त्याला सुचेना. तो पहातो कीं जर तो त्या सापळ्यावरून खाली उतरला तर मंगूस खाणार, जर तो तेथेच राहिला तर वरून घुबड येईल. आणि मांजर त्या जाळीतून बाहेर आले तर ते खाणार, आता काय करावयाचे त्याचा तो चतूर उंदीर विचार करत असतो. चतूर प्राणी हार मानत

नाही. घाबरून प्रश्न सुटत नसतात. म्हणून अडचणीच्या काळात घाबरणे हे अयोग्य धोरण असते. योग्य मनोरचना असते सावध होण्याची घाबरण्याची नाही, हे तो उंदीर समजत होता. त्या तिघात त्याला मांजर त्यातल्या त्यात कमी धोक्याचे वाटत होते कारण ते दोघे एकमेकांना आधीपासून पहात होते पण कधी मांजराने त्याला पकडण्याचा प्रयत्न केल्याचे त्याला आठवत नव्हते. तो पहातो कीं, मांजर जाळीत अडकले आहे. त्याला जर मी सुटे केले ते जाळे कुरतडून तर ते मुंगूसावर जाणार त्यामुळे तो धोका कमी होणार. असा तो विचार करत असतो. तो ठरवतो की, तो मांजरा बरोबर सामंजस्य करार करील, जरी मांजर आम्हा उंदरांचे मोठे शत्रू असले तरी आता तोंच मोठ्या संकटात आहे. जर त्याला सांगितले की, मी त्याचे जाळे कुरतडून त्याला मोकळे करू शकतो पण त्यासाठी तो सुटल्यावर माझ्या मागे न लागता त्या मुंगूसाकडे गेला पाहिजे. कदाचित तो माझ्या अटी मान्य करेल. मोठ्या शत्रूपुढे छोटा शत्रू मित्र ठरतो अशा प्रसंगी हे तत्त्व तो जाणत असतो. जसे म्हणतात कीं, बुद्धिमान शत्रू मूर्ख मित्रापेक्षा जास्त चांगला असतो. तसे पहाता त्या दोन इतर शत्रूपेक्षा मांजर जास्त बुद्धीमान असेल तर त्याच्याशी समझौता करणे रास्त ठरेल. उंदीर विचार करत असतो. हित आणि सुखाच्या तंत्रात तो उंदीर तयार होता. तो मांजराला त्याचा विचार सांगतो कीं, तो ते जाळे कुरतडून त्याला मोकळे करण्यास तयार आहे पण ते मोकळे झाल्यावर मुंगूसावर जाईल असे त्याने आश्वासन दिले पाहिजे. त्यात आपल्या दोघांचे हित आहे असे तो त्या मांजराला समजावतो. तो उंदीर त्या मांजराला पटवत असतो कीं, तो भविष्यात पुन्हा पुन्हा त्याला अशा जाळ्यातून सोडवेल जर तो जगला तर, म्हणून मांजर त्याला खाणार नाही. तो पटाणारा युक्तीवाद होता. पुढे तो सांगतो त्या मांजराला कीं, ते दोघे शेजारी आहेत व त्यांना येथेच रहावयाचे आहे तेव्हां एकमेकांना मदत करणे शेजारधर्माप्रमाणे योग्य होईल. अशा प्रकारे एकमेकांना सांभाळण्यातच खरे शेजारपण असते. मी तुला मोकळे करतो त्या बदल्यात तू मला अभय देशिल असा प्रस्ताव उंदीर त्या मांजरापुढे ठेवतो. मांजराकडून कोणती प्रतिक्रीया येते ते तो पहात असतो. त्या जाळ्यात अडकलेले ते मांजर उंदराचा प्रस्ताव मान्य करते. कारण मुंगूस त्याला जास्त चवदार वाटत होता. मांजर त्याला आश्वासन देते कीं, ते सुटल्यावर त्याला पकडणार नाही व थेट मुंगूसाकडे

जाईल.  ते ऐकल्यावर उंदीर मांजरा पुढे आणखीन एक प्रस्ताव ठेवतो तो असा की, मांजर सुटल्यावर तेथून निघून जात असतांना तो उंदीर त्याच्या पोटाला धरून राहिल त्यामुळे तो मुंगूसाला दिसणार नाही.  तशा स्थितीत आपण दोघे बाहेर पडू कारण मला त्या घुबडाची सुद्धा भिती वाटत आहे.  जर तू मला संरक्षण देण्याचे आश्वासन देत असशिल तर मी ते जाळे कुरतडण्यास सुरूवात करणार आहे.  एवढे सांगून उंदीर त्याच्या जबाबाची वाट पहात असतो.  लोमसा मांजराला ते आवडते कारण तेथून मोकळे होणे त्याच्यासाठी आवश्यक होते.  तो मंजूरी देतो.  त्यांच्यात मैत्री करार होतो. लोमसा मांजर उंदराचे अनेक आभार मानत असतो कारण,  तो आता मोकळा होणार होता.  माझ्या आपत्काळी तू मला मदत केली आहेस त्यासाठी मी तुझा ऋणी झालो आहे असे तो मांजर उंदराला बोलतो.

भिष्म पुढे सांगत असतात,  तशा प्रकारे उंदीर मांजराच्या पोटाशी बांधल्यासारखा राहिल्यामुळे घुबड आणि मुगूस त्याला पाहू शकत नव्हते.  ते दोघे समजतात कीं,  आता येथे थांबण्यात कांहीं उपयोग नाही म्हणून ते तेथून निघून जाण्याच्या तयारीत असतात. त्यानंतर सकाळ उगवते व चांडाळ येण्याची वेळ येते.  थोड्याच वेळांत तो चांडाळ त्याच्या भयंकर दिसणार्या कुत्र्यांसह तेथे येत असलेला त्यांना दिसतो.  परंतु,  अजून सगळ्या जाळीचे दोर उंदराने तोडलेले नसातात.  आता मांजर घाबरून त्याला बोलते कीं,  मी तुला अभय दिले पण तू तुझे काम केलेले नाहीस.  त्याचे कारण काय?  उंदीर सांगतो,  तो चांगला जवळ आला कीं मी ते उरलेले दोर तोडणार आहे.  म्हणजे ताबडतोब तू झाडावर जाऊ शकशिल व मी माझ्या बिळात.  उंदीर त्याला सांगतो कीं, कोणतेही काम घाईने करण्याने चुका होत असतात व त्यामुळे नवीन संकटं येत असतात. उंदीर त्याला सांगतो कीं,  आपण आपापल्या मतलबासाठी एकत्र आलो आहोत.  तो साध्य झाल्यानंतर कदाचित आपले हे एकत्र असणे मला धोक्याचे व तुला सोयीचे होऊ शकते व ते मला परवडणारे नाही.  पुढे तो त्या मांजराला सांगतो कीं,  तो वेळीच उरलेले दोर तोडणार आहे त्यामुळे मांजर त्या कुत्र्यांच्या तावडीत सापडणार नाही.  ह्या व्यावहारिक जगात कोणीही कोणाचे मित्र नसतात.  जो तो त्याच्या मतलबासाठी दोस्ती व शत्रूत्व करत असतो हे तत्त्व मी विसरू शकत नाही.  एकदा कामं झाली कीं सगळे

मदत करणार्यास विसरतात हा रजोगुणी व तमोगुणी लोकांचा स्वभाव असतो ते मी चांगलेच जाणतो व तू मांजर आहेस म्हणजे तमोगुणी आहेस म्हणजे तू माझे उपकार विसरणार हे निश्चित. मला हे सगळे लक्षात ठेवूनच तुझ्याशी वागले पाहिजे. मी तो दोर तेव्हांच तोडणार जेव्हां तो चांडाळ व त्याची कुत्री आपल्या जवळ येतील. असे करण्याचे कारण, ते येतांना पाहिल्यानंतर तू स्वताच्या जीवासाठी पळून जाशिल माझ्या मागे येणार नाहीस. पण जर आता मी ते दोर तोडले तर तू मला खाण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता मला नाकारता येणार नाही. ते बोलत असताना तो चांडाळ त्याच्या कुत्र्यांबरोबर येताना दिसतो. त्या चांडाळाचे नाव होते परिघ. तो फार भयंकर दिसत होता साक्षात यम वाटत होता. त्याला व त्याच्या अक्राळ विक्राळ कुत्र्यांना पाहून लोमसा फार घाबरला होता. त्याच वेळी उंदीर ते दोर तोडतो व मांजर मोकळे होते. त्याबरोबर तो उंदराकडे न बघता त्वरित झाडावर जातो. पलिता उंदीर त्याच्या बिळात जातो. चांडाळाला दिसते कीं जाळीत सापजलेले मांजर सुटले आहे. तो त्याचे फाटलेले जाळे घेऊन निघून जातो. जीवावर बेतलेले संकट संपल्यानंतर तो मांजर उंदराला बोलतो, "मी तुझे आभार मानू शकलो नाही. कारण ती वेळच तशी होती. आता संकट संपले आहे तेव्हां मी तुझ्या बरोबर थोडा वेळ काढून तुझ्या उपकाराची चांगली फेड करू इच्छितो, आपण आता मित्र झालो आहोत, तर तू माझ्या जवळ ये". त्या नंतर मांजर त्या उंदराची स्तुती करू लागतो. ते ऐकून उंदराला समजतो कीं, मांजराचा डाव काय आहे. कारण, मांजर तमोगुणी असते हे तो उंदीर जाणत असतो. त्याला समजते कीं, जर तो त्या मांजराच्या बातांमध्ये फसला तर त्याला मांजर खाऊन टाकल्याशिवाय रहाणार नाही. लोमसाच्या बातात येणारा तो चतूर उंदीर नव्हता. केव्हां शत्रू मित्राचे सोंग घेऊन येतो ते त्याला समजत होते. कोणाच्या मनात काय आहे ते समजणे सोपे नसते. केवळ बांतावर विश्वास ठेवणारा मूर्ख होत असतो. उंदीर त्याला सांगतो कीं, मांजर व उंदीर ह्यांच्यात सलोखा तेव्हांच होतो जेव्हा तो उंदीर त्या मांजराच्या पोटात जातो हे तो ओळखून आहे. म्हणून तो मांजराच्या बाता मानणारा नाही. मैत्री आणि दुष्मनी दोन्ही परिस्थितीवर अवलंबून असतात. परिस्थिती बदलली कीं दोस्त दुष्मन होऊ शकतो. गरजा व मजबूरी (नाइलाज) त्यावर ते अवलंबून असतात. त्यात

स्वार्थ मोठा डाव खेळत असतो. कारण शेवटी स्वार्थ हा महत्वाचा घटक असतो. जर भावनांच्या आहारी जाऊन त्याबद्दलचे निर्णय घेतले तर मोठी चूक त्यात होत असते. त्यासाठी अशा परिस्थितीतील निर्णय विवेकांनेच घ्यावयाचे असतात. मित्राचा स्वार्थ कशात आहे ते पाहून त्याच्या मैत्रीचे मुल्यमापन करावयाचे असते. स्वताचा स्वार्थ आणि त्याचा स्वार्थ ह्यांची सांगड बनते कां नाही त्यावर सगळे नातेसंबंध बनत असतात. तशी सांगड होत नसेल तर ते नाते उपयोगाचे नाही असे समजावयाचे असते. ज्या मैत्रीत कोणताही मतलब नाही ती मैत्री फक्त देव आणि भक्त ह्यांच्यात सात्त्विक पातळीवर असू शकते. आपण दोघे रजोगुणी व तमोगुणी असल्याने आपल्यात तशी मैत्री संभवत नाही. तेव्हां मी तुझ्या बातांमध्ये फसणारा नाही असे तो उंदीर मांजराला सांगतो. एकादी मैत्री कोणत्याही मतलबाशिवाय असेल तर त्या मैत्री मागील उद्देश त्यापैकी कोणीतरी एक लपवत आहे असे समजावयाचे असते. अशा मैत्रीच्या गोष्टींवर फक्त एक मूर्खच विश्वास ठेवू शकतो. मी नाही ठेवणार कारण मी मूर्ख नाही. त्यावेळी आपण मैत्री केली कारण त्या पाठी निश्चित कारण होते. तसे आता नसतांना मी तुझ्या मैत्रीवर विश्वास ठेवणार नाही. कारण सगळे जाणतात कीं उंदीर मांजराचे खाद्य आहे. खाद्य व खाणारा ह्यांच्यात फक्त एकाच प्रकारची मैत्री असू शकते. ती परिस्थिती आता नाही ज्या परिस्थितीत आपण मित्र होतो. आता जी परिस्थिती आहे त्याप्रमाणे आपण खाद्य व खाणारा असे आहोत व मला तुझे खाणे होण्याची अजिबात इच्छा नाही. मी तुला नेहमीच भीत असतो कारण तू मला खाणारा आहेस. आपल्या मैत्रीसाठी मी तुला आश्वासन देतो कीं, जर तू पुन्हा जाळ्यात अडकलास तर मी तुझ्यासाठी पुन्हा ते जाळे कुरतडण्याचे काम करीन पण आता मला बोलावू नकोस मी तुझ्याजवळ येणार नाही. मला मरावयाचे नाही. जीव सलामत तर मैत्री पचास, असे मी सांगतो.

लोमसाला समजते कीं, उंदीर फसणारा नाही. तो बोलतो, "तू फारच चतूर आहेस. मला समजते कीं, तू माझे भले केले आहेस पण माझा स्वभाव तू ओळखून तसे वागत आहेस. हित आणि सुखाचे तंत्र तू चांगलेच समजत आहेस. तरी तू जसे समजतोस तसा माझा उद्देश नव्हता. माझ्या शब्दावर विश्वास ठेवून तू मला न भिता माझ्याकडे येऊ शकतोस. मी मान्य करतो कीं, आम्ही मांजरं तुम्हा उंदराचे भक्षक असतो परंतु, मी

ह्यावेळी तुला खाणार नाही. तू माझ्यावर जे उपकार केले आहेस ते मी विसरणार नाही. समान शत्रूच्या भयाने आपण एकत्र आलो होतो आता तो नाही म्हणून आता आपण एकत्र असू शकत नाही हे मला समजले. शक्तीमान व अशक्त कधींच एकत्र नांदू शकत नाहीत शक्तीमान अशक्तांचा बळी घेणार हे ठरलेले आहे व्यावहारिक जगात. तू तुझे संरक्षण करत आहेस हे मला आवडले. तेवढ्यात ते त्या चांडाळाला येताना पहातात व आपापल्या ठिकाणी पळून जातात.

भिष्म पुढे सांगत असतात, अशारितीने ते दोघे, उंदीर व मांजर एकमेकांना त्याच्या समान शत्रूपासून वाचवत तेथे रहात होते. मी तुला क्षत्रियांची कर्तव्ये सांगितली आहेत. आता सांगतो आणखीन एक नाते संबंधाबाबत. दोन एकमेकांचे शत्रू तिसर्या मोठ्या शत्रूपासून सुरक्षा मिळावी म्हणून एकमेकाला सहाय्य करत आहेत तरी ते त्यांच्यातील दुरावा विसरू शकत नाहीत अशी परिस्थिती असते. तरी त्यांच्यातील जो जास्त समजूतदार आहे तो त्यांचे जुने दुराव्याचे कारण दूर करण्याचा प्रयत्न करत असतो. त्यामुळे आपल्याला फायदा होईल ते तो समजतो परंतु, कमी समजूतदारपणा असलेला मात्र ते आठवत रहातो. बदलत्या परिस्थितीचे भान ठेवणे राजाला जमले पाहिजे. त्याची राजकीय धोरणं लवचिक असावी लागतात. त्यात राजाचा संधीसाधूपणा उपयोगाचा असतो. तसे करण्याने ना कमीपणा येत ना पाप लागत. विश्वास ठेवणे व विश्वासघात करणे असे दोनही त्याला परिस्थिती शिकवत असते ते जो शिकतो तो यशस्वी राजा असतो. त्याला राजकारण असे म्हणतात. राजकारणाच्या डावपेचांमुळे कोणाला पाप लागत नाही किंवा पुण्यसुद्धा मिळत नाही. राजाच्या मुत्सद्देगिरीत सर्वथा आपद्धर्म असतो. त्याला स्वार्थाचा खेळ असेसुद्धा समजतात. स्वताच्या सुरक्षेसाठी तो ते सगळे करत असतो. त्याला भय समजू नये. कारण भय माणसाची शक्ती कमी करत असते. संधीसाधूपणा त्याची शक्ती वाढवत असते. म्हणून राजा कधी भिणार नाही व कधी प्रतिष्ठेचा विषय करणार नाही. तो सतत मार्ग शोधणारा असेल. म्हणून तो नेहमी आशावादी असेल. त्या मांजर व उंदीर ह्यांच्या गोष्टीप्रमाणे तू तुझी धोरणं ठेवत रहा म्हणजे मोठ्या संकटातू सुद्धा तू स्वताला वाचवू शकशिल. तुझी राजकीय धोरणं ठरवतांना पुण्यकार्य, हित आणि सुख ह्यांचे समीकरण बिघडणार नाही ह्याची काळजी

घेत रहा. तसे केलेस म्हणजे तुझी प्रजा नेहमी सुखी असेल. त्यासाठी वेदाचा अभ्यास केलेल्या ब्राह्मणाचा सल्ला घेत रहा. त्यामुळे तुझे ह्या व नंतरच्या जगात भले होईल. तुझे राज्य सुरक्षित असेल त्याशिवाय सुख, प्रसिद्धी, संपत्ती असे सगळे मिळेल.
शांती पर्व भाग एकशे सदोतिसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे अडोतिसावा

युधिष्ठीर बोलतो, आपण सांगितसे आहे कीं, शत्रूवर कधी विश्वास ठेवावयाचा नसतो. आता मला सांगा राजाने कोणावर विश्वास ठेवावा व कोणावर ठेवू नये. विश्वास ठेवण्याने त्याच्या राज्याला संकटाला सामोरी जावे लागू शकते. त्याबद्दलचे धोरण कसे असावे ते सांगा. माझ्या मनात गोंधळ उडाला आहे. त्याच प्रमाणे अविश्वास कसा असावा ते सांगा.

भिष्म सांगतात. एका ब्रह्मदत्ताची कथा सांगतो. पुजानी नांवाच्या पक्षिणीत व ब्रह्मदत्तात जे संभाषण झाले ते मी तुला सांगतो. फार प्राचीन काळी कंपलिय नांवाच्या राज्यात जेथे ब्रह्मदत्त राजा होता त्याच्या वाड्यात ती पक्षिणी पुजानी, राजाबरोबर रहात होती. ती पक्षिणी मोठी ज्ञानी होती. तिला एक पिलू होते. त्याच सुमारास राजाच्या राणीला सुद्धा एक मुलगा होतो. पुजानी राजाच्या मुलासाठी व स्वताच्या पिलासाठी लांब जाऊन दोन फळं घेऊन येत असे दररोज. एक ती राजपुत्राला देत असे व दुसरे स्वताच्या पिलासाठी ठेवत असे. त्या चवदार फळांमुळे त्या मुलात ताकद वाढत होती. असे दररोज ती करत असे. एकदा जेव्हां पुजानी तेथे नव्हती तेव्हां तो राजपुत्र त्या पिलाशी खेळू लागतो व त्याच्या हातून ते पिलू दाबले जाते व मरते. पुजानी नेहमी प्रमाणे फळं आणते व पहाते कीं, तिचा बाळ राजपुत्राने खेळतांना निरपराधीपणे मारले आहे. ते पाहून तिला फार दुःख होते व ती पुत्रवियोगाने संतापून त्या राजपुत्राला शिक्षा करण्यासाठी त्याचे डोळे चोचीने फोडते. तो राजपुत्र अंध होतो.

पुजानी रडत रडत बोलते कीं, कोणी क्षत्रियांवर भरवसा करू नये. त्यांना जेव्हां गरज असते तेव्हां ते प्रेमाने वागतात व गरज सरली कां ते सगळे विसरतात. क्षत्रियांसारखे भयंकर लोक नाहीत. मी माझ्या मुलाच्या मृत्यूचा सूड उगवला आहे तेव्हां आता ह्या जागेत मी रहाणे माझ्यासाठी योग्य नाही. मी सूड उगवला आहे तेव्हां त्याचे परिणाम मला भोगावे लागतील जर मी येथे रहाते तर. त्याच्या मुलाला मी आंधळे केले त्याचा प्रतिसूड तो नाहीतर त्याची बायको माझ्यावर घेणार हे निश्चित म्हणून मी येथून गेले

पाहिजे. तसे ती राजाला सांगते. राजा ब्रह्मदत्त तिला बोलतो, "माझ्या मुलाने तुझ्या मुलाला मारले त्याबद्दल तू त्याला अंध केले आहेस. त्यामुळे मी तुला दोष देणार नाही. परंतु, माझ्या मुलाने त्याच्या निरपराध अवस्थेत ते केले होते व तू मात्र जाणून बुजून ते कृत्य केले आहे त्यामुळे ते दोन एकासमान नाहीत तरी मी तुला माफ करतो व तू येथून जाऊ नकोस".

पुजानी बोलते, "एकदा मी तुला दुखवले आहे, भले ते कसेही झाले असेल, आता मला तुझ्याकडून खरी माफी मिळणे अशक्य आहे. अशा परिस्थितीत दुखवणारा कधीच सुरक्षित नसतो. आता मी तुझ्यावर विश्वास ठेवणे बरोबर नाही. फक्त एक मूर्खच तसे करेल. अशा कारणातून उत्पन्न झालेले वैर संपत नसते. ते निखार्यासारखे सतत जळत असते दुखवलेल्याला. माझ्या मुलाच्या नाहक मृत्यूमुळे मला किती यातना झाल्या आहेत ते तुला कधीच समजणार नाही. विश्वास ही अशी गोष्ट आहे जी एकदा उडाली कीं, पुन्हा प्राप्त होत नाही. विश्वास टिकवणे महत्वाचे असते जे तुझ्या कडून झालेले नाही. जे झाले त्यात तुझा दोष नाही पण तुझ्या मुलाचे जे मी केले त्यात मी गुंतलेली आहे. त्याची किंमत मला कधी व कशी द्यावी लागेल ते सांगता येत नाही. एक माता व पिता सोडले तर इतर कोणीही खर्या अर्थाने विश्वासार्ह नसते. भाऊ जेवढ्या लवकर दुष्मन होईल ते सांगता येणार नाही. तीच गोष्ट इतर आप्तांची असते. तू जितके जास्त मला रहावयाचा आग्रह करशिल तितके जास्त मला भय वाटणार आहे तुझ्याबद्दल. मी तुझ्या वाड्यात आता रहाणे माझ्यासाठी उचीत नाही.

ब्रह्मदत्त बोलतो, सूडाने बदल्याच्या भावनेने जे केले जाते ते क्षम्य असते. म्हणून तू न घाबरता येथे रहात जा. तुला कांहीं होणार नाही हे माझे आश्वासन आहे.

पुजानी बोलते, जे घडले ते आपण कधीच विसरू शकणार नाही.

ब्रह्मदत्त बोलतो, दुखवलेला व सूड घेणारा ह्यांच्यात सलोखा करता आला पाहिजे. त्यात चांगुलपणा आहे. तुझ्यावर अन्याय झाला म्हणून तू तसे केलेस हे मी समजतो. पण तो अन्याय माझ्या लेकराने अजाणता केला होता व तू मात्र जाणीव पूर्वक त्याला कायमचे अंध केले आहेस. त्यात माझ्या मते तुझा अपराध मोठा आहे तरी मी तुला माफ करत आहे ह्याचा विचार कर.

पुजानी बोलते, ह्या जगात असा चांगुलपणा नसतो. प्रतिकाराची प्रेरणा कधी व केव्हां उत्पन्न होईल ते सांगता येणार नाही. त्यासाठी आपण पुन्हा कधीच न भेटणेच दोघांसाठी योग्य आहे.

ब्रह्मदत्त बोलतो, वैर एकत्र रहाण्याने संपेल कारण आपल्यात अशा अनेक गोष्टी चांगल्या झाल्या आहेत जसे तू माझ्या मुलासाठी फळं आणत होतीस, त्यांच्या आठवणीने ते वैरभाव नाहीसे होतील असे मला वाटते.

पुजानी बोलते, वैरभावाचे पांच प्रकार असतात (स्त्रीमुळे, जमिनीमुळे, अपमानामुळे, स्वभाव विषमतेमुळे, हत्त्या झाल्यामुळे) त्यातील कांहीं कदाचित तू सांगतोस तसे नष्ट होत असतील परंतु, आपल्यात जे घडले आहे ते हत्त्या झाल्यामुळेचे आहे, तशाप्रकारचे वैर नष्ट होणारे नसते.

नुकसान करणार्याच्या पश्चात्तापाने सुद्धा ते संपत नाही. वेदात सुद्धा तशा वैराला तडजोड सांगितलेली नाही. हत्तेच्या गुन्ह्याला माफी सुद्धा नसते. मी तुझ्या पुत्राचे कायम नुकसान केले आहे कारण माझ्या एकुलत्या एका पिलाची त्याने हत्त्या केली आहे. अशातून उत्पन्न होणारे दुःश्वास कधीच नष्ट होत नसतात. त्यासाठी वेगळे होणे व पुन्हा कधीच न भेटणे हांच मार्ग मला दिसतो.

ब्रह्मदत्त पुजानीला बोलतो, तू जे सांगत आहेस ते रजोगुणी व तमोगुणी लोकांसाठी योग्य आहे पण सात्त्विक लोक त्याला क्षमा करून नवीन संधी देत असतात.

पुजानी बोलते, "सत्त्वगुण, रजोगुण आणि तमोगुण सगळ्यांत विद्यमान असतात. त्यातील कोणता गुण उचल घेतो त्या वरून त्या व्यक्तीचे गुण समजले जातात हे वेदात दिले आहे. कधी कोणता गुण कोणत्या कारणाने उचल घेईल ते कोणी सांगू शकत नाही. एकदा सात्त्विक असलेला परिस्थिती बदलल्यास तमोगुणी होणार नाही असे कोणी सांगू शकणार नाही. जसे माणसात दैवी, पाशवी आणि कली असे सदैव असतात त्यातील कोण उचल घेईल ते सांगता येत नाही. म्हणून त्याच्या भरवशावर मी राहू इच्छित नाही. मी तुझी अपराधी आहे हे निःसंशय खरे आहे. कारण मी त्याला माझ्यातील तमोगुणामुळें घात केला आहे. माझ्यात त्यावेळी सात्त्विक भाव उभारला असतां तर कदाचित मी त्याला अंध करण्याची भयंकर शिक्षा केली नसती. तसेंच आज

तू सात्त्विक भावात आहेस म्हणून मला माफ करत आहेस पण उद्या तुझ्या बायकोने तुझे कान भरले तर तुझ्यात तमोगुण अथवा रजोगुण वर येणार नाही ह्याची काय शाश्वती आहे"?

एकदा दुष्मन झालेल्याच्या आश्वासनावर जो विश्वास ठेवतो तो कायम खड्ड्यात जातो त्यातून त्याला बाहेर काढणे शक्य नसते.

ब्रह्मदत्त बोलतो, "सदैव भीतीच्या छायेत रहाणे मरणापेक्षा जास्त भयंकर असते".

पुजानी बोलते, "कमजोरांनी सुडाच्या छायेत रहाणे तितकेच भयंकर असते. दुसर्याच्या आश्वासनावर रहाणारे नेहमीच असुरक्षित असतात. स्वताच्या सुरक्षिततेची व्यवस्था जो स्वतः करतो तो जास्त सुरक्षित असतो. जेथे मला सतत असुरक्षिततेची भावना सतावणार आहे तेथे मी रहाणे उचीत समजत नाही. येथे रहाण्याने मला माझ्या पिलाची आठवण येत राहील व मी तुझ्या मुलाला जे केले ते सतत माझ्या डोळ्यापुढे असेल ते मला सहन होणारे नाही कारण मी पश्चात्ताप करूनही त्याला मी डोळे देऊ शकणार नाही. त्याला घर समजले जाते जेथे तो सुखाने राहू शकतो. मी ह्यापुढे येथे सुखाने राहू शकणार नाही कारण हे आता माझे घर राहिलेले नाही. म्हणून येथून जाणेच माझ्यासाठी उचीत आहे.

पुढे पुजानी ब्रह्मदत्ताला शुभेच्छा देते कीं, तू असा सात्त्विक राजा आहेस की तुझ्या राज्यात प्रजा नेहमी सुखी असेल. तुझे राज्य सुखी व समृद्ध होईल. असे बोलून ती पक्षिण उडून जाते.

भिष्म पुढे सांगतात, "मी तुला सांगितले ब्रह्मदत्त व पुजानी मधील संभाषण, त्यातून कांहीं बोध तुला होईल असे मी समजतो. आणखीन काय सांगू ते बोल"?

शांती पर्व भाग एकशे अडतिसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे एकोणचाळीसावा

युधिष्ठीर विचारतो, युगांत होणार्या फरकामुळे देवत्व कमी होत गेले व कलीचे व म्हणून पापाचे प्रमाणे वाढत गेले हे आपण जाणतो. अशा परिस्थितीत राजाने कसे काम करावयाचे ते सांगा.

भिष्म सांगतात, मी तुला सांगतो त्या बदलत्या परिस्थितीत राजा कसे काम करेल. त्या बाबत ऋषी भारद्वाज आणि राजा शत्रूंजय ह्याच्यात जो संवाद झाला होता तो तुला सांगतो, सौविरामध्ये राजा शत्रूंजय होऊन गेला. तो ऋषी भारद्वाजांकडे एकदा गेला होता. तो विचारतो जे त्याच्याकडे नाही ते तो कसे मिळवेल? तो ते कसे वाढवेल? कसे त्याचे संरक्षण करेल? त्याचा उपयोग कसा करेल? ज्यात हित आणि सुख आहे. भारद्वाज त्याला सांगतात. राजाच्या हातात न्यायदंड असला पाहिजे. त्याचा दरारा प्रजेत असला पाहिजे. त्याचे लक्ष असले पाहिजे सदैव कृष्ण कृत्य करणार्यांच्यावर. न्यायदंडाचा वापर न्यायासाठी होत असेल तर त्याचे कौतुक सगळे ज्ञानी करतील. न्याय मिळवण्यासाठी जे चार मार्ग सांगितले आहेत त्यात चाबूक प्रमुख असतो. उरलेले तीन आहेत समझौता, भेटी देणे (मदत करणे), भेद निती. त्यांचा उपयोग राजा राज्याबाहेरील अन्याय करणार्यांवर करेल. अन्याय करणारे व त्याची कारणे राजा शोधून काढेल व ती मुळातच नष्ट करेल. तसे त्याने यशस्वीपणे केले तर तो यशस्वी राजकर्ता म्हणून ख्यातनाम होतो. भेटी देणे व समझोता करण्यासाठी राजा शत्रूशी दोस्तीचे नाटक करत असला पाहिजे. ते करत असतांना शत्रूपक्षातील कमजोरकडी शोधून त्याच्या मदतीने तो भेदनितीचे प्रयोग करू लागेल. अशाप्रकारे तो ते इतर मार्ग अजमावणार असतो.

अप्रसंग जेव्हां राजावर येतो, तो न घाबरता त्याच्या सल्लागारांचा सल्ला घेऊन परिस्थितीचा अंदाज घेत त्याचे डावपेंच आखत असला पाहिजे. राजाला घाबरण्याचे धोरण परवडणारे नसते. तो नेहमी खंबीर असला पाहिजे. शत्रू किती ताकदवान आहे त्या प्रमाणे राजाचे धोरण असेल. प्रत्येक वेळी युद्ध करण्याचा पर्याय नसतो. तो

अखेरचा असतो. त्या आधी अनेक इतर मार्ग असतात. ते त्याने अजमावयाचे असतात. त्यासाठी राजा त्याच्या वैश्यांच्या मदतीने परराज्याची अर्थ व्यवस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न करेल. जो राजा भावना विवशतेने त्याचे निर्णय घेतो तो कधी मोठा राजा होत नाही. राजा नेहमी धूर्त, कावेबाज, कपटी असा असला पाहिजे. जरी वरकरणी तो सात्त्विक असल्याचे सोंग करत असेल. ते तीन रजोगुमात व तमोगुणात येतात. म्हणून राज्य कारभाराचे कार्य रजोगुणी प्रवृत्तीने त्याला करावे लागते. प्रतिस्पर्ध्याने दिलेले आश्वासन राजा सावधगिरीने स्वीकारेल त्यावर अंधपणे तो भरवसा करणार नाही. परराज्याची अर्थव्यवस्था त्याच्या राज्यातील इमानदार वैश्यांच्या हातात गेली तर त्याने ते राज्य अपरोक्षपणे जिकलेले असते. तो मार्ग युद्धापेक्षा जास्त सोयीचा असतो. आपले नाणे त्या देशात चलनी म्हणून स्वीकारले गेले तर त्याने ते राज्य जिंकले असे समजावे. कारण त्यानंतर त्या देशाचे लोक व त्या देशाचे राजे ह्या राजाचे प्रस्ताव धुडकावू शकत नाहीत. राजा उपकार करून सुद्धा प्रतिस्पर्ध्याला ताब्यात घेऊ शकतो. त्याशिवाय रोटीबेटी व्यवहार सुद्धा त्याला शत्रूत्व कमी करण्यासाठी उपयोगी येत असतात. बाहेरच्या राज्यातील प्रजेला विविध प्रकारच्या मदती करून त्याना मिंध्ये करूनसुद्धा राजा त्या राज्याच्या शासकांना शह देऊ शकतो. नेहमीच युद्ध हा पर्याय नसतो. असे शांतता मार्ग बर्याचवेळा जास्त सोपे व सहज असतात. त्यात मनुष्यहानी होत नसते. अर्थव्यवस्था ताब्यात घेणे, जनतेला मदत करणे हे वरकरणी सात्त्विक दिसत असले तरी ते कपट कारस्थानाचा भाग असतात कारण त्यामुळे ते राज्य ह्या राजाच्या तालावर चालू लागते. मग राजा त्याच्या राजाला काढून टाकून त्याचा प्रतिनिधी त्याजागी नेमून ते राज्य खालसा करत असतो. ही कुटील निती म्हणून समजली जाते. गरीब देशांना मिंधे करून तो ती राज्या त्याच्यातील खनिज व इतर संपत्तीसाठी ताब्यात घेत असतो.
सर्व नाद (नशा, बाई, शिकार, द्युत, नांच, गाणीबजावणी) राजा मर्यादेने उपभोगू शकतो. त्याची मर्यादा तो ओलांडणार नाही.
काळ, परिस्थिती, संधी ह्याचे तो भान राखून त्याचे सगळे डावपेंच करत असेल. त्याचा निशाणेबाजी उत्तम असली पाहिजे. राजकारणात नेम चुकीचा लागण्याने मोठी हानि होण्याची शक्यता असते. आपले काम साध्य व्हावे म्हणून राजा खोटी आश्वासनं

देऊ शकतो. राजा त्याच्या शत्रूपक्षात त्याचे सच्चे मित्र तयार करेल भेटी, रोटीबेटी व्यवहार, विशेष सवलतीच्या रुपाने असे डाव खेळून. ते मित्र राजाला त्याच्या चढाईच्या वेळी उपयोगी येणार आहेत कीं नाही ते त्याला वेळोवळी अजमावयाचे असते. त्या बाबत राजा बेसावध असणार नाही. प्रत्येक पाऊल तो सावधगीरीने टाकेल. राजा कोणत्याही परिस्थितीत बेसावध रहाणार नाही जरी त्याचे डावपेंच वरवर पहाता यशस्वी झालेले दिसत असे तरी. त्यासाठी राजा त्याच्या गुप्त हेरांच्या प्रयत्नावर अवलंबून असतो. म्हणून तो त्यांना समाधानी ठेवेल. राजाचे हेर व्यापारी, सन्याशी, विदूषक, नृत्यांगना, भाट अशा विविध रुपात इतर देशांत फिरत असतील. ते बाजारात, देवळात, दारूच्या अड्ड्यावर, बगीच्यात, गावाच्या कट्ट्यावर, नायकीणीच्या कोठीवर असें पसरलेले असतील. ते एकमेकांनासुद्धा ओळखत नसतील. ते हेर राजाला दुसर्या राजाचे हेर हुडकून काढण्यात मदत करतील. राजा विश्वासघात करून त्याच्या राजकीय प्रतिस्पर्ध्याला मारू शकतो त्याला पाप समजले जात नाही. कारण राजकारणात विश्वास मिळवावयाचा असतो त्याचा घात करण्यासाठी, असे ऋषी सांगतात. तसे केल्याने राजाची अध्यात्मिक उर्जा कमी होत नाही. राजा निरर्थक वादात भाग घेणार नाही. फालतू लोकांना त्याच्या भोवती जमू देणार नाही. जे कामाचे आहेत त्यांच्याशी दोस्ती करेल.

जी तीन धोरणं (पुण्य, हित व सुख) राजाने आचरावयाची त्यातील पुण्य आत्म्याच्या उद्धारासाठी असते व उरलेले दोन शरीराच्या उद्धारासाठी असतात. राजाचे कार्य जास्त करून शरीराच्या उद्धारासाठी असल्याने त्याची सगळी धोरणे हित व सुख ह्यांच्यासाठी असतील. जर राजा त्याने काढलेले कर्ज फेडू शकला नाही तर तो त्या कर्ज देणार्याचा नाश करून मामला निकालात काढेल. ते त्याचे काम जरी पापमय असले तरी तो त्याच्या समर्थनार्थ कोणतीही सबब पुढे करू शकतो. राजा त्याच्या पक्षातील लोकांची एकजूट मजबूत करण्याचा सतत प्रयत्न करत असेल कारण ती त्याच्यासाठी फार महत्वाची असते. राजा फार मवाळ झाला तर रजोगुणी व तमोगुणी प्रजा त्याला मानणे कमी करते, तसेच तो फार कठोर झाला तरी सात्त्विक प्रजा नाराज होते म्हणून राजा त्याचे वागणे संतुलित ठेवेल. राजा बुद्धीमान लोकांशी सांभाळून काम

करत असेल.  त्यांची बुद्धीमत्ता त्याला बाधक ठरणार नाही ह्याची तो दक्षता बाळगेल. असे बुद्धीमंत त्या राज्याची बौद्धीक संपत्ती असते म्हणून राजा त्यांच्याशी व्यवहार सांभाळून करेल.

भारद्वाज ऋषी पुढे सांगतात सौवीरांचा राजाला,  "तुला मी जे आपद्धर्माचे नियम आहेत ते सांगितले.  त्याचा उपयोग तू राज्य करतांना करणार आहेस.

भिष्म पुढे सांगतात,  ते ज्ञान ऐकून त्याच्या सगळ्या शंकांचे समाधान झाल्या सारखा आनंदी झाला.  त्याप्रमाणे तो त्याचे राज्य कुशल राजकर्त्याप्रमाणे चालवतो व मोठा सम्राट होतो.

शांती पर्व भाग एकशे एकोणचाळीसावा संपला.

# शांती पर्व

## भाग चाळीसावा

युधिष्ठीर विचारतो, जेव्हां नितीतत्त्वांचा र्हास होतो व सगळा चांगुलपणा संपतो, भूतदया उरत नाही आणि माणूसकी रहात नाही, राजा अन्याय करू लागतो, सत्याची चाड कोणाला रहात नाही, योग्य काय व अयोग्य काय त्याचे भान रहात नाही, पापाचे जागी पुण्य व पुण्याच्या जागी पाप सांगितले जाऊ लागते, चारही वर्णाचे आपापली कर्तव्ये विसरतात, वासना आणि भावनांचा हैदौस सुरू होतो, कोणी कोणावर विश्वास ठेवू शकत नाहीत, शहाणपणाची जागा मूर्खपणा घेतो, लोक निष्कारण नसत्या गोष्टींसाठी भांडत असतील. विनाकारण हत्त्या केल्या जाऊ लागतील, ब्राह्मण ब्राह्मणत्व विसरतील, पाऊस पडण्याचे थांबेल, सूर्य आग ओकत राहील, चोरांचे राज्य येईल, शेजारी शेजार्याला लुबाडेल अशा काळात ब्राह्मणांनी कसे रहावे ते सांगा. राजा त्याचे कार्य कसे करत राहिल, जो राजा त्याची कर्तव्ये सोडण्यास तयार नाही व अशा विपरित काळात तो पुण्य, हित आणि सुखाचे (त्रिसुत्री) कार्य कसे साध्य करू शकेल ते मला सांगा.

भिष्म सांगू लागतात, राज्याचे सौहार्द्य, शांतता, पर्जन्य, आरोग्य आणि मत्यू (अकाली) हे त्या राजाच्या चारित्र्यावर अवलंबून असतात जो तेथे राज्य करत असतो. त्याच प्रमाणे मार्कंडेय सांगतात कीं, राज्यात कोणते युग (कृत, त्रेता. द्वापार अथवा कली) कार्यरत असावे ते सुद्धा त्या राजाच्या चारित्र्यावर विसंबून असते. तू ज्या परिस्थितीचे वर्णन केले आहेस अरे युधिष्ठीरा, ते राजाच्या चारित्र्यानुसार ठरत असते. त्या संदर्भात मी तुला एक कथा सांगणार आहे. त्यामध्ये प्राचीन काळी होऊन गेलेला राजा विश्वामित्र आणि एक चांडाळ ह्यांच्यातील संवाद तुला सांगतो. ती घटना एका गावातील चांडाळवाडीत घडली होती. त्रेतायुगाच्या अंतकाळी व द्वापार युगाच्या प्रारंभी एक असाच विलक्षण काळ होता कीं, तेव्हां मोठा दुष्काळ पडला होता. तो चांगला बारा वर्षे चालू होता जसे ईश्वराची इच्छा असावी. त्या दुष्काळाच्या काळात पाऊस पडणे थांबले होते. असख्य जीव मरत होते. आकाशातील गुरू ग्रह उलटा जात होता. चंद्र

त्याच्या कक्षाबाहेर गेला होता. त्या काळात सकाळचे दंवसुद्धा पडण्याचे बंद झाले होते. आकाशात ढगंसुद्धा तयार होत नव्हती. मोठ मोठ्या नद्या लहान झर्याचे रुप घेऊन जेमतेम वहात होत्या. सगळी सरोवरं, तलाव, तळी कोरडी झाली होती. वसंतऋतू येण्याचे बंद झाले होते. पाण्याची व्यवस्था करणारे कोठे गायब झाले होते. ब्राह्मण वेदाचा अभ्यास करण्याचे थांबले होते. यज्ञ होत नव्हते, वेदांचा उच्चार ऐकू येत नव्हता. कृषी, पशुपालन बंद झाले होते. वस्त्या ओस पडल्या होत्या. कोणी सण साजरे करत नव्हते. मौजमजा करण्याचे थांबले होते. जिकडे तिकडे मेलेल्या प्राण्यांचे ढीग दिसत होते. त्यांची हाडं खाण्यासाठी कोणी श्वापदं फिरत नव्हती. भयंकर प्राणी मरणोन्मूख अवस्थेत ओरडतांना ऐकू येत होते. माणसाच्या वस्त्या मध्ये कोणी दिसत नव्हते. मंदीर, आश्रम रिकामे झाले होते. खाद्य न मिळाल्यामुळें असंख्य प्राणी मरून पडत होते. ब्राह्मणसुद्धा अन्ना अभावी मरत होते. वनस्पती सुकून गेल्या होत्या. धरणी शुष्क झाली होती तिच्यावरील हिरवागार पट्टा नाहीसा झाला होता. अशा काळात चांगुलपणा नांवालासुद्धा सापडत नव्हता. अशा काळात अरे युधिष्ठीरा, माणसे भूकेने व्याकूळ अशी एकमेकाना खात होती. ऋषीसुद्धा त्यांचे तपस्या, व्रतस्थता, त्यांचे पवित्र अग्नी सोडून खाद्याच्या शोधात वणवण भटकत होते. त्यातील एक ऋषी विश्वामित्र त्याची पत्नी व मुलं एका जागी बसवून खाद्य कोठे मिळते कां ते शोधत एका गावातील चांडाळवाडीत येतात. ते स्वतः भुकेने व्याकूळ झालेले होते. त्या चांडाळवाडीत वनपशूंना मारून त्यांचे मांस खाण्यात घेणारे चांडाळ रहात होते. अस्वच्छता, दुर्गंध असे तेथे होते जे ब्राह्मणांना वर्ज्य असते. तेथील लोक मेलेले प्राण्यांचे मांस खाऊन रहात होते. त्यांना तशा मांसाची कांहीं कमी नव्हती. तेथील रहिवाशी एकमेकांशी भांडत मारामार्या करत रहात असलेले त्याने पाहिले. तेथे रानटी कुत्री भटकत होती. तेथील देवळात लोखंडाच्या घंटा टांगलेल्या होत्या. त्या देवळात घुबडाच्या कवटीच्या घंटा बांधलेल्या होत्या. परंतु, देवळात कोणी नव्हते. त्या ठिकाणी विश्वामित्र भीक मागण्याचा प्रयत्न करतात पण त्याना कोणी भीक घालत नव्हते. त्यानंतर तो स्वतःच तेथे कांहीं खाण्याजोगे मिळते कां, ते पहात शोधत होता. त्याची ती अवस्था त्याला हवालदील करत असते. अशक्तपणामुळें तो खाली कोसळतो. त्याने कांहीं खाण्यासाठी

मागितले पण कोणी त्याला दाद देत नव्हते. राजा कुशीकाचा मुलगा विश्वामित्र शेवटी एका पडक्या झोपडीत पहातो कीं, तेथे एक सडका मांसाचा तुकडा टांगलेला होता. ती कुत्र्याची तंगडी होती. तो समजतो कीं, ते खाण्याशिवाय त्याला गत्यंतर नाही. तो समजतो कीं, त्याला ते मांस चोरावे लागेल. नाहीतर तो जगू शकणार नाही. आपद्धर्माप्रमाणे जगण्यासाठी चोरी करण्याची परवानगी असते. त्यात त्याने किती अयोग्य गोष्टी केल्या होत्या त्या पहाव्या लागतील. तो ब्राह्मण असून शुद्राच्या घरात गेला, तो तेथे चोरी करतो, ते मांस कुत्र्याचे (खाण्यास वर्ज समजले जाते), ते सडलेले होते अशी चार अपकृत्ये तो करणार होता. त्याशिवाय ती चोरी शुद्राच्या घरात केल्यामुळे चांगुलपणा व माणूसकीचा त्याग झाला होता. साधारण परिस्थितीत ते सगळे अक्षम्य होते. परंतु, त्या परिस्थितीत आपद्धर्माच्या नियमानुसार मात्र ते सगळे क्षम्य ठरत होते. परंतु, तो दिवसा ती चोरी करू शकणार नव्हता म्हणून तो रात्र होण्याची वाट पहातो. रात्र झाल्यावर तो त्या चांडाळाच्या झोपडीत शिरतो. त्या झोपडीचा चांडाळ तेथे झोपलेला होता. त्या चांडाळाला समजते तेव्हां तो मोठ्याने ओरडून विश्वामित्राला विचारतो, "मी झोपलेलो नाही कोण आहे तेथे? जो कोणी असशिल मी तुला ठार मारणार आहे". ऋषी ते ऐकतो. आपण चोरी करत आहोत ह्या जाणीवेने तो घाबरतो. तरी तो त्या चांडाळाला उत्तर देतो कीं, तो ऋषी विश्वामित्र आहे. तो भुकेने व्याकूळ झाला आहे, ते ऐकल्यावर तो चांडाळ हात जोडून पुढे होतो व बोलतो, "आपण माझ्या गरीबाच्या झोपडीत काय करत अहात? आपण भ्रष्ट व्हाल जर सगळ्यांना हे समजले तर तुमचे ब्राह्मण लोक तुम्हाला मारून टाकतील त्याचा तुम्ही विचार केला आहे कां"? विश्वामित्र त्याला सांगतात की, तो भुकेने व्याकूळ झाला आहे. मला कांहीं खाण्यासाठी पाहिजे ते शोधत तुझ्या घरात आलो आहे. भुकेल्याला खाण्यासाठी भीक मांगण्याची परवानगी असते. त्यामुळे मी असे गैर वागलो आहे. मला थोडे मांस खाण्यासाठी तू दिलेस तर तुझे मोठे उपकार होतील. मला ते कुत्र्याचे मांस खाण्यासाठी पाहिजे. माझ्या भूकेने माझ्यातील ब्राह्मण, वेद आणि क्षत्रियसुद्धा मारले आहेत. माझी भूक हांच माझा सध्या धर्म झाला आहे. मला ते कोणाचे आहे, कसे आहे, किती शुद्ध आहे, ताजे आहे कां शिळे आहे अशा कोणत्याही गोष्टीशी कांहीं देणेघेणे नाही. माझे

उदर हेंच माझ्यासाठी ब्रह्म झाले आहे. मी प्रथम तुमच्या गावात भीक मागितली पण कोणी मला भीक देत नव्हते. माझी भूक वाढत होती. त्यानंतर मी तुझ्या घरात तो मांसाचा तुकडा बघितला. तो चोरण्यासाठी मी आत आलो आहे. मला क्षमा कर.
त्याचे ते निवेदन ऐकल्यावर तो वृद्ध चांडाळ त्याला बोलतो, "मी तुझे प्रांजळ निवेदन समजलो आहे, त्या प्रमाणे तुला करण्यात जो दोष लागणार आहे तो न लागावा म्हणून काय करावे ते मी तुला आता सांगतो. तू कित्येक पाप केली आहेस हे करतांना त्याचे निराकरण करणे शक्य नाही. त्यात तू कुत्र्याचे (अती नीच मांस) मांस खाणार आहेस, त्यात ते थोडे खराब झालेले आहे, ह्या दोषांचा तू विचार केलेला नाहीस. हे सगळे करणे पापकारक आहे. त्यात तू चोरी करत आहेस, त्यात ती माझ्या सारख्या नीच कुळातील माणसाच्या घरात करत आहेस. त्यापेक्षा दुसरे कांहीं नाही तुला मिळाले? असे केल्याने तुमचे तप व व्रतस्थ जीवनाने जे मिळवले ते सगळे नष्ट होणार आहे ह्याचा विचार करा. त्यापेक्षा मृत्यू चांगला असे नाहीं कां वाटत आपल्याला"?
त्याचे ते सांगणे ऐकल्यावर ऋषी बोलतात. "मी कित्येक दिवस कांहीं खाल्लेले नाही. हे जर नाही खाल्ले तर मला मरावे लागेल. अशाप्रकारे मरणे शास्त्रानुसार अयोग्य आहे. जीव वाचवणे ह्याला परमपुण्यकर्म समजले आहे वेदांत. परिस्थिती सुधारेल तेव्हां पुन्हा तपस्या व व्रतस्थ जीवन जगून व उपकार करून मी गेलेले पुण्य मिळवीन पण त्यासाठी मला जीवंत राहिले पाहिजे. जर तू मला ते खाऊ दिलेस तर एक पाप (चोरी केल्याचे) कमी होईल तुझ्या कृपेने".
चांडाळ बोलतो, कुत्र्याचे मांस खाऊन तुझे आयुष्य मोठे होणार नाही, ते तुला पचणार सुद्धा नाही, त्यापेक्षा दुसरे कांही खाण्यासाठी मांग कोठेतरी ते खाऊन तू जीवंत राहू शकशिल. तुमच्या सारख्यांने असे घाण खाणे चांगले नाही. ते आम्हा सारख्यांचे खाणे आहे. आम्हाला स्वर्गात जावयाचे नसते म्हणून आमच्यासाठी हे योग्य आहे.
विश्वामित्र बोलतात, ह्या दुष्काळात इतर कोणतेही शुद्ध मांस मिळत नाही. माझ्याकडे पैसे नाहीत कीं, मी ते देऊन चांगले मांस विकत घेऊ शकेन. मी पूर्णपणे असहाय आहे. जास्त काळ उपाशी राहू शकत नाही. मी ऐकले आहे कीं, कुत्र्याच्या मांसात सगळ्या सहा रुची (गोड, कडू, तुरट, आंबट, तिखट, ?) असतात.

चांडाळ बोलतो, ब्राह्मणांसाठी पांच बोटे असलेल्या प्राण्यांचे मांस सांगितलेले आहे. तेंच क्षत्रियांनी व वैश्यानी खावयाचे असते, हे शुद्रांचे खाणे आहे. असे शास्त्रात दिले आहे. म्हणून हे आपण खाऊ नये. नाहक आपण शुद्र व्हाल हे खाल्ल्यामुळे.

विश्वामित्र बोलतात, प्राचीन काळी अगस्त्य ऋषींनी भूक लागली म्हणून एका वाटपी नांवाच्या असुराला खाल्ले होते. मला फार भूक लागली आहे मला ते खाऊ दे.

चांडाळ बोलतो, तुम्हाला ते खाणे शोभत नाही. ते तुमचे खाणे नाही. तुम्ही असे करणे अयोग्य आहे. कृपया माझ्या समोर ते पाप कृत्य करू नका.

विश्वामित्र बोलतात, मी ते खाणे योग्य समजतो म्हणून ते योग्य ठरते.

चांडाळ बोलतो, असे तुम्ही बोलल्याने ते योग्य कसे होणार? जे अयोग्य ते नेहमीच अयोग्यच असते. असे पाप करू नका. त्या मोहात तुम्ही स्वताचा दर्जा खालवत अहात.

विश्वामित्र सांगतात, मी ऋषी असल्याने मी जे करीन ते योग्यच होते. म्हणून अशा परिस्थितीत असे खाणे योग्य ठरू लागेल.

चांडाळ बोलतो, अगस्त्याने ते वाटपीचा नाश करण्यासाठी त्याला खाल्ले होते ती वेगळी गोष्ट होती. त्याचे उदाहरण देणे श्रेयस्कर नाही. ब्राह्मणांनी असे केले तर सगळी व्यवस्था बिघडेल ह्याचा विचार करा.

विश्वामित्र बोलतात, मी ब्राह्मण आहे. हे माझे शरीर माझा मित्र आहे, ते शरीर मला फार प्रिय आहे, त्याला जीवंत ठेवणे माझे कर्तव्य आहे, त्याला जीवंत ठेवण्यासाठी मला कोणतेही कृत्य करण्याची ब्रह्माकडून मुभा आहे. त्यासाठी मी इतका उत्सूक आहे कीं मला कशाचीही पर्वा नाही. मी तुला व तुझ्या आप्तांचा रोष सहन करू शकतो पण ते मांस मी खाणारच.

चाडाळ बोलतो, ब्राह्मण एकवेळ मरण पसंत करतो पण अशुद्ध खाद्य कधी खाणार नाही असे आम्ही समजत होतो. ते अनशनाने त्याच्या सगळ्या वासनांचा नाश करतात असे सांगितले जाते, असे असतांना तुला अनशन कां सहन होत नाही.

विश्वामित्र बोलतात, माझ्याबद्दल सांगावयाचे म्हणजे, मी कठोर तपसाधना करणारा असलो तरी ह्यावेळी मला खाण्यास मिळाले पाहिजे हे सत्य आहे. ते खाद्य शुद्ध आहे

कीं, अशुद्ध त्याचा मला फरक पडत नाही. माझ्या आत्म्याच्या शुद्धतेत त्यामुळे यत्किंचितसुद्धा फरक पडणार नाही. ज्या कारणासाठी मी ते खात आहे ते ब्रह्म जाणतात. म्हणून मी ते खाल्ले म्हणून मी नीच जातीचा कधीच होणार नाही. त्याबद्दलची तुझी भीती निराधार आहे.

चांडाळ बोलतो, तुम्ही कांहीं बोला पण माझा हा धृढ निश्चय आहे कीं, मी आपल्याला ते कुत्र्याचे मांस खाऊ देणार नाही. त्यासाठी माझा जीव जरी गेला तरी. मला एका ब्राह्मणाला त्याच्या अधोगतीपासून वाचवण्याचे पुण्य कमवावयाचे आहे.

विश्वामित्र बोलतात, पाण्यात बेडकं ओरडत असतात म्हणून गाई ते पाणी पिण्याचे थांबवत नाहीत. त्याप्रमाणे मला कोणी ते खाण्यापासून अडवू शकणार नाही. उगाच मोठेपणाचा आव आणू नकोस.

चांडाळ बोलतो, मी आपला आता मित्र झालो आहे कारण आपण आमचे खाद्य खाणार अहात. त्या नात्याने मी तुम्हाला एक विनंती करू इच्छितो, ती आपल्या भल्यासाठी आहे, कृपया भूकेच्या मोहाने पाप करू नका.

विश्वामित्र बोलतात, तू जर माझा खरा मित्र असशिल तर मला माझ्या ह्या संकटातून बाहेर काढशिल. त्यासाठी तुला ते मांस माझ्या हवाली करावे लागेल. असे तू केलेस तर मी समजेन कीं, तुझ्यात चांगुलपणा भरपूर आहे. ते पुण्याचं काम ठरेल.

चांडाळ बोलतो, माझी हिम्मत नाही कीं, मी हे खराब झालेले मांस तुला खाण्यासाठी देईन. तू कांहींहीं बोललास तरी मला माहित आहे कीं, ते पाप आहे. तुझ्याबरोबर मी सुद्धा त्या खालच्या जगात फेकला जाईन. दुसरे असे कीं मला ते खावयाचे आहे. जर मी ते तुला दिले तर मी काय खाणार?

विश्वामित्र बोलतात, तुझ्या म्हणण्याप्रमाणे जरी ते पाप असले तरी मी मोठे तप करून आम्हा दोघांना त्यातून बाहेर काढू शकतो. मला त्या विद्येचे ज्ञान आहे. आता मला सांग दोन पर्याय आहेत. एक ते न खाऊन मरावयाचे मी कां, ते खाऊन नंतर तुझा व माझा तपस्या करून उद्धार करावयाचा?

चांडाळ बोलतो, प्रत्येक माणसाच्या वर्णानुसार त्यांने काय करावे व काय न करावे ते त्याला ठरवण्याचा हक्क असतो. त्याप्रमाणे ह्या दोन पर्याया पैकी कोणता जास्त दोषपूर्ण आहे ते पहावे लागेल.

विश्वामित्र बोलतात, मला माहीत आहे कीं, असे खराब मांस देणे हे पापकारक ठरते व तसे खाणेसुद्धा पापकारक आहे. तरी ते सामान्य परिस्थितीत असते. आता आपद्धर्माची परिस्थिती आहे. म्हणून आता आपद्धर्माचे नितीशास्त्र लागू होते. ते वेगळे असते. आपद्धर्माचे नितीशास्त्र सामान्य परिस्थितीतील नितीशास्त्रापेक्षा भिन्न असते. त्यामुळे त्या बदललेल्या परिस्थितीत जे नियम पाळावयाचे ते मी तुला सांगत आहे. त्या बदललेल्या परिस्थितीत तसे खराब झालेले खाणे व दान करणे पाप ठरणार नाही, तेंच मी तुला प्रथमपासून सांगत आहे. म्हणून तू आता मला ते खाण्यास देऊ शकतोस.

चांडाळ बोलतो, तुझ्या ह्या युक्तीवादावरून मला स्पष्ट दिसते कीं, तू वैदीक धर्म व आर्य संस्कृती समजत नाहीस. तुझ्यामते आपद्धर्मानुसार खराब खाद्य खाणे योग्य ठरते.

विश्वामित्र बोलतात, जर जीवंत रहाण्यासाठी खराब खाद्य खावे लागत असेल तर ते रास्त आहे आर्य संस्कृतीनुसार. त्यात कोठलेही पाप नसते. अशा खाण्यामुळे कधी कोणाला पाप लागत नाही. सामान्य परिस्थितीत कोणीही शहाणा असे खाद्य खाणार नाही त्यासाठी नितीशास्त्राची आवश्यकता नसते तो साधारण अक्कलेचा विषय असतो.

चांडाळ बोलतो, एकादा ब्राह्मण असे खराब झालेले व ते सुद्धा कुत्र्याचे मांस अशा अशुभ ठिकाणातून घेतो व ते सुद्धा माझ्यासारख्या नीच माणसाकडून हे सगळे कसे अष्लाघ्य ठरणार नाही ते मला समजत नाही. तशा कामात मदत केल्यामुळे मला कोणती शिक्षा भोगावी लागेल ते सांगता येणार नाही. आपण ब्राह्मण अहात तेव्हां आपल्याला सगळे गुन्हे माफ असतात तसे आमचे नसते, आम्हाला आम्ही न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा सुद्धा भोगावी लागते. त्याचे भान ठेवून आपण हे अशुभ काम करणे टाळावे व मला संरक्षण द्यावे.

भिष्म पुढे सांगतात, असे बोलून तो वृद्ध चांडाळ शांत बसतो. विश्वामित्र त्यानंतर ते मांस उचलतो व त्या चांडाळाला नमस्कार करून तेथून निघतो. त्यानंतर तो त्या वनात जातो जेथे त्याने त्याचे कुटूंब ठेवले होते. त्यानंतर तो विधीपूर्वक ते मांस पुजून प्रथम

त्याच्या आराध्य देवतेला व पितरांना देतो. त्यातील एक भाग ऐंद्रेयअग्नीला अर्पण करतो. त्यानंतर ते तो शिजवतो व इंद्राला वेदातील आज्ञेनुसार अर्पण करतो. ते तो करत असतांना सगळीकडे पाऊस पडू लागतो. तो बारा वर्षाचा दुष्काळ संपतो. सगळ्यांना त्या मांसाचा प्रसाद दिल्यानंतर तो स्वतः ते खातो. त्यानंतर त्याचे सगळे दोष नष्ट होतात. जे कृत्य कोणालाही त्रास न देता व स्वताच्या संरक्षणासाठी करतो ते कधीच कोणत्याही दोषास कारणीभूत ठरत नाही. त्यानंतर तो ब्राह्मण मोठी तपस्या करण्यासाठी बसतो ज्यात तो त्या चांडाळाचेसुद्धा भले करत असतो. जीवंत रहाण्यासाठी जे निष्पाप कृत्य केले जाते ते आपद्धर्माच्या नितीशास्त्राप्रमाणे मान्य असते. त्याला दोष समजले जात नाही. म्हणून तू सुद्धा अशा बिकट परिस्थितीत पाप पुण्य ह्याचा विचार न करता आपद्धर्माचे नियम समजून तुझे कार्य करत रहा असे भिष्म सांगतात.

शांती पर्व भाग एकशे चाळीसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे एकेचाळीसावा

युधिष्ठीर विचारतात, एक भयंकर कृत्य ज्याबद्दल तुम्ही आता सांगितले ते मला मान्य करताना भय वाटते. असे असेल तर चोरांचा सन्मान करावा लागेल राजास. मला ते पटत नाही. नैतिकतेच्या सगळ्या नियमांचे उल्लंघन होत असेल तर मग ते नियम कां असावेत असे वाटू लागते. मला तसे नाही करता येणार.

भिष्म बोलतात, मी तुला नाही सांगत कीं, तू ते सगळे करावेस जे वेदात दिले आहे. मी तुला अनुभव काय आहे व त्याचे परिणाम काय आहेत ते सांगत आहे. ते त्याचे तात्पर्य आहे. राजाने सांगकाम्याप्रमाणे काम करून चालत नाही. त्याला त्याच्या विवेकाचा उपयोग करूनच त्याची कामं करावयाची असतात. नैतिक मुल्ये हा एक भाग आहे त्यापेक्षा त्याचा अर्थ काय घ्यावयाचा ते राजाला समजले पाहिजे. त्याशिवाय इतर शहाणे लोक काय करत असतात तशा परिस्थितीत ते राजाने अभ्यासावयाचे असते. अशाप्रकारे जो राजा सतर्क असतो तोंच चांगले राज्य चालवू शकतो. त्याचा जीवनाचा अनुभव, त्याचा नैतिक शस्त्राचा अभ्यास आणि निरीक्षण हे त्याला योग्य निर्णय घेण्यात मदत करत असतात. राजाचे काम असे असते कीं, कोणी पुस्तकात आखून ते देऊ शकत नाही. अनेक घटक विविध प्रकारच्या ताकदीने एकत्र काम करत असतात त्यांच्या त्या वैविध्य पूर्ण मिश्रणाचा परिणाम ती घटना असते म्हणून त्याबद्दलचे निर्णय राजाला त्याच्या बुद्धीनेच घ्यावयाचे असतात. कोठल्याही एकाद्या घडून गेलेल्या घटनेशी असलेल्या साम्याने तो फसता कामा नये. म्हणूनच म्हणतात कीं, नैतिकतेचे नियम लवचिक असतात. ज्या राजाकडे ती प्रज्ञा नाही तो अक्षम्य चुका करत असतो व त्याचे परिणाम तो व त्याची जनता भोगत असते. आपद्धर्माच्या काळात वर वर चांगले दिसणारे अंतर्यामी वाईट असू शकते. राजाकडे सुक्ष्म दृष्टी असली पाहिजे ते समजण्यासाठी. कारण त्या गोष्टी कोणी कोणीला शिकवू शकणार नाही. पुस्तकात पाहून त्याप्रमाणे काम करणारा हमखास चुका करणार. त्यासाठी त्याचा विवेक शाबूत असला पाहिजे. तेथे त्याची ती प्रज्ञा त्याला उपयोगी येत असते. कांहीं राजांची ती प्रज्ञा उत्तम असते ते

विविध परिस्थितीत योग्य निर्णय घेत असतात व यशस्वी होतात. ज्यांच्याकडे ती नसते ते मार खातात. नियम मोडणारे जर चतूर असतील तर ते पुस्तकात दिलेल्या सुचना चूक आहेत हे दाखवण्याचा प्रयत्न करत असतात. त्या त्यांच्या चतूराईने राजा किंवा न्यायाधीश फसता कामा नये. धूर्त माणसे त्यांच्या मतलबासाठी नैतिकतेच्या दिलेल्या नियमांचे विपर्यस्त अर्थ राजापुढे मोठ्या खूबीने सादर करत असतात व जर राजा अथवा न्यायाधीश सावध नसेल तर तशा युक्तीवादाने चक्रावून जाऊ शकतो. असे होणे राजा व त्याच्या प्रजेसाठी चांगले नसते. असे धूर्त पक्षकार संहितेत दोष आहे असे ठामपणे सांगून राजाची दिशाभूल करत असतात. त्याने राजा फसता कामा नये. सामान्य परिस्थितीतील नैतिकतेचे नियम व आपद्धर्माच्या काळातील संहितेत न दिलेले नियम ह्यांच्यात ते गोंधळ करून न्यायपीठाची फसवणूक करू शकतात. त्यासाठी परिस्थिती नेमकी कोणती आहे त्याचा प्रथम निर्णय घ्यावयाचा असतो. कारण संहिता साधारणपणे सामान्य परिस्थितीबाबतचेच निवेदन करत असते. आपद्धर्माबाबत राजाला निर्णय घ्यावयाचे असतात आणि ते त्या बदललेल्या परिस्थितीनुसार असतात. असे धूर्त लोक माणसातील राक्षस समजावेत कारण, त्याचा बहाणा असा असतो कीं, ते सर्वज्ञ आहेत. त्याची बोली, मुद्दे मांडण्याची रीत सगळे कपटी असते. म्हणून त्याना मी राक्षस असे बोललो आहे. त्याची बोली तर्कदोषाने भरलेली असते. असे सांगतात कीं, नैतिकतेचे नियम चर्चा करून तसेंच स्वताच्या अनुभवसिद्धतेने समजून घेता येतात. इंद्राने स्वतः तसेंच सांगितले आहे किं, बृहस्पतीसुद्धा तेंच सांगत असतात. कांहींच्या मते संहिता निरर्थक नसते. कांहीं तिचा अभ्यास करूनसुद्धा त्याप्रमाणे काम करत नाहीत. इतर कांहीं म्हणतात कीं, नैतिकता ही जगाची रीत ठरवते. त्याप्रमाणे नैतिकता म्हणजे नेमके काय ते चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या धोरणाचे ज्याने मदत होते ती नैतिकता असे समजतात. सामान्य परिस्थितीत असलेली त्या तीन धोरणांची अंमलबजावणी आणि आपद्धर्माच्या परिस्थितीत असलेली अंमलबजावणी ह्यात बराच फरक असतो व त्यामुळे सगळा वाद उपस्थित होत असतो. ऋषी उशनास दैत्यांना सांगतो कीं, सामान्य माणूस त्याच्या निष्पाप मनाने जे सांगतो त्यात नैतिकता असते. ते पुढे सांगतात कीं, जर जीवनाचे अनुभव संहितेच्या दर्शनापेक्षा विपरित

असतील तर संहिता चूक असे समजावे. अनेक प्रकारच्या शंकाकुशंकाने भरलेली माहिती नैतिकतेचे समर्थन अथवा विरोध करू शकत नाही. आपलेच उदाहरण पहा, तू त्या दारूण युद्धात गुंतला होतास व मी माझ्या क्षात्र धर्माप्रमाणे त्या युद्धात असंख्य निरपराध क्षत्रियांचा संहार केला. त्यात प्रथमदर्शनी कोणती नैतिकता होती? तरी ते आपण केले. ह्याचा अर्थ आपण नेहमीच नैतिकतेच्या शुद्ध तत्त्वांचे पालन करत नसतो आपण आपद्धर्माची परिस्थिती उत्पन्न करत असतो व त्यात गुंतल्यावर त्याचे व त्या अनुसार आवश्यक असलेल्या वेगळ्या नैतिक मुल्यांचे समर्थन करत असतो. माझ्या ह्या मताशी कदाचित कांहीं असहमत असतील.

भिष्म पुढे सांगतात, ब्रह्माने शेळी, घोडा व मनुष्य वगैरे उत्पन्न केले त्याचे कारण ते एकमेकांचा उपयोग करतील व त्यांचे जीवित कार्य संपन्न करतील असा आहे. आपण वापरले जाणे हे एकदा लक्षात घेतले कीं, त्या संदर्भात असलेले नैतिकतेचे नियम आपण स्वीकारतो. कसे वापरले जाणार ते नैतिकता ठरवत असते. जीवो जीवस्य जीवनं, हा एक नैतिकतेचा नियम आहे. सृष्टीतील सगळ्या गोष्टी एकमेकांना कशातरी प्रकारे वापरत असतात. त्यातून सुख प्राप्त व्हावयाचे असते असे मानले जाते. जेव्हां खाण्यासाठी मारले जातात तेव्हां ते कृत्य निष्पाप समजले जाते परंतु जेव्हां ते त्या पेक्षा इतर कारणाने मारले जातात तेव्हां ते पाप ठरते. कृती तीच परतु, त्या मागील उद्देश निराळा असतो. म्हणजे माणसाच्या कृतीपेक्षा त्या मागील उद्देश नैतिकतेसाठी प्रधान असतो. ज्या राजाच्या देशांत चोर लुटमार करतात तो त्याचे कर्तव्य करत नाही म्हणून तो नैतिकतेच्या दृष्टीने गुन्हेगार असतो. सामान्य जाणीवेनुसार लोकांवर अवाजवी कर आकारणे हे नैतिकतेच्या दृष्टीने अक्षम्य असते. कारण बर्याच वेळी आपली सामान्य अक्कल सांगत असते काय योग्य व काय अयोग्य व ते आपला आत्मा सांगत असतो. म्हणून ते मूळभूत नैतिकतेचे तत्त्व समजले जाते. "आपला आतला आवाज", आपल्याला मूळभूत नैतिकता काय ते सांगत असतो पण आपण त्याकडे दुर्लक्ष करून चुकीच्या गोष्टी करत असतो त्याने पाप होत असते. प्रजा त्यांच्या राजाचे व त्याच्या कारभाराचे मुल्यमापन त्यांच्या आतल्या आवाजानेच सहसा करत असतात. इंद्र बोलतात कीं, जेव्हां बाका प्रसंग येतो, तेव्हां राजाला तो प्रसंग आणणार्या दुष्कृतांना कठोर शासन करून

परिस्थिती सुधारावयाची असते. त्यांना दया दाखवणे नैतिकतेच्या नियमानुसार अक्षम्य असते.

युधिष्ठीर विचारतो, मला सांगा असा कोणता नियम असतो त्याला अपवाद करता येत नाही. त्याचे पालन करावेच लागते.

भिष्म सांगतात, जे वेदाचे अध्ययन करतात व शुद्ध जीवन जगत आहेत अशा ब्राह्मणांचा कधी अवमान करावयाचा नाही. त्यांचे ऐकत रहावे कारण ते कधी खोटा सल्ला देत नसतात. त्यांचे न ऐकणार्या राजांचे नुकसान झाले असल्याची अनेक उदाहरणं आहेत.

शांती पर्व भाग एकशे एकेचाळीसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे बेचाळीसावा

युधिष्ठीर बोलतो, "अहो पितामहा, आपण खूप चतूर अहात, तुमचा सगळ्या संहितांचा अभ्यास झाला आहे. मला सांगा संरक्षणाची मागणी करणार्याला मदत करणार्याचे श्रेय कोणते"?

भिष्म सांगतात, त्याचे श्रेय फार मोठे असते. प्राचीन काळी होऊन गेलेले महान राजे जसे शिवी लोकांना संरक्षण देऊनच मोठे झाले होते. त्यासाठी एक कथा सांगितली जाते एका कबुतराची ती तुला सांगतो, अरे युधिष्ठीरा, एका कबुतराने त्याच्या अतिथीसाठी स्वताचे मांस देण्याचे कबूल केले होते. ती कथा सांगतो, ती कथा ऋषी भृगुनी राजा मुचुकुंद्राला सांगितली होती ती अशी आहे , भृगु सांगतात, त्या अतिप्राचीन काळी एक पारधी वनातून पक्षी पकडण्याचे काम करत होता. त्याचे डोळे लाल होते व तो यमा सारखा दिसत होता. त्याचे पाय लांबडे होते पण त्याची पावलं लहान होती. त्याचा जबडा रुंद होता. त्याला कोणी मित्र नव्हते. तो एकटाच रहात होता. तो फार क्रूर दिसत होता म्हणून त्याच्या जवळ कोणी जात नव्हते. तो जहरी सापासारखा भयंकर वाटत होता. तो अनेक वर्षे तसा रहात होता त्याला कल्पनासुद्धा नव्हती कीं, तो पापं करत आहे. तसा तो एकदा अरण्यात रहात असतांना एक मोठे वादळ सुरू होते. त्यात मोठी झाडं उन्मळून पडतात. थोड्याच वेळांत सगळी पृथ्वी पाण्याने भरून जाते. तरी पाऊस थांबत नव्हता. ते पाहून त्या पारध्याला भीती वाटली. भीतीने व थंडीने कुडकुडत तो त्या अरण्यातून जात होता. सगळे वन पाण्यात बुडाले होते. अनेक पक्षी त्यांच्या घरट्यातून खाली पडले होते. त्यातील कित्येक मेले होते. मोठे हिंस्र प्राणी सुरक्षित ठिकाणी गुहांमधून बसले होते. सगळे प्राणी फार घाबरलेले होते. तो पारधी थंडीमुळे गारठला होता. त्याला कांहीं हालचाल करता येत नव्हती. त्या अवस्थेत तो एक मादी कबुतर जमिनीवर पडलेली पहातो. तो तिला उचलतो व त्याच्याकडे असलेल्या पिंजर्यात तिला ठेवतो. तो स्वतः फार घाबरलेला होता, तिला कांहीं करत नाही. तरी तो पापात्मा त्या अवस्थेतसुद्धा तीला पकडून एक पाप करतोच.

तो एक मोठे झाड पहातो ज्यावर असंख्य पक्षी त्यांची घरटी करून रहात होते. थोड्या वेळांनी वादळ शमते. सगळे पुर्ववत होते. तो समजतो कीं, त्याचे घर तेथून फार दूर आहे. म्हणून तो त्या विशाल वृक्षाखाली ती रात्र काढण्याचे ठरवतो. त्या झाडाला तो लवून नमस्कार करतो व बोलतो की, त्याला त्या वृक्षाखाली रहाण्याची परवानगी मिळावी. नंतर तो तेथे असलेली कांहीं पानं जमिनीवर पसरून त्याची शय्या करतो. डोक्यासाठी एक मोठा दगड घेतो. तसा ते थकलेला तेथे झोपतो. त्याच्याकडील पिंजर्यात ती कबुतरी होती.

शांती पर्व भाग एकशे बेचाळीसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे त्रेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतात, त्या वृक्षाच्या एका फांदीवर एक कबुतर होते. ते त्याच्या पिलाबरोबर रहात होते. त्याची पत्नी सकाळी दाणे आणण्यासाठी गेली होती ती अजून आली नव्हती. त्यामुळे ते कबुतर रडू लागले. तो तिला हाका मारत बोलतो कीं, तो व त्यांची पिलं तिची वाट पहात आहेत व तिला तो हाका मारत असतो. तिच्या बद्दल तो चौकशी स्वताशींच करत असतो. पत्नीशिवाय त्याचे घरटे त्या कबुतराला व्यर्थ वाटत होते. तो शोक करत बोलत असतो कीं, जर तू नाही आलीस तर मी जीव देईन. तुझ्या शिवाय मी जगू शकणार नाही. ते कबुतर त्याच्या प्रिय पत्नीची स्तुती करत होता. त्यावरून त्याचे तिच्यावरील प्रेम किती उत्कट होते ते समजत होते. पत्नीशिवाय पति निरर्थक असतो असे तो वारंवार बोलत होता. ज्याला पत्नी नाही त्याला घरसुद्धा नसते असे तो बोलत होता.

शांती पर्व भाग एकशे त्रेचाळीसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे चव्वेचाळीसावा

भिष्म सांगत होते, ते त्या कबुतराचे शोक मग्न होऊन केलेले रुदन पारध्याच्या पिंजर्यात असलेल्या त्याच्या पत्नीला ऐकू येत असते. तिला तिच्या पतिचा फार गर्व होत असतो. ती त्यास सांगते त्या पिंजर्यातून कीं ती त्याच्या जवळ आहे परंतु, त्या पारध्याच्या पिंजर्यात कैद आहे. ती त्याला बोलते, मी तुला जे सांगते ते ऐक, आपल्या भल्यासाठी ते अवश्यक आहे. त्या पारध्यास मला सोडावयास सांग. तो आता झोपला आहे. असे सांगतात कीं, जे दुसर्याचे प्राण वाचवतात त्याना पुढच्या जन्मात मोठा लाभ होतो. झाडावरील कबुतर ते ऐकते व त्याप्रमाणे करण्याचे ठरवते.

शांती पर्व भाग एकशे चव्वेचाळीसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे पंचेचाळीसावा

भिष्म सांगतात, ते त्याच्या पत्नीचे आर्त ओरडणे ऐकून त्याला फार आनंद होतो कीं, त्याची पत्नी जवळच आहे. त्याच्या डोळ्यात आनंदाश्रू येतात. त्याला माहीत असते कीं तो पारधी आहे व त्याचे काम पक्षांना मारण्याचेच असते. तरी तो त्याच्याकडे जातो व विचारतो, "आपल्यासाठी मी काय करावे असे आपल्याला वाटते"? शत्रूला सुद्धा चांगली वागणूक द्यावी असे शास्त्र सांगते जेव्हां तो आपल्या घरी आला असेल. आमचे झाड सगळ्यांना आसरा देत असते. विशेषकरून जे भटकत असतात त्यांना आश्रय देणे गृहस्थाचे कर्तव्य असते असे सांगतात. ते ऐकल्यावर तो पारधी त्या पक्षाला बोलतो, मी थंडीने गारठलो आहे. मला उब मिळेल असे कांहीं करा. ते ऐकल्यावर तो पक्षी पालापाचोळा जमा करतो व एक शेकोटी पेटवण्याची व्यवस्था करतो. त्यातील एक पान चोचीत धरून तो ते पेटवण्यासाठी घेऊन जातो. थोडा अग्नी घेऊन तो तेथे येतो आणि ती शेकोटी पेटवतो. पारधी त्या शेकोटीच्या मदतीने स्वतांला उब देऊ लागतो. तो पारधी त्या कबुतराला सांगतो, त्याला भूक लागली आहे कांहीं खाणे मिळाले तर बरे होईल. पक्षी सांगतो आमच्याकडे खाद्याचा साठा नसतो. आम्ही दररोज जाऊन ते आणून खात असतो. जसे संन्याशी करतात. ते बोलत असतांना त्याला ते बोलण्याची लाज वाटू लागली. तो पुन्हा त्या पारध्याला बोलतो, ऋषी सांगतात कीं अतिथीची सेवा करण्यात मोठे पुण्य असते. असे बोलून तो पुण्यवान कबुतर त्या अग्नीला तीन फेर्या मारून त्यात उडी घेतो. ते पाहून पारधी आश्चर्यचकित होतो. तो स्वताशी बोलतो हे मी काय केले. मी मोठे पाप केले त्या पक्षाला त्याचे जीवनदान करावयाला लावले. इतका कठोर मी कसा झालो. त्याला त्याची लाज वाटू लागली. तो शोक करू लागतो.

शांती पर्व भाग एकशे पंचेचाळीसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे सेहेचाळीसावा

भिष्म सांगतात, त्या निष्पाप पक्षाला अग्नीमध्ये जळतांना पाहून त्या पारध्याला फार दुःख होते. त्या पापाचे प्रायश्चित्त तो अनंत काळ भोगेल असे त्याला वाटते. शोक करत तो स्वताला सारखा दोष देत रहातो. तो स्वताला दोष देतो कारण तो पारधी झाला आहे. माझ्यामुळे तो पुण्यवान पक्षी माझ्यामुळे मेला असे त्याला वाटत असते. आपण सुद्धा मरावे असे त्याला वाटत होते. त्या पक्षाच्या जीवदानामुळें त्या निर्दय पारध्यात अमुलाग्र बदल होतो. तो दयाळू होतो. सगळे सोडून तपस्या करण्याचा तो निर्धार करतो. ह्यापुढे तो चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्या त्रिसुत्राने जीवन जगेल असा तो नेम करतो. वैराग्य धारण केलेला तो पारधी त्याची काठी, टोकदार काटा, लोखंडी पिंजरा असे सगळे टाकून देतो. त्या आधी त्यात पकडलेली ती मादी कबुतर मोकळी करतो.

शांती पर्व भाग एकशे सेहेचाळीसावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे सत्तेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतात, तो पारधी महाप्रस्थानाला निघतो व ती पक्षिण आपल्या नवर्याच्या आठवणीने शोक करत रहाते. त्याच्या आठवणीने चूर झाली होती. तिला सहन होत नसते कीं तिचा प्राणनाथ आता ह्या जगात नाही. विधवा स्त्री जशी इतरांच्या नजरेत एक किंव करण्यासारखी होते तसे तिचे झाले होते. त्याच्या सहवासाच्या विविध आठवणी तिला सतावत होत्या. प्रेम करणारा जीवलगा अशारितीने गेला त्याचे तिला अतिशय दुःख झाले होते. सगळे सोडून आपणसुद्धा निजधामाला जावे असे तिला वाटत होते. पतिशिवाय जीवन निरर्थक होते तिच्यासाठी. आता जगण्यात अर्थ नाही असें ती समजत होती. त्या दुःखाच्या आवेगाने ती त्या शेकोटीमध्ये उडी घेते व स्वताचा अंत करते. तिला तिचा पति दिसतो एका रथात बसलेले स्वर्गाकडे जात होता. त्याच्याभोवती देवता उभ्या होत्या. तेथे त्याचे स्वागत होत होते. असा तो स्वर्गात जात होता हे ती पहाते.
शांती पर्व भाग एकशे सत्तेचाळीसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे अठ्ठेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतात, तो पारधी त्या पक्षाच्या जोडप्याला रथात बसून स्वर्गात जाताना पहातो. ते पाहून त्याच्या दुःखात भर पडते. तो स्वगत बोलतो, मीसुद्धा तपस्या करून त्यांच्या योग्यतेला जाणार. तो निश्चय केल्यावर पारधी त्याचे महाप्रस्थान निश्चित करतो. अन्न त्याग करतो व घोर तपश्चर्या करत तो स्वर्गाचा रस्ता धरतो. प्रवास करतांना त्याला एक सुंदर तलाव दिसतो त्या असंख्य कमळ होती. तो तेथील जंगलात जात असतो तेथे कोणी मनुष्य नव्हते. काटेरी झुडपं होती. त्यातून जाताना त्याचे अंग रक्तबंबाळ झाले होते. त्या वनात असंख्य पशू विविध प्रजातीचे वावरत होते. मोठ्या झाडांच्या एकमेकांशी होणार्या घर्षणातून आगी लागत होत्या. त्या आगीने ते जंगल जळत होते. त्या वणव्यात तेथील अनेक पशू जळून गेले होते. तो ठरवतो कीं तो सुद्धा त्या वणव्यात जीव देईल. तसे करून आपण सगळ्या पापातून मुक्त होऊ असे तो समजतो, त्याप्रमाणे तो त्याचा जीव देतो. त्याचे सगळे पाप धुतले जाते. तो स्वताला स्वर्गात पहातो त्याच्या भोवती यक्ष आणि गंधर्व होते. अशारितीने ते तिघे स्वर्गात जातात.

अरे युधिष्ठीरा. पश्चात्तापाने जो त्याग करतो तो स्वर्गात जातो असे ह्या कथेत सांगितले आहे. ते सर्वश्रेष्ठ श्रेय असते.

शांती पर्व भाग एकशे अठ्ठेचाळीसावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकोणपन्नासावा

युधिष्ठीर विचारतो. अज्ञानामुळे जेव्हां कोणी पापकृत्य करतो त्यापासून त्याचे शुद्धीकरण कसे होते.

भिष्म सांगतात, ह्यासंदर्भात एक संभाषण झाले होते सौनकाचा मुलगा इंद्रोता आणि जनमेजय ह्यांच्यामध्ये ते सांगतो. फार प्राचीन काळी अज्ञानामुळे एक राजा ब्राह्मणांचा वध करतो. त्यामुळे त्याचे पुरोहित त्याचा त्याग करतात. त्यामुळे पश्चातापाने तो राजा जनमेजय वनात भटकत रहातो. तो पुण्य मिळवण्यासाठी प्रयत्न करू लागतो. त्याला वाटत असते कीं, त्यामुळे ब्रह्महत्त्येचे पातक धुतले जाईल. असाच तो भटकत असतांना तो सौनकाच्या मुलाला, इंद्रोताला भेटतो. तो त्याचे पाय धुतो. इंद्रोत त्याला रागाने बोलतो कीं, त्याने मोठे पाप केले आहे. माझ्या पाया कशाला पडत आहेस असे विचारतो. येथून तू निघून जा असे तो त्याला बोलतो. तू आम्हाला मेल्यासारखाच आहेस. तू पाप करण्यासाठी जन्मला आहेस असे वाटते. तुझ्या एका कुकर्मामुळे तुझे सात पिढ्यांचे पूर्वज भ्रष्ट झाले आहेत. तू त्यांची घोर निराशा केली आहेस. तुझे जगणे व्यर्थ आहे. तू मेल्यावर नरकात जाशिल. तेथे तुझा छळ होईल. त्यानंतर तू नीच कुळांत जन्म घेशिल.

शांती पर्व भाग एकशे एकोणपन्नासावा संपला.

# शांती पर्व

## भाग पन्नासावा

भिष्म पुढे बोलतात, "आपण मला रागावता ते योग्य आहे माझी तिच योग्यता आहे. माझ्या कृत्याची आपण निंदा केली ते योग्यच होते. तरी मला पश्चात्ताप होत आहे त्याचा कांहींच महत्व नाही कां"? त्या आगीने मी जळत आहे. मी फार दुःखी आहे. मला यमाची भिती वाटते. ते सगळे मी कसे माझ्या मनातून काढू ते सांगा. आपला राग सोडून मला मार्गदर्शन करा. पूर्वी मी ब्राह्मणांचा सन्मान करत असे तसा ह्यापुढे करत राहीन. माझ्यामुळे माझा वंश संपला नाही पाहिजे. माझ्यामुळे त्यांचे नुकसान होते त्याचा मला फार दुःख होत आहे. माझ्या एका कृत्यामुळे माझ्या सगळ्या आप्तांचे नुकसान होणे योग्य नाही. जसे ऋषी गरीबाला वाचवतात कांहीं न घेता तसे आपण मला वाचवावे. मला मृत्यूनंतर नरकात जावयाचे नाही. माझे ज्ञान कमी आहे ते वाढवा.
सौनकाचा मुलगा इंद्रोत बोलतात, काय कमाल आहे पहा, अज्ञानी मनुष्य सत्तेच्या बळावर कांहींही करू शकतो. त्यानंतर ज्ञान प्राप्त झाले कीं, दुःख सुद्धा करतो. ज्याने चांगुलपणा सोडला आहे तो कधीच पुण्य कमवू शकत नाही. वेदांत ब्राह्मणांचे किती महत्व असते ते दिले आहे ते शिकून घे. ब्राह्मणांचा आदर करावयाला तुला शिकावे लागेल. जेव्हां ते तुझ्यावर रागावयाचे बंद करतील तेव्हां तुझा उद्धार होऊ शकेल. तुझा स्वर्गाचा मार्ग मोकळा होईल. आतापासून तू चांगुलपणा, माणूसकी व भूतदया तुझ्या आचरण्यात आण तरच तुझे कल्याण होईल. जनमेजय बोलतो, माझ्या पापाचे प्रायश्चित्त मी करू इच्छितो. तुम्ही माझ्यावर कृपा करा. इंद्रोता बोलतो, उद्धटपणा व गर्व तुला कायमचे सोडावे लागतील. त्याच प्रमाणे लोभीपणा व हट्टीपणा तुला सोडावे लागतील. तुला मी मार्गदर्शन करत आहे म्हणून ते ब्राह्मण मला दोष देतील पण मी त्याचा विचार न करता तुला सांगत आहे पुण्याचा मार्ग कोणता. त्याचे आचरण करावे लागेल. आमच्यातील जे सूज्ञ आहेत ते मला समजून घेतील. मी सांगतो तसे केलेस तर तुझे पाप धुतले जाईल. त्यासाठी तू ह्यापुढे कोणत्याही ब्राह्मणाला त्रास देणार नाही असे वचन मला दे. जनमेजय तसे वचन देता. शांती पर्व भाग एकशे पन्नासावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे एकावन्नावा

इंद्रोता पुढे सांगतो, आता मी तुला पुण्याचा मार्ग काय ते सांगतो. कारण कीं, तुला तुझ्या कर्माचा पश्चात्ताप झाला आहे ते समजणे योग्य ठरेल. ते समजल्यानंतर तू योग्य मार्गाने तुझे जीवन जगू शकशिल. राजाने सगळ्या प्राण्यांशी आत्मियतेने वर्तन ठेवले पाहिजे. जसे माता व प्रेमळ पिता त्यांच्या लेकरांशी करतात. पुण्य मार्गात ज्या तीन गोष्टी सांगितल्या जातात त्यातील पहिली आहे माणूसकी, त्याची व्याख्या आहे, कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरूद्ध जे वागणे त्याला अमानुषपणा असे म्हणतात.* दुसरी आहे **चां**चांगुलपणा , त्याची व्याख्या आहे, मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरुद्ध जे वागणे त्याला वाईटपणा असे म्हणतात. तिसरी आहे भूतदया त्याची व्याख्या आहे,* सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्या प्रमाणे जगणे आणि सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असें म्हणतात. *जे त्या विरुद्ध वागतात ते दुष्ट समजले जातात.*

जो हे तीन नियम पाळून त्याचे जीवन जगतो तो पुण्यवंत समजला जातो. पुण्य कमावण्याचे हे तीन मार्ग सांगितले आहेत. ह्यात जो चुकीचे निर्णय घेतो तो पाप करत असतो. त्यासाठी सत्पात्र इसमास दान करणं, भेटवस्तु देणे अशा गोष्टी येतात. तीर्थयात्रा करणे व इतर पुण्यवंतांबरोबर सहवास करणे हेसुद्धा येते. त्याबाबात मी तुला ययातिची गोष्ट सांगतो, तो बोलतो, जो मर्त्य त्याच्या हयातीत तीर्थयात्रा करून पुण्य कमावतो तो स्वर्गात जातो. त्यासाठी कुरुक्षेत्र उत्तम म्हणून सांगितले आहे. जे सरस्वती नदीच्या तटावर आहे. त्यापेक्षा जास्त पवित्र आहे पृथोदक क्षेत्र त्याची महती फार आहे. त्या तीर्थाचे पाणी पिणारा कधी अकाली मृत्यू पावत नाही. आता तुला समजले आहे कीं पुण्यमार्ग कसा आहे तेव्हां प्रथम महारस नांवाच्या तीर्थक्षेत्री जाऊन स्वताला शुद्ध करून

घे. त्यासाठी पुष्करसुद्धा चांगले आहे. ते प्रभास ठिकाणी आहे. ते केल्यानंतर तुला नवजीवन मिळेल. त्यानंतर तू मानस सरोवराकडे जाशिल ज्यातून सरस्वती व दृष्द्वती अशा दोन नद्या निघतात. त्यात स्नान करावे. माणसाच्या सुख आणि दुःख ह्याबद्दलच्या कल्पना वास्तविक नसतात. म्हणून त्यात रमत राहू नये शहाण्या माणसाने असे सत्यवत सांगतात. पुण्याचा मार्ग आचरणारा सामर्थ्यवान राजा यशस्वी होत असतो. तू आधी ब्राह्मणाचा वध केला आहेस त्या कृत्याबद्दल तुला पश्चात्ताप करावा लागतो. पश्चात्ताप करणे म्हणजे तसे कृत्य तू पुन्हा करणार नाहीस असे ब्रह्माला आश्वासन तू द्यावयाचे असते. ते झाले कीं, तू त्या कृत्याच्या पापफळांपासून मुक्त होत असतोस. चांगल्यांच्या संगतीत रहात जा. त्यामुळे तुझ्यात चांगलेपणा वाढत असतो. ज्या प्रकारच्या संगती त्याप्रकारची गती माणसाला मिळत असते. ब्रह्महत्त्या करणारा जर पश्चात्ताप करत असेल तर त्याने त्या मघा सांगितलेल्या तीर्थांत स्नान करण्याचे पुण्य त्याला ते स्नान न करतांच मिळत असते. इतके खर्या पश्चात्तापाचे महत्व असते. मनू सांगतात, ऋषी अघमर्शनने दिलेल्या सकाळ, दुपार व संध्याकाळच्या प्रार्थना नियमितपणे केल्याने मोठे पुण्य मिळत असते ते तू करत रहा. देव आणि असूर ब्रह्माला विचारतात, पाप व पुण्याच्या बंधनातून मनुष्य कसा मुक्त होतो ते सांगा. बृहस्पती सांगतात, मनापासून जो समुद्रात त्यातील खार्या पाण्यात स्नान करतो त्याची सगळी पाप व पुण्यसुद्धा नष्ट होतात. म्हणून देवाला प्रसाद देण्या आधी तो प्रसाद मिठाच्या पाण्याने धुण्याची पद्धत असते. तसा धुतलेला प्रसाद देवाला द्यावयाचा असतो. कांहीं खाद्य पदार्थ शिजवण्याआधी ते अशाप्रकारे धुण्याची पद्धत असते. त्या नंतर ते शिजवावयाचे असते.

भिष्म पुढे सांगतात, इंद्रोत पुढे जनमेजयाला अश्वमेध यज्ञ करण्यास सांगतात. त्यानंतर तो ब्रह्महत्त्या करणारा सोमलोकांत जातो. त्याचा उद्धार होतो कारण तो पुण्य मार्गाचे आचरण प्रामाणिकपणे करत असतो.

शांती पर्व भाग एकशे एकावन्नावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे बावन्नावा

युधिष्ठीर विचारतो, "आपण कधी कोण्या मर्त्य जीवास मेल्यानंतर पुन्हा जीवंत झाल्याचे पाहिसे आहे कां"?

भिष्म सांगतात, तुला त्या संदर्भात एक संवाद झाला एका गिधाड आणि कोल्ह्यामध्ये तो सांगतो. असे एकदा घडले होते निमिषारण्यात. ब्रह्मणाला एक फार मोठे डोळे असलेला पुत्र झाला होता बर्याच मिनत्वारीने. परंतु, ते बाळ लहानपणीच मृत झाले. सगळे त्याच्या मृत्यूचा शोक करू लागले. त्याचे अग्नीसंस्कार करण्यासाठी त्याला घेऊन त्याचे नातेवाईक समशानभूमीत जातात. त्या बालकाला छातीला लावून ते शेवटच्या विधीसाठी तयारी करत होते. त्यांना त्याच्यावर अग्नीसंस्कार करण्याची इच्छा होत नव्हती. त्यांच्या रडण्याने तेथे एक गिधाड आले. तो गिधाड त्याने सांगतो, "आता तुमचा त्याच्याशी कांहीं संबंध राहिलेला नाही. त्याला मातीवर ठेवून तुम्ही घरी जा. सगळे लोक तेंच करतात व त्यांचे मृत नंतर आम्ही खात असतो. ती येथील तर्हा आहे". प्रत्येकाला मरण असते तसे तुमचेसुद्धा येणार आहे. येथे आम्ही व कोल्हे असतो त्या मृताची विल्हेवाट लावण्यासाठी. गिधाडाचे ते बोलणे ऐकल्यावर त्या नातेवाईकाना समजते कीं आता गेले पाहिजे. ते सगळे जोराजोराने रडत जाऊ लागतात.

त्या सुमारास एक कोल्हा तेथे येतो. तो त्या शोक करणार्या लोकांना सांगतो कीं, "अजून सूर्य तळपत आहे म्हणून तो बाळ पुन्हा जीवित होण्याची शक्यता आहे. म्हणून तुम्ही जाऊ नका. सूर्य मावळल्यावर तो जर नाही उठला तर जा. असे तो त्यांना सांगतो. जसे ऋषी कोणतीही इच्छा न ठेवता यज्ञ करत असतात तसे तुम्ही त्या मुलाची परत येण्याची प्रतिक्षा करा. प्रेमाची माणसं फक्त जवळ असतात जेव्हां अडचणीची वेळ असते. ते तुमचे प्रेम मला समजते". असे तो कोल्हां बोलत होता. ते ऐकून ती शोक करणारी माणसं परत त्या मुलाकडे जातात जेथे त्याचे प्रेत ठेवले होते. गिधाड बोलतो, "त्या परत येणार्या लोकांना अरे मूर्ख अहात कां, त्या नीच कोल्ह्याच्या बातात कसे

फसता? त्याच्या शरीराला त्या आत्म्याने केव्हांच सोडले आहे, तेथे पुन्हा जाऊन तुम्हाला काय मिळणार आहे? तपस्या कराल तर कदाचित कांहीं फायदा होईल केवळ शोक करून काय मिळणार आहे"? केवळ दुर्दैव म्हणून तो मेला आहे व तुम्ही रडत अहात. त्यापेक्षा तपस्या करा. त्यात योग आहे म्हणजे त्यातून आत्मा व ब्रह्म ह्यांचे मिलन सिद्ध होणार असते. माणसाचे सगळे भोग चांगले व वाईट त्याच्या गत जन्माच्या कर्मानुसार होत असतात. त्यात ह्या जन्माच्या कर्माने तुम्ही बदल करू शकणार नाही. हा नियम सगळ्यांना सारखाच लागू असतो. पुण्यमार्गाने जगा म्हणजे दुर्दैव तुमच्या पदरी येणार नाही. त्या मुलाच्या आठवणीने त्रागा करत बसू नका. त्यातून कांहीं मिळणार नाही. आता घरी जा व परत येऊ नका. ते त्या मुलाचे आप्त साश्रूनयनांने परत फिरतात. गिधाड त्याचे फंख फडफडवत बोलतो, सगळ्यांना मारावे लागते, तुम्हाला सुद्धा मरावयाचे आहे. कोणी लवकर जातो तर कोणी मरता मरत नाही पण शेवटी मरतोच". कोल्हा त्यांना सांगतो, "त्या मूर्ख गिधाडाच्या बोलण्यात जाऊ नका. तो तसाच सगळ्या सुतक्यांना सांगून त्यांच्या घरी धाडत असतो. ते नेहमीचेच आहे. तुम्ही सूर्य मावळेपर्यंत येथे त्याच्या जवळ बसा कारण तो तेव्हा उठणार आहे". गिधाड बोलतो, "हजार वर्ष जरी बसलात तरी तो उठणार नाहीस एकदा मेला की, मेला अशी सृष्टीची रित आहे. चला उठा आणि निघून जा. माझे बोलणे दुष्टपणाचे वाटेल परंतु, त्यात शहाणपण आहे". ते ऐकल्यानंतर ते सुतकी लोक स्मशानभूमी सोडून जाऊ लागतात. त्याच वेळी तो कोल्हा बोलतो, "श्वेताचा मुलगा असांच मेला होता लहानपणी, तोसुद्धा सरणावर असतांना जीवंत झाला होता. तसांच तुमचा सुद्धा जागा होईल. बर्याच वेळा कांहीं देवता शोक करणार्यांच्यावर दया येऊन तसे करू शकते". ते ऐकल्यावर ते सुतक करणारे त्या बाळाला मांडीवर घेऊन पुन्हा रडू लागले.

ते पाहिल्यावर गिधाड बोलते, "कशाला तुमचा वेळ वाया घालवता रडण्यात. त्याच्या मृत शरीराला अशारितीने थोपटून तो उठणार नाही. त्याच्यासाठी तपस्या लागते. त्या श्वेताची तपस्या होती म्हणून तो उठला, तुमच्याकडे कोठे तशी तपस्या आहे? त्या कपटी कोल्ह्याच्या सांगण्याने तो उठणार नाही. अशा हजारो कोल्ह्यांनी जरी त्यांचे जीव सोडले तरी ते शक्य होणार नाही. कोणी रुद्र नाहीतर स्कंध नाहीतर ब्रह्म किंवा विष्णू

आशिर्वाद देतील तर ते शक्य होईल त्यासाठी तुमच्याकडे तपस्या (सहादोषांपासून मुक्त होणे म्हणजे तपस्या) नाही मग ते कसे होणार? सहादोषाने (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) पिडलेले तुम्ही लोक कधीही त्या मुलाच्या अंगात प्राण घालू शकणार नाही".

तुम्हाला तो हलकट गिधाड हकलवतो कारण त्याला तुमचे बाळ खावयाचे आहे. ते तुम्ही समजत नाही. ते बाळ मेले आहे ह्यावर माझा विश्वास बसत नाही".

भिष्म बोलतात, त्या मृत बाळाचे आप्त समजत नाहीत कोणाचे ऐकावयाचे. कोल्ह्याचे फसवे परंतु, आवडणारे बोलणे व गिधाडाचे स्पष्टोक्ती ह्यातील कोणते मानावयाचे ते त्याला समजत नव्हते.

भिष्म पुढे सांगतात, तो दोघे धर्मशास्त्राच्या नियमांची चर्चा करत होते पण त्यांना भूक लागली होती. त्या बालकाचे नातेवाईक समजत नव्हते काय करावे. अखेरीस ते ठरवतात कीं, सूर्य मावळेपर्यंत बसावयाचे. त्यांना लक्षात येत नव्हते कीं, ते दोघे त्याना गोंधळात टाकत होते. स्मशानात होणारे ते नाट्य शंकर व उमा पहात होते. ते तेथे अवतरतात व त्या मुलाला वर देऊन उठवतात. त्या मुलाची आप्त शंकराच्या पाया पडतात. महादेव त्या मुलाला शंभर वर्षाचे दीर्घ आयुष्य बहाल करतात. महादेव कोल्ह्यावर व गिधाडावर सुद्धा प्रसंन्न होतात. ते त्यांना त्यांच्या उपवास करण्यासाठी दुवा देतात व त्यांचा उद्धार करतात. ते त्या मुलाचे नातेवाईक त्या सजीव झालेल्या बाळाला घेऊन त्यांच्या घकी जातात. सगळीकडे आनंदी आनंद होतो.

शांती पर्व भाग एकशे बावन्नावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे त्रेपन्नावा

युधिष्ठीर विचारतो. "मला सांगा पितामहा, उच्च समाज व नीच समाज कसे ठरते? एकादा मनुष्य उच्च समाजाचा आहे कां नीच आहे ते कसे ठरवावयाचे ते सांगा.

भिष्म सांगतात, लोकपाल देवतांमधील इंद्र व यम ह्यांच्यात ह्या बाबत बोलणे झाले ते सांगतो, त्या समाजातील पुरूषांचे वळण जसे असते त्यावर ते ठरत असते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे त्यासाठी त्या समाजातील पुरूष त्यांच्या स्त्रीयांशी कसे वागतात ते पहावयाचे असते. ज्या समाजातील पुरूष आपल्या स्त्रीयांना मारतात, अपमान करतात तो समाज नीच समजला जातो व त्यातील पुरूष नीच समजले जाता. ज्या समाजातील पुरूष त्यांच्या स्त्रीयांचा सन्मान करतात ते समाज व त्यातील पुरूष उच्च समजले जातात. समाजाची उच्चता अथवा नीचता त्या समाजातील पुरूषांवर निर्भर करत असते. त्या समाजातील स्त्रिया नेहमीच उच्च असतात. समाजाचे उच्चनीचतेचे मुल्यमापन पुरूषांच्या गुणांवर अवलंबून असते कारण आपले समाज पुरूषप्रधान आहेत.

युधिष्ठीर पुढे विचारतो, मला सांगा, माणसाचे खाण्याबद्दलचे नियम कोणते आहेत. ज्याच्या पालनाने मनुष्य सधृढ रहातो.

भिष्म सांगतात, त्यासाठी अथर्ववेदाचे ऋषी अंगिरस सांगतात कीं, माणसाने खाण्याबाबत पांच नियम आयुर्वेदात सांगितले आहेत ते पाळावेत ते असें,

- जे आवडते ते खावे,
- जे पचेल ते खावे,
- पोटापुरते खावे,
- जे आरोग्यास घातक ते खाऊ नये.
- दुसर्यास खाण्याचा आग्रह करू नये.

शांती पर्व भाग एकशे त्रेपन्नावा संपला.

## शांती पर्व

## भाग एकशे चौपन्नावा

युधिष्ठीर विचारतात, मला सांगा पाप कशातून उद्भवते व कशामुळे ते वाढते.

भिष्म सांगतात, मी तुला सांगतो पापाचे मूळ कशात असते. लोभ हे पापाचे मूळ आहे. त्यामुळे चांगुलपणा, माणूसकी व बर्याचवेळा भूतदया संपुष्टात येते. लोभातून खोटेपणा, कपट कारस्थानं उत्पन्न होतात. ते संपन्न न झाल्याने त्यातून क्रोध उत्पन्न होतो. विविध प्रकारच्या माणसाच्या वासना त्या लोभाच्या मुळांशी असतात. अति लोभामुळें माणसं पाप करण्यास प्रवृत्त होतात. त्यांचे विवेक संपतात. गर्व, उर्मटपणा, नीचपणा, दुष्टपणा, निर्लज्जपणा असे दोष त्यांच्या स्वभावात उत्पन्न होतात. अशा दोषांच्या वाढण्यामुळे इतर विकृत्या त्यात येतात जसे, विवंचना, कंजूषपणा, बदनामी, वासनांधपणा, संशयीपणा, सत्तेचा उन्माद, व्यभिचार, असे विविध दोष त्याच्यात उत्पन्न होतात. त्या सर्वामुळे पाप वाढत जाते. त्यातून सर्व प्रकारचे पाप तो करू लागतो. त्यात तो अडकत जातो. जे सहा दोष सांगितले आहेत त्यात लोभाचा क्रम तिसरा आहे. पहिला आहे काम जो जरी दोष असला तरी तो शरीराच्या विविध कार्यांसाठी आवश्यक असतो. त्यानंतर क्रोध सांगितला आहे तो लोभाची पूर्तता झाली नाही तर उत्पन्न होतो. ज्यांचे मन अस्वस्थ असते त्यांच्या मनात शंकाखोरपणा घुसतो व त्यानंतर हे सगळे एका मागोमाग एक त्याच्या मनात घर करू लागतात. ते न व्हावे ह्यासाठी माणसाने मनाची शुद्धी करावयाची असते. लोभात अडकलेला कितीही मोठा विद्वान ब्राह्मण असला तरी तो शुद्राहूनही नीच ठरतो. दुसर्याचे भले झालेले त्याला रुचत नाही. त्यातून मत्सर व आसुया त्यांच्या मनात उत्पन्न होते व मोठ्या पापाला जन्म देते. पाप म्हणजे काय ते समजून घे. ज्या कृत्यामुळे अथवा ज्या विचारां मुळे आत्म्याची अध्यात्मिक उर्जा खर्च होते ते पाप असे समजले जाते. आणि ज्यामुळे आत्म्याची अध्यात्मिक उर्जा वाढते त्याला पुण्य समजले जाते. ह्या अध्यात्मिक उर्जेच्या उच्च नीचतेवर त्या माणसाचे तीन गुण सत्त्व, रजो आणि तमो ठरत असतात. ज्याची उर्जा उच्च ते सात्त्विक असतात. त्यापेक्षा कमी ते रजोगुणी असतात व

त्याहीपेक्षा कमी असेल तर तो तमोगुणी ठरतो. त्यासाठी गुणांची त्रिसुत्री दिली आहे चांगुलपणा, माणूसकी व भूतदया त्यांच्या प्रामाणिक पालनाने पुण्य वाढते व पाप कमी होते. म्हणून अरे युधिष्ठीरा तू ह्या त्रिसुत्रीचे पालन कर व जे त्याप्रमाणे जगतात त्यांच्या बरोबर तुझे राज्य चालव.

तसे पाहिले तर पापाच्या नागाला असंख्य फणे असतात. वर दिलेले व न दिलेले असे अनेक दोष हे त्याचे फणे असतात. त्यांतून ते फुत्कार करत असतात व असंख्य प्रकारच्या विकृत्यांचे वीष ओकत असतात. आता मी तुला सांगतो जे लोभाच्या व त्याप्रमाणे दोषात अडकत नाहीत त्यांचे वळण कसे असते. जे उपकार प्रामाणिकपणे फेडतात, जे चांगले काम करतांना घाबरत नाहीत, ज्याना कोणतेही व्यसन नाही, ज्यांच्या वागण्यात, बोलण्यात संयम असतो, ज्यांच्यासाठी सुख व दुःख समान असते, जे ब्रह्माच्या कृपेसाठी वचनबद्ध असतात, जे निष्काम मदत करतात, जे जास्त देण्याचे पहातात व घेण्याबाबत संकुचित असतात, ज्यांच्या स्वभावात दयाबुद्धी आहे, जे आपल्या पितरांचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करतात. ज्यांच्यात पापपुण्याची भावना असते, जे संहितेत दिलेले सगळे नियम प्रामाणिकपणे आचरणात आणतात, जे सत्यासाठी (ज्यामुळे पुण्य प्राप्त होते ते सगळे असा अर्थ सत्याचा आहे ह्या ठिकाणी) प्राण द्यावयाला तयार असतात, जे सत्यवाद्यांच्या परंपरेने जातात, ते सत्यासाठी निर्भयपणे काम करतात, ज्यांची मति स्थिर आहे, जे सत्पात्र लोकांसाठी मृदू असतात व विकृतांशी कठोर असतात, ज्यांच्या वासना संयमित असतात, जे निगर्वी असतात, जे प्रसिद्धीच्या मोहाने बद्ध होत नाहीत, जे दिलेला शब्द पाळतात, अशा लोकांना सात्त्विक माणसे असे समजले जाते. अशांना भिती, क्रोध आणि दुःख बाधत नाही. त्यांच्यात दंभ नसतो. दाखवायचे एक व करावयाचे दुसरे असे त्यांचे वागणे नसते. ते सामान्यतः समाधानी असतात, ते लोभात अडकत नसल्याने त्यांच्या सगळ्या प्रेरणा नेमस्त असतात. अशा लोकांचा तू तुझ्या राज्यात संग्रह करून त्यांच्या मदतीने तुझे राज्य करशिल तर तुझा उदंड उत्कर्ष होईल. फायदा व तोटा, आनंद व खेद, पसंत व नापसंत, जीवन व मृत्यू, अशा लोकांना प्रभावित करत नाहीत. कारण साधारणपणे असे लोक कळत अथवा नकळतपणे ब्रह्माच्या शोधात असतात. ज्यांच्यात तसे गुण

नसतात ते मार्गभ्रष्ट होणारे असतात म्हणून तू त्यांच्या पासून नेहमी सावध असशिल.
शांती पर्व भाग एकशे चौपन्नावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे पंचावन्नावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "आपल्या म्हणण्याप्रमाणे सगळ्या पापाचे मूळ लोभ आहे असे समजावयाचे. कशामुळे मनुष्य कुप्रसिद्ध होतो. आणखीन मला सांगा कशाला अज्ञान व अज्ञानी समजावयाचे".

भिष्म सांगतात, जो इसम अजाणता पापकृत्य करतो, ज्याला समज नाही की, त्याचा अंत समीप आला आहे व जो इतरांचे भले झालेले पाहू शकत नाही त्या विरुद्ध काम करतो तो समाजात कुप्रसिद्ध होतो. अशामुळे तो नरकात जातो. अज्ञान हे दुःखाचे कारण होऊ शकते. अज्ञान चांगले नसते, त्याची सबब देऊन वेळ मारून नेण्याने नुकसान होत असते.

युधिष्ठीर बोलतो, अज्ञानाची कारणे, त्यांचा उगम, त्याची वेळ, त्याचे इतर परिणाम, त्यातून उत्पन्न होणारे दुःख असे सगळे सांगा.

भिष्म सांगतात, मोह, द्वेष, अविवेक, अतिआनंद, अतिदुःख, गर्व, वासना, क्रोध, आळस, तिरस्कार, इच्छा अशांमुळे मति भ्रष्ट झाल्याने अज्ञानाला सुरूवात होते. आता सांगतो तुझ्या इतर प्रश्नांची उत्तरं.

अज्ञान व लोभ कसे माणसात उत्पन्न होतात ते सांगतो.

भिष्म सांगतात, अज्ञान म्हणजे प्रत्यक्षात आत्म्याबद्दलच्या गरजांचे अज्ञान असे असते. ते कोणत्या दोषांतून व्यक्त होते ते सांगतो, लोभ, द्वेष, विवेकशून्यता, आनंदी होणे तसेंच दुःखी होणे, गर्व, वासना, क्रोध, अहंकारीपणा, बेपर्वाई, जळफळाट अशा बर्याच प्रकारच्या प्रतिक्रीयांतून ते व्यक्त होत असते. म्हणजे त्या प्रतिक्रीया देणारे आत्म्याबद्दल अज्ञानी असतात. त्यांना जाणीव नसते कीं, अशा त्यांच्या वागण्यामुळे त्यांच्या आत्म्याची अवनती होत असते. त्यांचा अध्यात्मिक र्हास होत असतो. हे सगळे लोभातून उत्पन्न होतात असे ऋषी सांगतात. लोभ प्रथमतः शरीराच्या गरजांसाठी ब्रह्माने दिला आहे पण त्याची गरज वाढत जाणे हें अज्ञानाचे लक्षण असते. लोभ त्याच्या शरीराच्या मित गरजांपुरता असण्याने कांहीं बिघडत नसते. आत्म्याच्या बाबत जागृत

असलेले तो लोभ तेवढाच ठेवतात परंतु, अज्ञानी तसे करत नाहीत व त्यांच्या दोषांची वाढ होत जाते. शहाणा तेवढ्यासाठी आपल्या शरीराच्या नित्य गरजांचे नियमन करून लोभापासून मुक्त रहातो व त्याच्या आत्म्याचे अध्यात्मिक सामर्थ्य कमी होऊ देत नाही.
जनक, युवनस्व, वृषदर्भी असे थोर राजे त्यांच्या लोभाचे नियंत्रण करत होते. त्यामुळे ते स्वर्गात गेले. त्याप्रमाणे तू सुद्धा तुझ्या शरीराच्या किमान गरजांप्रमाणे तुझा लोभ नियंत्रित करून तुझ्या आत्म्याला मदत कर व उच्च कोटीचा साधक हो. त्यामुळे तुला चिरशांती प्राप्त होईल.
शांती पर्व भाग एकशे पंचावन्नावा संपला.

## शांती पर्व

## भाग एकशे छप्पन्नावा

युधिष्ठीर बोलतो, असे काय केले म्हणजे माणसाला श्रेय मिळते पुण्यवंत होण्याचे ते सांगा. भिष्म सांगतात, सतत वेदांचा ध्यास करणारे, नेहमी पुण्य कर्मात म्हणजे अध्यात्मिक उर्जा वाढवण्यात मग्न असतात, असे करणारे त्या प्रकारचे श्रेय प्राप्त करत असतात.

युधिष्ठीर विचारतो, "श्रेय मिळवण्याचे किती मार्ग आहेत. त्यातील कोणते असे आहेत जे ह्या आणि नंतरच्या जीवनात उपयोगाचे असतात".

भिष्म सांगतात, निरनिराळे ऋषी श्रेयाचे विविध प्रकार सांगतात. त्यातील अतिमहत्वाचा आहे संयम राखणे आपल्या इच्छांवर. ज्याला ते जमले तो अध्यात्मिक प्रगती झपाट्याने करत असतो. एकदा माणसाच्या मनाला संयम करण्याची सवय झाली कीं, त्याची अध्यामिक प्रगती चांगली होऊ लागते. त्या संयमामुळे तो नको त्या इच्छा उत्पन्न होऊ देत नाही. त्यामुळे त्याचे अध्यात्मिक बळ वाढत असते. त्याचे वेगळे सुख त्याला मिळू लागते. त्याचे लोभ आणि मोह कमी होतात. चुकीच्या वासनांमुळे जे भरकटणे होत असते ते होत नाही. त्याच्या मनाचा स्वताचा चाबूक तो वापरतो व त्याच्या इंद्रियांच्या बहकण्याचे तो चांगले नियंत्रण करत असतो. एकदा मनाला ती शिस्त लागली कीं, पुढे वासनांचे नियंत्रण सोपे होत असते. मनाला जशी सवय लावतो तसे ते वागत असते ह्या मनाच्या गुणाचा तो चांगला उपयोग करत असतो. सर्व इच्छांत संयमनाची इच्छा सर्वश्रेष्ठ असते. त्या इच्छेचे बळ तो वाढवतो. हे सगळे सवयीने करता येते. सवयीनी तो त्याच्या विनाकारणच्या इच्छा कमी करत असतो व त्या मार्गाने तो निरिच्छ अवस्थेत जातो. इच्छांचा त्याग झाल्यामुळे तो एका विलक्षण अशा समाधानी अवस्थेत असतो. हे मला पाहिजे, ते पाहिजे, असे त्याला वाटत नाही. त्यातून उदासिन अवस्था त्याला प्राप्त होत असते. एकदा ती अवस्था प्राप्त झाली की, पुढचा मार्ग सोपा होत असतो. तरी कधी कधी शरीराच्या गरजांच्या इच्छा प्रसंगी उसळून येत असतात. त्यांचे आपद्धर्माच्या नियमानुसार तो नियंत्रण करत असतो. कालांतराने

त्याची वासना इतकी कमी होते कीं, तो स्थितप्रज्ञ होतो. अर्थात् त्याला बराच काळ तशी साधना करावी लागते. त्याच्यामध्ये चांगुलपणा, माणूसकी व भूतदया वाढत असते. त्यामुळे तो पुण्यवंत होत असतो. देवता त्याच्यावर संतुष्ट झालेल्या असतात. कालांतराने तो ब्रह्माशी एकजीव होतो. सगळ्यांच्या कडे पहाण्याची त्याची दृष्टी निरीच्छ असते म्हणजे त्याला कांहीं त्यांत आवड नसते त्याला औदासिन्य प्रवृत्ती असे म्हणतात. त्याला कशाचीच गरज नसल्याने त्याचे सगळे उपक्रम एक एक करून बंद होतात. तो तपस्या करावयाचेसुद्धा बंद करतो. कारण त्याची त्याला गरज नसते. हे सगळे तो करतो कारण त्याला संयम करण्याचे जमले. इतके संयम महत्वाचे असते. संयमी माणसाबद्दल गैरसमज होतो कीं, तो नपुसक आहे, त्याच्यात कांहीं दम नाही वगैरे परंतु, ते गैरसमज असतात ते खरे नसतात. जसे मुक्त मनुष्य व ठार वेडा ह्यांच्यात साम्य असते तसे हे असते. जसे दोन टोकाचे सारखे वाटतात.

युधिष्ठीर विचारतात, "वनात जेव्हां ते साधना करत असतात तेव्हां तेथे कांहींच नसते ज्यामुळे एकाद्याच्या वासना प्रक्षुब्ध होतील, तेथे त्याच्या संयमाचे काय काम"?

भिष्म सांगतात, "वासना माणसाच्या कल्पनांतून उत्पन्न होत असतात त्यासाठी तो कोठे आहे त्याचा कांहीं संबंध नसतो".

वैशंपायन पुढे सांगतात, ते संभाषण मोठे अमृततुल्य होते. त्याने युधिष्ठीराचे समाधान झाले होते. तरी त्यांचे संभाषण पुढे होतच होते. दोघांना त्यात रुची होती.

शांती पर्व भाग एकशे छप्पन्नावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे सत्तावन्नावा

भिष्म बोलतात, जे जाणकार आहेत ते सांगतात कीं, तपस्येत सगळे असते. त्यातूनच संयम व इतर उपयुक्त गुण उत्पन्न होत असतात. अज्ञानी म्हणजे मूर्ख ज्याना कधी तपस्या केली नाही तो त्या सगळ्याचे हंसे करतो. असें सांगतात प्रत्यक्ष ब्रह्माने व महादेवांनी ज्यांना स्वयंभूने उत्पन्न केले आहे त्यांच्या विचार सागरातून, तेसुद्धा सतत तपस्याच करत असतात. सगळी पृथ्वी ब्रह्मदेवानी तशीच त्यांच्या विचारांतून उत्पन्न केली जे प्रथम फक्त विचार म्हणजे केवळ कल्पना होते. मायेच्या भ्रमातून त्याला मूर्त रुप प्राप्त झाले व हि सृष्टी बनत गेली. म्हणजे जे आपण अनुभवतो ते सगळे मुळात तपस्येतून आले आहे. शास्त्रज्ञ शोध लावतात त्या आधी खूप विचार करत असतात ती एक प्रकारची तपस्या असे समजले जाते. मन एकाग्र करून कांहीं करणे ह्यालाच वेदांत तपस्या असे सांगितले आहे. पापक्षालनासाठी जी तपस्या सांगितली आहे ती त्यापेक्षा वेगळी असते. त्यात लोकपाल देवतांच्या उपदेवतांच्यावर ध्यान एकाग्र करण्याचे सांगितले आहे. असे समजतात कीं, त्या देवता पापक्षालन करतात. प्रत्यक्ष किती पापक्षालन होते तो प्रश्न वेगळा आहे. त्यासाठी अनेक प्रकारच्या तपस्या सांगितल्या आहेत अगम शास्त्रात. जे शिवाने प्रथम दिले असे समजले आहे. अनेक प्रकार सांगितले आहेत त्यातील कांहीं सांगतो, अन्नत्यागाची तपस्या, सत्य बोलण्याची तपस्या, इंद्रिय संयमनाची तपस्या अशा असंख्य तपस्या अगम शास्त्रात वेगवेगळ्या सिद्धी प्राप्त करण्यासाठी करण्याचे त्यात दिले आहे. मातेची सेवा करणे, समाजाची सेवा करणे, दलिताची सेवा करणे, आजार्याची सेवा करणे, दानं करणे, मदत करणे असे आणखीन कित्येक प्रकार अगमाबाहेर इतरत्र सांगितले आहेत इतर ऋषींनी. ह्यावरून तपस्या म्हणजे काय ते तुला समजले असेल त्याचे स्वरुप व्यापक आहे.

शांती पर्व भाग एकशे सत्तावन्नावा संपला.

## शांती पर्व

## भाग एकशे अठ्ठावन्नावा

युधिष्ठीर विचारतो, "अगदी प्राचीन काळापासून ब्राह्मण, ऋषी आणि पितर सत्याचा भलामण करत आले आहेत हे सत्य म्हणजे नेमके काय"? मला ते सगळे ऐकावयाचे आहे.

भिष्म सांगतात, सत्य ही संज्ञा विविध अर्थाने विविध जागी ज्ञानी लोक वापरत असतात. जसे एका शब्दाचे अनेक अर्थ असतात तसे सत्य ह्या शब्दाचे सुद्धा निरनिराळ्या संदर्भात निरनिराळे अर्थ अभिप्रेत असतात. त्यातील कांही सांगतो, सत्य म्हणजे कर्तव्य. सत्य म्हणजे मोक्ष, सत्य म्हणजे जे घडले ते तसे, सत्याचा आणखीन एक अर्थ आहे तपस्या, सत्य म्हणजे योग, सत्य म्हणजे यज्ञ, सगळे अशारितीने सत्यावर अवलंबून आहे असे समजले जाते. आता मी तुला सत्याची विविध रुप दाखवतो. ती तेरा प्रकारची आहेत. चांगुलपणाच्या ज्या विविध अवस्था असतात ते तेरा सत्याचे प्रकार म्हणून सांगितले आहेत, ते असे, निःपक्षपातीपणा, संयम, क्षमाशिलता, नम्रता, सहनशिलता, समजूतदारपणा, त्याग, ध्यान करणे, दयाबुद्धी, सन्मान, अहिंसा आणि धैर्य. सत्य नित्य असते त्यात बदल होत नाही. त्यात दिलेले गुण एकमेकांशी भांडत नाहीत. तपस्या करून ते प्राप्त करता येतात. संयमाच्या मदतीने जेव्हां वासनांतून मनुष्य मुक्त होतो, आणि स्वताला व दुसर्याला समान दृष्टीने पहातो तेव्हां त्या सत्याला निःपक्षपातीपणा असे समजले जाते. मन आणि इंद्रीय नियंत्रणाला संयम म्हणतात. दुसर्याच्या गोष्टींकडे न पहाणे त्यात येते. सर्वांना मदत करण्याची इच्छा म्हणजे दयाबुद्धी. अशा सगळ्या सत्याच्या कृतींचे पालन करणारा सत्यवादी समजला जातो. त्यात क्षमाशिलता येते. सगळ्या वासनिक गोष्टींचा त्याग करण्याला त्याग म्हणतात. अशा सगळ्या सत्याच्या प्रकारांचे पावन करणे ह्याला सत्य (कर्तव्य) असे सांगितले आहे. ते सगळे सत्य म्हणून प्राचीन ऋषीने सांगितले आहेत. सत्याच्या विस्ताराचे वर्णन करता येणार नाही. म्हणून सगळे जाणकार सत्याची स्तुती करत असतात. सत्यवादी असणे ह्याला तपस्वी म्हणतात. त्यातून धर्माची त्रिसुत्री

(चांगुलपणा, माणूसकी व भूतदया) तयार झाली आहे. म्हणून अशा सत्याचा कोणी धिक्कार करावयाचा नसतो. सगळ्या अग्निहोत्राचा उगम ह्या सत्यातून झाला आहे. वेद सुद्धा त्या सत्याचाच भाग आहेत. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे सत्यातून पुण्याचा मार्ग व अध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त होत असते. हजार अश्वमेध यज्ञांपेक्षा सत्य जास्त प्रभावी आहे.

शांती पर्व भाग एकशे अठ्ठावन्नावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे एकोणसाठावा

युधिष्ठीर पुढे विचारतात, "मला सांगा क्रोध आणि वासना कशातून उत्पन्न होतात. त्याच प्रमाणे कशामुळे विवेक संपतो व दुःख सुरू होते? त्याच प्रमाणे मत्सर, घमेंड अणि कंड्या पिकवण्याची प्रवृत्ती कशी सुरू होते तेसुद्धा सांगा".

भिष्म सांगतात, ते एकंदर तेरा दोष आहेत. ते अज्ञानी माणसास झुलवत ठेवतात. त्यांच्या नादी लागलेला अखेरीस बरबाद होतो. मी तुला त्यांचे उगमस्थान कोणते ते सांगतो. त्यांच्या रमल्याने तो इसम पापात बुडून जातो. प्रथम सांगतो क्रोधाबद्दल, लोभात जेव्हां तो पूर्ण न होत नाही क्रोध ही प्रतिक्रीया मनात सुरू होते. त्याला इतर दोष सामील होतात. परंतु, क्षमाशिलतेच्या गुणाने त्याला थांबवता येते. म्हणजे प्रत्येक दोषाला उपायसुद्धा असतो. वासना हा आणखीन एक दोष ज्याबद्दल तू विचारत आहेस. शरीराच्या भोगेंद्रीयांच्या गरजेतून वासना उत्पन्न होत असतात. त्यात जेवढे रमाल तेवढी ती वाढत असते. मत्सर क्रोधाच्या नंतर सुरू होतो जेव्हां त्याला समजते कीं, दुसर्याची इच्छा पूर्ण झाली पण माझी नाही त्यातून त्याच्या बद्दल मत्सर वाटू लागतो. ज्याने त्याच्या वासना काबूत ठेवल्या आहेत त्याना त्यांच्या अतिरेकाचा त्रास होत नाही. त्यासाठी तपस्या करणे उपयोगाचे असते. मोहातून विवेकशून्यता सुरू होते. मनुष्य वेडावल्यासारखा होतो व अक्षम्य चुका करू लागतो जेव्हां त्याच्यात हा दोष उत्पन्न होतो. अविवेकी इसम सदोष व्यक्तींमध्ये त्यांचा समय व्यतीत करू लागतात. परंतु, जे विवेकी आहेत ते गुणीजनांच्या बरोबर त्यांचा समय व्यतीत करतात. इच्छा, अपेक्षा अपूर्ण राहिल्याने क्रोध शक्तिमानात कुरू होतो व कमजोरात दुःख सुरू होते. दुःख त्या माणसाची कमजोरी दाखवत असतो. विशेष करून मृत्यू मुळे जे दुःख होते ते अज्ञानाचे प्रतिक असते. पण ते दुःख त्या माणसा बद्दलचे प्रेम व्यक्त करण्यासाठी असते. नेहमीच दुःख क्रोधाची दुसरी बाजू नसते. म्हणून दुःख हि प्रतिक्रीया प्रेमाचे प्रतिक सुद्धा असू शकते.

जेव्हां त्याच्या इच्छा पूर्ण होत नाहीत तेव्हां तो बेताल होतो व द्वेष करू लागतो ज्यांच्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत. त्यातून अनेक विकृत कारवाया तो करू लागतो व त्यातून पाप तो करून त्याची अध्यात्मिक उर्जा खर्च करून स्वताचे त्याबाबतचे नुकसान करत असतो. संयमाने तो त्या दोषांचा नाश करू शकतो. व स्वताचे प्रयत्न करू लागतो ज्याने अखेरीस तो कामयाब होणार असतो. ती खरी पद्धत आहे ह्या दोषांचे निराकरण करण्याची. सज्जन व सात्त्विक लोकांच्या सानिध्यात राहून तो ते साध्य करत असतो. जेव्हां मनुष्य त्याच्या प्रयत्नात यशस्वी होतो तेव्हां त्याचा अहंकार वाढतो, तो इतरांना तुच्छ समजू लागतो त्यातून गर्व सुरू होतो. अहंकाराचे निंत्रण हाच त्यावर इलाज असतो. त्यासाठी पुन्हा मर्यादा तत्त्व उपयोगाचे असते. मत्सरामुळे मनुष्य इतरांबद्दल कंड्या (खोट्या बातम्या) पसरवून त्याद्वारा एकाप्रकारे त्या लोकांच्यावरील राग व्यक्त करत असतात. त्याचे कारण द्वेषभाव असतो. मला नाही तर तुलासुद्धा मिळू देणार नाही अशी सुडाची भावना त्या मागे असते. तुझ्या चुलत भावांत ते दोष होते म्हणून युद्ध झाले. तुझ्यात ते दोष नाहीत म्हणून तू अखेरीस यशस्वी झाला आहेस.

शांती पर्व भाग एकशे एकोणसाठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे साठावा

युधिष्ठीर बोलतो, मला माहीत आहे दयाळूपणा म्हणजे काय, कारण मी तशाच लोकांत असतो. परंतु, मला निर्दयी लोकांबद्दल माहीती नाही त्याबद्दल सांगा. लोक अशांपासून दूर रहातात. मला माहीत आहे जे निर्दयी असतात ते ह्या आणि नंतरच्या जगात नष्ट होतात. भिष्म सांगतात, द्वेष आणि गर्व ह्यांतून निर्दयीपणा उत्पन्न होत असतो. "मला नाही तुला नाही तर घास कुत्र्याला", अशा प्रवृत्तीतून तो विकसित होत असतो. सर्व प्रकारच्या दोषांतून तो वाढत असतो. त्यानाच राक्षस असे सुद्धा म्हणतात. अशा माणसं सगळ्यांचा द्वेष करत असतात. दुसर्यांना त्रास देण्यात ते आनंद समजतात. ते खोटे बोलत असतात. त्यांना स्वर्गात जावयाचे नसते. सर्व प्रकारच्या दोषांचे त्यांच्यात संकलन झालेले आढळते.

(भगवद्गीतेत दैवासुरसंपदा नांवाचा सोळावा अध्याय आहे त्यात ह्या दोषाचे वर्णन आहे ते पाहावे) अशा माणसांपासून शहाणे दूर रहातात.

शांती पर्व भाग एकशे साठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे एकसष्ठावा

वैशंपायन पुढे बोलतात, भिष्म व युधिष्ठीर ह्यांची प्रश्नोत्तरी संपल्यावर नकूल जो एक निष्णात तलवारबाज म्हणून ख्यातनाम होता तो पितामहाना विचारतो, "अहो आजोबा, मला सांगा सर्वात श्रेष्ठ शस्त्र कोणते असते? मला वाटते तलवार हेंच श्रेष्ठ शस्त्र आहे". कारण जेव्हां इतर शस्त्र बाद होतात तेव्हां योद्धा तलवार काढतो हे जगजाहीर आहे. एकटा तलवार बहादूर अनेक योद्ध्यांना पुरून उरत असतो. मला सांगा की, माझे म्हणणे योग्य आहे कीं, नाही. दुसरा प्रश्न असा की, प्रथम तलवार केव्हां तयार झाली व कोणी केली ते सांगा. त्या शस्त्राचे पहिले गुरू कोण होते? त्याचे शास्त्र कसे तयार झाले ते सांगा".

वैशंपायन पुढे सांगतात, शरपंजरी झोपलेले भिष्म नकुलाला सांगू लागतात. "माद्रीच्या मुला, तुला माहिती देण्याच्यावेळी माझ्या जखमांतून रक्त वाहू लागले आहे. आता जे सांगतो ते नीट ऐक, प्राचीन काळी विचार रुपी पाण्याचा अथांग सागर होता. त्यात शांतता होती. तेथे कांहींच नव्हते. सगळीकडे अंधार होता. त्यात कोणतेही वस्तूमात्र नव्हते. त्यात स्वयंभूने ब्रह्माला त्यांच्या विचारशक्तीतून उत्पन्न केले होते. त्यातून शीव आणि विष्णू उत्पन्न झाले. त्यांच्यातून नंतर ऋषी उत्पन्न झाले. ऋषींतून रचना परिमाण उत्पन्न झाले. ज्याला गणिती मुल्य नव्हते. त्यानंतर शीवातून तीन वास्तविक परिमाण जसे भार, काळ, गती (वास्तविक उर्जा, त्यात उष्णता, ध्वनी, विद्युत आणि प्रकाश) आणि अंतर उत्पन्न झाली त्यांना गणिती मुल्य होते. त्यानंतर त्यातून आकाश, वायुदेव, अग्नीदेव, जलदेव (वरुण) असे उत्पन्न झाले. त्यानंतर तीन जग (स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ) त्यांतून उत्पन्न झाली. त्यानंतर इतर सगळे त्यातून उत्पन्न होत गेले जे एकमेकांशी संबंधित होते. त्यात तारका, सुर्य, चंद्र, धुम्रकेतू, ग्रह, नक्षत्र असे होते. त्यानंतर काळाच्या माध्यामातून मोसम, ऋतू, महिने, दिवस, वर्षे, पंधरवडे, आठवडे असे तयार झाले. त्यातून प्रकाश आणि कळोख दिसू लागले. त्या सगळ्या संसाराच्या कारभाराचे सूत्र ब्राह्माचे ऋषी होते. त्यांची नांवे आहेत, मिरिची, अत्री, पुलस्त्य, पुलह, कृतू, वसिष्ठ, अंगिरस असे सात होते. त्यांना

मदत करणार्यात होते रुद्र, स्कंध, प्रचेता. ब्रह्माच्या अनेक कन्या उत्पन्न झाल्या त्यातून पापाचा मार्ग सुरू झाला. तो पर्यंत फक्त पुण्य मार्ग होता. ब्रह्माच्या कन्यांबरोबर ज्या मानस कन्या होत्या मानस ऋषी ह्यांच्या संपर्कातून अनेक देवी व देवता निर्माण झाल्या असा ह्या सृष्टीचा क्रम आहे. त्यासगळ्या अमानवी शक्ति होत्या. त्याचवेळी पितर, गंधर्व, अप्सरा, यक्ष, राक्षस ह्या आणखीन शक्ती तयार होत होत्या ज्यांच्याकडे ह्या सृष्टीचा कारभार होता. त्यानंतर पृथ्वीवर सर्वप्रकारचे प्राणी, वनस्पती उत्पन्न होत होते. त्याची गरज उत्पन्न झाली कारण पाप व पुण्य ह्यांचे संतुलन हा मोठा प्रश्न होता. त्यासुमारास ऋषींनी वेद सांगितले. त्यात सनातन धर्माचा आराखडा होता. त्यात नैतिकतेचे नियम, अध्यात्मिक उर्जाची व देवतांना प्रसन्न करण्यासाठी जे आगम आहेत ते दिले गेले. त्यात कर्मकांडाचा विकास झाला ज्यातून पुढे यज्ञविधींचे महत्व वाढत गेले. यज्ञांत वेदांतील ऋचा आणि सांम जे प्रथमदर्शनी निरर्थक आहेत त्यांचा उपयोग विविध देवतांना आवाहन करण्यासाठी होऊ लागला. त्या मध्ये आदित्य, वसू, रुद्र, साध्य, काश्यप, वसिष्ठ, गौतम, अगस्त्य, नारद, पर्वत, वालखिल्य असे ऋषी आहेत जे सृष्टीच्या कारभाराचे व्यस्थापन करत असतात. ते आणखीन ब्राह्मण म्हणून ओळखले जात होते. त्यांची थोर परंपरा राखणार्याना ब्राह्मण समजले जाऊ लागले. त्याना ऋषींच्या अनेक शुद्धतेच्या परंपरा आचरण्याचे काम होते. त्यातून ब्राह्मण वर्ण सुरू झाला. त्याच वेळी ब्रह्माच्या कन्याने ज्या पापाचा विकास केला त्यातून दैत्य, दानव, राक्षस तयार झाले होते. ते चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या पुण्याच्या मार्गांच्या विरुद्ध प्रवृत्ती माणसात व इतर प्राण्यांमध्ये उत्पन्न करत असतात. त्यातून सगळे वाद सुरू होतात. त्यामुळे राजाची नियुक्ती माणसाच्या समाजात सुरू झाली. त्यातून न्यायदंड तयार करावा लागला. त्याचे नैतिकतेचे व आपद्धर्माचे नैतिक नियम तयार झाले त्याची अंमलबजावणी करू लागला मनुष्य प्राणी. त्यातून न्याय व्यवस्था विकसित झाली. त्यातून क्षत्रिय वर्णाची निर्मिती झाली. राजाला त्याच्या न्यायदंडाच्या कामासाठी शस्त्र आवश्यक होते ते उत्पन्न करण्यासाठी ब्रह्माने यज्ञ केला त्यात गंधर्व, ऋषी व देव मदत करतात. त्या यज्ञाला नांव होते असी. त्यातून पहिले शस्त्र उत्पन्न झाले. त्याची निर्मिती पापाचा नाश करण्यासाठी झाली आहे. धारदार तेजस्वी तलवारी अशा विविध आकाराच्या निर्मित झाल्या. पुढे त्याचे अनेक प्रकार तयार झाले.

त्याच लहान मोठ्या दुधारी होत्या. त्याने काम पुरेसे होणार नाही म्हणून पापकर्मींना नष्ट करण्यासाठी असीतून अनेक इतर शस्त्रं तयार झाली. त्याच वेळी पाप शक्तीसुद्धा स्वताच्या संरक्षणासाठी व पुण्यशक्तींना नष्ट करण्यासाठी असीच्या विविध रुपांचा उपयोग करू लागल्या होत्या कारण पुण्यवंत देव आणि पापवंत दानव, असूर ह्यांच्यात युद्ध होभ लागली होती. ज्यात देवांचा राजा म्हणून इंद्राची नेमणूक ब्रह्माने विष्णूच्या मदतीने केली होती. एका अशाच महादेव आणि भागा असुर ह्यांच्या मधील लढाईत महादेव तलवारीने, ज्यातून अग्नी निघत होता, भागाचे डोळे फोडले होते. त्यातून उत्क्रांती होत गेली व गरजेप्रमाणे अनेक इतर शस्त्रं जसे भाला, सूळ, दूर फेकण्यासाठी बाण व ते फेकण्यासाठी धनुष्य असे उत्पन्न झाले होते. अशारितीने पुण्याच्या संरक्षणासाठी विविध युद्ध साहित्य उत्पन्न होत होते, ज्यांत स्कंधाचा मोठा हात होता. देवांनी दैत्यांच्या हल्ल्यांपासून संरक्षण म्हणून ढाल तयार केली अशारितीने ढाल व तलवार अशी जोडी अस्तित्वात आली. रुद्राने त्या शस्त्रांच्या चालवण्याच्या शास्त्राची निर्मिती केली व त्याचा प्रचार गुरूशिष्य परंपरने होत गेला. देव आणि दानव, दैत्य, असूर, राक्षस असे सगळे त्या विविध शस्त्रांच्या बरोबर साधे दगड, धोंडेसुद्धा वापरत होते शस्त्रासारखे. त्याशिवाय पेटते आगीचे गोळे सुद्धा शस्त्राप्रमाणे वापरले जात होते देव दानव युद्धांत. त्यातून युद्धशास्त्र आणि युद्धाचे नितीशास्त्र तयार होत होते. त्यात अनेक ऋषी योगदान करत होते.

त्यानंतर रुद्राने त्याचे शस्त्र, तलवार विष्णूला दिली पुढील युद्धात पापशक्तींचा पराभव करण्यासाठी. पुढे विष्णूने ती मरिची ऋषीकडे दिली. मरिचीने ती इतर ऋषांकडे सुपूर्द केली. त्यांनी ती देवांच्या राजा वासवा (इंद्र) ह्याला दिली. त्यानंतर ती असी त्याने लोकपाल देवांना दिली. त्यांनी ती मेनूला दिली जो सूर्याचा मुलगा होता. मेनूला ते देव बोलतात की, तो मानवाचा प्रमुख आहे तेव्हां तो ती शस्त्रविद्या मानवाला शिकवेल. त्यात एक बंधन घातले होते कीं, असी व त्याचे विविध प्रकार केवळ पुण्याच्या संरक्षणासाठी वापरले जातील. त्यांचा उपयोग पापाच्या कामासाठी मनुष्य करणार नाही. दुसरे बंधन असे घातले गेले कीं, असीचा उपयोग करण्याआधी शब्दांचा उपयोग करून समज द्यावयाची व त्यांने तो दोष करणारा सुधारला नाही तरच ते चालवावयाचे. तो पर्यंत दैत्य, दानव व इतर पापशक्तीचे पुरस्करते असी वापरावयाचे ऋषी शुक्राचार्या कडून शिकले होते

व त्यांनी त्यांची मंत्रविद्यासुद्धा प्राप्त केली होती ज्यामुळे त्यांची असी देवांच्या असीपेक्षा जास्त प्रभावी झाली होती. पुढे मेनूने ती परंपरा क्षुपाकडे सोपवली जो महादेवाचा अंश आहे. क्षुपाने ती ईश्वाकूला दिली. ईश्वाकूने ती पुरुरवाला दिली. पुरुरवाकडून ती अयुषकडे गेली. अयुषने नहूषाला दिली. तेथून ययातिकडे गेली. ययातिकडून पुरूकडे गेली. त्याच्याकडून ती अमृत्तार्याकडे गेली. त्याच्या कडून ती भूमिसयाकडे गेली. त्याच्या कडून ती भारताकडे परंपरेने गेली. त्याच्याकडून तू एलाविलाकडे गेली जो फार मोठा तपस्वी होता. त्याच्याकडून धूमधुमरा कडे गेली. तेथून ती कंबोजांकडे गेली. तेथून ती मुचुकुंद्राकडे गेली. त्याच्या कडून मरुत्तांकडे गेली. तेथून ती रैवतांकडे गेली. तेथून ती युवनस्वाकडे गेली. तेथून रघूकडे व तेथून हरिनस्वाकडे तेथून शुनकाकडे, तेथून ती उशनराकडे गेली. तेथून ती भोजांकडे गेली. तेथून यादवांकडे व तेथून सिवींकडे गेली. तेथून प्रतर्दनाकडे गेली. त्यांच्या कडून ती अष्टकांकडे गेली. तेथून ती प्रिशदस्वांकडे गेली. तेथून ती भारद्वाजांकडे गेली. त्याचे एकमेव वारस द्रोण होते त्यांनी ती त्यांच्या गुरूकुलातून अनेकांना देण्यास सुरुवात केली. त्यानी प्रथम त्याचा मित्र व मेहुणा कृप ह्याला दिली. तेथून ती तुमच्या कडे पांडवांकडे आली आहे. असा तलवारीच्या विद्येचा प्रवास आहे. त्याची देवता आहे अग्नी व तिचा उगम कृत्तिका नक्षत्रात झाला आहे. त्याचे गोत्र आहे रोहीणी. रुद्र त्याचा गुरू आहे. असाची एकंदर दहा नावे आहेत परंतु, ती सहसा वापरली जात नाहीत. ती अशी आहेत, असी, वैशाषन, खड्ग, दुधारी, तेजस्वीनी, श्रीगर्भ, विजया, सत्यरक्षी, शस्त्रश्रेष्ठी, मद्रवती.

पुरु समजतात कीं, ती प्रथम महादेवांनी वापरली होती म्हणून तिला कांहींजण महादेवी असे सुद्धा म्हणतात. तिच्या निर्मितीत पृथूचा हात आहे जी पृथ्वीची मुख्य देवता आहे. तिच्या मदतीने राजे राज्य करत आले आहेत ज्यांमुळे पृथ्वी संपन्न झाला आहे. तिच्यापासून पाप दूर ठेवण्यात यश मिळाले आहे. असा तलवारीचा इतिहास आहे. सर्व क्षत्रिय तिची पुजा करतात. इतर सगळी आयुध तिच्यातून आली आहेत म्हणून तू समजतोत ते बरोबर आहे.

शांती पर्व भाग एकशे एकसष्ठावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे बासष्ठावा

वैशंपायन म्हणतात, तेवढे सांगितल्या नंतर भिष्म शांत झाले. युधिष्ठीर व त्यांचे बंधू तेथून निघाले. ते समजतात कीं, त्या सगळ्या बौद्धीकाचा निष्कर्ष असा आहे कीं, पुण्य, हित आणि सुख ही त्रिसुत्री आचरणात असली म्हणजे सनातन धर्म सिद्ध झाला. त्यातील पुण्य आत्म्याच्या उद्धारासाठी असते व हित आणि सुख शरीराच्या भल्यासाठी असते. त्यात आपद्धर्माच्या काळात फक्त हित आणि सुख साध्य करावयाचे व परिस्थिती सुधारली, सामान्य झाली कीं, तपस्या करून पुण्य मिळवून त्याची भरपाई करावयाची असते. विदूर सांगतात, कीं, असा आपला सनातन धर्म साधा सोपा आहे.

विदूर पुढे सांगतात, पुण्य भरपाई करण्यासाठी वैराग्य, दानं, मदत करणे, यज्ञ करणे, संयमन, क्षमाशिलता, चांगुलपणा, माणूसकी व भूतदया वाढवणे आणि मंत्रजप असे पुण्य वाढवण्याचे मार्ग असतात. मंत्रजपाचे विशेष असे कीं, एकदा त्याचा उपयोग साधक करू लागला कीं, त्याला ती साधना बंद करता येत नाही. कारण त्यामुळें जे पुण्य त्या मार्गाने त्याने मिळवले ते निघून जाते, अध्यात्मिक उर्जा निघून जाते. जशी स्थीर विद्यूत लुप्त होते तसे अध्यात्मिक उर्जेबाबत होत असते. पुण्याच्या (अध्यात्मिक उर्जेच्या भारामुळे) ऋषी त्यांचे उच्च स्थान धरून असतात. स्वर्गात रहाण्यासाठी सुद्धा त्या पुण्याची आवश्यकता असते. देवांनासुद्धा त्यांची अध्यात्मिक उर्जा त्या योग्येला (देवत्व राखण्यासाठी) धरून ठेवावी लागते. ते करण्यासाठी शरीराची आवश्यकता असते. म्हणून हित ल सुख सुद्धा तितकेच आवश्यक असतात.

वैशंपायन पुढे सांगतात, विदूरांचे ते निवेदन संपल्यावर अर्जून विचारतो, हे जग कर्माचे स्थान आहे. म्हणून कर्म महत्वाचे असते. जगण्यासाठी जे करावे लागते जसे कृषी, व्यापार, पशूपालन, आणि इतर विविध उपक्रम त्यात येतात. त्यात माणसाचे हित असते म्हणून त्यात ते सगळे कर्म येतात. त्यातून संपत्ती आणि सुख सुद्धा प्राप्त होत असते. ते श्रृतीनेसुद्धा मान्य केले आहे. ते साध्य होण्यासाठी तशी कामना असावी लागते. शरीराच्या संवर्धनासाठी संपत्ती असावी लागते. मग तो कोणीही असो. कर्म न करता म्हणजे दानाने

अथवा भीक मागून ते मिळवावे लागते. तुम्ही कितीही मोठे ब्राह्मण असलात तरी संपत्तीशिवाय त्याच्या ज्ञानाला अर्थ नसतो अशी ह्या दुनियेची तर्हा ब्रह्माने केलेली आहे. म्हणून माणसाने संपत्ती मिळवणे हे त्याचे पहिले कर्म असते. असे संपन्न लोक त्यांच्या शत्रूचा नाश सहज करू शकतात त्यांच्या धनाच्या मदतीने असे मला वाटते.

त्यावेळी नकूल आणि सहदेव कांहीं बोलण्याच्या तयारीत होते जसे अर्जुनाने त्याचे मत सांगितले.

वैशंपायन पुढे सांगतात, नकुल व सहदेव बोलतात, त्यांना अर्जुनाचे म्हणणे एकदम मान्य आहे व माणसाने सतत संपत्ती मिळवत राहिले पाहिजे त्यातच त्याचा पुरूषार्थ आहे. परंतु, जर संपत्ती आणि पुण्य असे दोनही एकत्रपणे कमावता येत असेल तर तो दुग्धशर्करा योग असेल. ज्याच्याकडे संपत्ती नाही तो त्याच्या बहुतेक कामना पूर्ण करी शकत नाही. तसेंच ज्याच्याकडे पुण्य नाही त्याच्या कडे संपत्ती जमणार नाही असे समजसे जाते. म्हणून माणसाला दोनही कमवावे लागतात. त्यासाठी माणसाने अशा मार्गांचा उपयोग केला पाहिजे धन मिळवण्यासाठी की, त्यात पाप नाही. ज्याने तसे करता येते ते दोनही मध्ये य़शस्वी होतात. म्हणून प्रथम मनुष्य पुण्यावर लक्ष ठेविल व त्यानंतर हित आणि सुखाचा विचार करील.

वैशंपायन पुढे सांगतात, ते बोलल्यानंतर ते दोघे गप्प बसतात. त्यानंतर भिष्म सांगू लागतात, धन व पुण्य त्याची इच्छा असल्याशिवाय प्राप्त होत नाही. जो निरिश्च आहे त्याला ते प्राप्त होत नाहीत. त्यासाठी इच्छा असणे जरूरीचे असते. ऋषी तशा इच्छेमुळे तपस्या करतात. इतर वेदांतील ज्ञानाच्या अभ्यासात त्याच्या समय खर्च करतात. हे सगळे तशा इच्छेमुळे होत असते. त्यातूनच दान करणे, मदत करणे, आणि कृषी, व्यापार, असे व्यवसाय केले जातात. मनुष्य सगळेच इच्छेमुळे करत असतो. सामान्यता इच्छा नाही असा मनुष्य मिळणे विरळ. म्हणून इच्छा असल्याशिवाय पुण्य व धन दोनही मिळणार नाही. म्हणून प्रथम इच्छा असली पाहिजे. म्हणून तुमच्या प्रश्नाच्या उत्तरादाखल मी असे सांगीन की, इच्छा तुम्हाला असली पाहिजे व तिचे नियंत्रण करता आले पाहिजे. त्यातून धर्म तयार होतो. सर्व इच्छा सुखासाठी असतात म्हणून त्या त्रिसुत्रीत सुखाची जागा इच्छा सुद्धा घेत असते. जो मनुष्य त्या तिघांपैकी फक्त एकाचाच (पुण्य) ध्यास करत

असेल तर तो अपूर्ण असतो. तसेंच फक्त हित आणि सुखाची इच्छा करतो तोसुद्धा अपूर्ण समजावा. कारण केवळ आत्मा अथवा केवळ शरीर ह्यांचा विचार करणे अज्ञानाचे लक्षण समजले आहे. पूर्ण मनुष्य तिघांचा साकल्याने विचार करत असतो. असे बोलून ते पुन्हा शांत होतात. राजा युधिष्ठीर ते सगळे ऐकत होता परंतु, त्याला ते खोटे विचार वाटत असतात म्हणून तो भिष्माना विचारतो, "तुम्ही सगळे आपापले मत सांगत आहेत ते मान्य पण मला ते मान्य नाहीत. आता माझे ऐका, ज्याला इच्छा नाही तो जास्त सुखी असतो कारण सुख त्याला त्याच्या निरिच्छतेतून प्राप्त होत असते. कांहीं मिळाले नाही म्हणून तो दुःखी होत नाही कारण त्याला ते मुळातच नको असते. त्याच्यासाठी सोने व माती समसमान असतात. सगळे प्राणी जन्मतात व मरतात, सगळे सतत बलदत असतात, त्याला जीवनातील विविध त्रासांचा विचार सतत सतावत असतो. तशांत तो त्याचे जीवन जगत असतो. त्यातूनच माणसाला त्या सगळ्या इच्छांपासून दूर रहाण्याची इच्छा होते, जी एकच इच्छा मला मंजूर आहे, त्यातून पुढे तो मोक्षाकडे प्रयाण करत असतो. मनुष्य त्याच्या विविध इच्छांमुळे बांधला जात असतो. सहादोषात काम गणला आहे म्हणजे योग शास्त्राप्रमाणे इच्छा हा दोष आहे मग त्याचे तुम्ही कौतुक कां करता"? कोणीही त्याच्या कल्पनेप्रमाणे वागू शकत नाही. त्याला ज्या बंधनात विधात्याने ह्या जगात पाठवले त्या बंधनात राहूनच तो त्याचे जीवन व्यतीत करत असतो. त्याला आपण दैव असे बोलतो. म्हणून मला वाटते ज्याने पुण्य, हित आणि सुखाचा त्याग केला व त्यानुसार तो जगू लागला तर तो खर्या अर्थाने मोक्ष प्राप्त करत असतो. जे त्यांच्या इच्छा व त्यानुसार कर्म करत असतील तर ते त्यातच अडकून रहातात व कधी मोक्षाचा विचार करू शकणारच नाही.

वैशंपायन पुढे सांगतात, सगळ्यांचे तर्कशुद्ध व पटणारे विचार ऐकल्यावर भिम बोलतो, कीं, युधिष्ठीराचा युक्तीवाद पटल्यामुळे सगळे जमलेले श्रोते त्याच्या विचारांचे स्वागत टाळ्या वाजवून करतात. त्यानंतर ते पुन्हा भिष्माच्या मार्गदर्शनासाठी तयार होतात.

शांती पर्व भाग एकशे बासष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे त्रेसष्ठावा

युधिष्ठीर बोलतो, "चांगला स्नेही कोणत्या गुणांचा इसम होऊ शकतो राजासाठी ते मला तुमच्याकडून ऐकावयाचे आहे. कोणावर मी भरवसा करू शकेन अशा माणसाची लक्षणं कोणती"? मला वाटते, केवळ धनाढ्य अथवा आप्त होणे एवढे पुरेसे नसते. मला तुमचे मत सांगा.

भिष्म बोलतात, "माझे मत सांगतो. कोणाबरोबर तू मैत्री करणे श्रेयस्कर आहे व कोणा बरोबर नाही. लोभी, दुष्ट, आळशी, ज्यांने त्याच्या वर्णाची कामं करणे बंद केले आहे, कपटी, स्त्रीयांबद्दल तुच्छता बाळगणारा, पापाकडे कल असलेला, ज्याच्या चालचुणूक चांगली नसलेला, संशयी स्वभावाचा, ज्याला बोलण्याची पद्धत नाही, व्यसनी, अडचणीत साथ सोडणारा, निर्लज्ज, देव न मानणारा, वेदांचा अपमान करणारा, व्यभिचारी, आपल्या मर्यादा न समजणारा, फसवा फसवी करणारा, शब्द न पाणारा, इतरांच्या भल्याने क्रुद्ध होणारा, मूर्ख, अपमान करून बोलणारा, अतिस्वार्थी, शिघ्र कोपी, भांडखोर असा सदोष मनुष्य मित्र नसावा. अशांबरोबरची दोस्ती नुकसानकारक असते. त्या सारखे दोष नसलेला मित्र असावा.

युधिष्ठीर विचारतो, विश्वासघातकी मित्राची लक्षणं सांगा.

भिष्म सांगतात, मी तुला एक घडलेली गोष्ट सांगतो त्यावरून तू समजून घे, आपल्या उत्तर दिशेवा एक म्लेच्छ राजा राज्य करत होता. तेथे एक ब्राह्मण रहात होता. तो ब्राह्मण जातीने होता, त्याचे ज्ञान वेदाचे कांहीं नव्हते. ते गांव संमृद्ध आहे असे पाहून तो त्या गांवात भीक मागण्यासाठी गेला. त्या गावांत एक चोरसुद्धा रहात होता. त्याच्याकडे खूप पैसा होता. त्याला चारही वर्णाच्या लोकांच्या रिती माहीत होत्या. तरी तो ब्राह्मणांबद्दल सहिष्णू होता. त्याना तो दानं करत असे. त्याच्याच कडे तो दरिद्री ब्राह्मण रहावयाला जातो. तो चोर त्याला एक वर्ष पुरेल इतकी सामुग्री देतो. त्यामुळे तो ब्राह्मण प्रसंन्न होतो. तो ब्राह्मण ज्याचे नांव होते गौतम तेथे मजेत राहू लागतो. तो त्याला दिलेल्या एका दासीच्या कुटूंबाला मदत करत असे. अशारितीने तो ब्राह्मण तेथे बरीच वर्षे रहातो जे

शिकार्यांचे गांव होते. तो त्या चोराकडून धनुर्विद्या आत्मसात करू लागतो. एकदा तो त्या शिकार्यांबरोबर जाऊन बरेच पक्षी मारतो. ते घेऊन येतो. त्या संगतीत तो त्यांच्या सारखा होतो. एकदा त्या गावात आणखीन एक ब्राह्मण येतो. तो भिकार्यासारखा चिंध्या नेसलेला होता. त्याच्या कमरेला हरणाच्या कातड्याचे वस्त्र होते. त्याच्या डोक्यावर जटा होत्या, तो वेदशास्त्र जाणत होता. त्याचे वागणे खर्या ब्राह्मणाला शोभेल असे होते. तो त्या गौतमाचा मित्र होता. तो ब्राह्मण कधी शुद्रांकडून भीक घेत नसे. तो गौतमाचे घर शोधत होता. सगळा गांव तो फिरत होता ते शोधण्यासाठी. अखेरीस त्याला गौतमाचे घर मिळते. त्याच वेळी गौतम शिकारीहून आला होता. ते दोघे भेटतात, गौतमाच्या हातात शस्त्र होती व खाद्यावर मारलेले पक्षी होते. त्याचा मित्र ते त्याचे रुप पहातो व बोलतो, "हा काय मूर्खपणा तू करत आहेस? तू एक ब्राह्मण आहेस, तू शिकारी कसा झालास? तुझे पुर्वज मोठे वेदशास्त्र संपन्न होते. त्यांच्या नावाला तू बट्टा लावला आहेस. तुझ्या वर्णाप्रमाणे तुझ्यात जे गुण असावयाला पाहिजेत ते कोठे गेले"?

ते ऐकल्यावर गौतम त्याला बोलतो कीं, मी एक गरीब मनुष्य आहे. तुला माहित आहे कीं, मी वेद शिकू शकलो नाही. मी आता येथे रहात आहे त्या प्रमाणे माझे जीवन झाले आहे. मला धन हवे होते ते येथे मला मिळत आहे. तुला पाहून मी आनंदी झालो आहे. आज रात्र येथेच राहू व उद्या मी तुझ्याबरोबर दुसरीकडे निघण्यास तयार आहे. त्या पाहूण्या ब्राह्मणास त्याची कींव आली. तो तेथे राहीला पण तेथे असलेल्या अन्नाला शिवला नाही.

शांती पर्व भाग एकशे त्रेसष्ठावा संपला.

# शांती पर्व
## भाग एकशे चौसष्ठावा

भिष्म सांगत असतात, तो ब्राह्मण अतिथी गेल्यावर गौतम त्याच्या घरातून निघतो व समुद्राकडे जाऊ लागतो. तेथे तो कांहीं व्यापारी पहातो जे परदेशात व्यापार करण्यासाठी जात होते. त्यांच्या बरोबर तोसुद्धा सफरीला निघतो. ते जात असतांना एका दरीतून  जात असतांना एक जंगली हत्ती त्याच्यावर हल्ला करतो. त्यात सगळे प्रवासी मारले जातात. गौतम तेथून पळून जातो. तो उत्तरेकडे जातो. त्याला कोठे जावयाचे ते समजत नव्हते. तो एका जंगलात पोहोचतो. असा जात असतांना तो एका सुंदर वनात येतो जेथे आंब्याची झाडं होती. ते वन नंदनवनासारखे होते. तेथे यक्षांची वस्ती होती. तेथे साल आणि ताड वृक्ष होते. चंदनाची मोठी झाडं होती. ते एक पठार होते. तेथे विविध प्रकारचे पक्षी रहात होते. त्यांच्या ओरडण्याने तेथील वातावरण प्रसन्न झाले होते. गौतम त्या जंगलातून जात होता. त्यीला तेथे एक सोनेरी वाळू असलेला प्रदश दिसतो. तेथे वटवृक्ष दाटीवाटीने होते. ते पाहून तो ब्राह्मण फार खूष झाला. तेथे तो विश्रांतीसाठी थांबतो. तेथे वार्याबरोबर फुलांचे सुगंध दरवळत होते. त्यासुमारास सूर्य अस्ताला जात होता, त्यावेळी पक्षी त्यांच्या घरट्यांकडे परतत होते मोठ्या झुंडीने. ते दृष्य मोठे विलोभनीय होते. तेथे तो झोपला केव्हां ते त्याला समजले नाही. त्या पक्षांत एक होता नदीजंघ तो ब्रह्माचा मित्र होता. तो काश्यपांचा मुलगा होता. त्याला राजधर्म म्हणून सुद्धा ओळखत होते. तो आकाराने खूप मोठा होता व फार सुंदर होता. त्याला पाहून गौतमाला आश्चर्य वाटले. त्याला मारून खाण्याचे विचार त्याच्या मनात येत होते कारण तो पक्षी मारूनच खात असे. परंतु, राजधर्म त्याचे प्रेमपूर्वकपणे स्वागत करतो. त्याला सांगतो कीं, तो आज रात्री तेथे राहू शकतो व उद्या तो जाऊ शकतो.

शांती पर्व भाग एकशे चौसष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे पासष्ठावा

भिष्म सांगतात, राजधर्म त्याला सांगतो कीं, तो ऋषी काश्यपाचा मुलगा आहे. त्याची आई दक्षाची कन्या आहे. आज तुम्ही माझे अतिथी म्हणून रहावे आपण ब्राह्मण अहात. मला फार संतोष होईल. राजधर्म त्याच्यासाठी गंगेच्या पाण्यातील मांसे आणून देतो व अग्नीसुद्धा देतो त्याच्यावर गौतम ते मांसे भाजून खातो. त्यानंतर राजधर्म त्याला त्याची माहिती विचारतो, गौतम तेथे रहाण्याचे ठरवतो व सांगू लागतो, मी एक गरीब ब्राह्मण आहे व आसर्यासाठी व धनाच्या आशेने फिरत आहे. ते ऐकून तो काष्यपाचा मुलगा आनदाने त्याला सांगतो कीं, तो त्याची मदत करू शकतो. मी तुझा आता मित्र झालो आहे तेव्हां मी तुला मत करणार आहे. ती रात्र संपल्यावर दुसर्या दिवशी राजधरम त्याला सांगतो कीं, त्याचा एक राक्षस मित्र आहे तो राजा आहे व उद्या तो ब्राह्मणांना दानं देणार आहे तेथे तू जा तुला पाहिजे तेवढे सोने राजा देईल. ते घेऊन तू तुझ्या देशाला निघून जा. तो पुढे सांगतो कीं, त्याचा मात्र राजा राक्षस कुळातील आहे व त्याचे नांव विरुपाक्ष आहे. ते ऐकल्यावर गौतम मोठ्या आनंदाने विरुपाक्षाकडे निघतो. त्याच्या राज्याच नांव होते, मेरूव्रज. राजा विरुपाक्षाला त्याची खबर होते. राजाचे सैनिक त्याला राज्यात घेतात. त्यावेळी कित्येक ब्राह्मण तेथे दानं घेण्यासाठी येत होते. ते सगळे मोठे वेदशास्त्र संपन्न होते. त्यांच्या मुखावर ब्रह्म तेज होते. तसे तेज गौतमाच्या मुखावर नव्हते. त्या राज्याची संपन्नता पाहून तो नवल करत होता व मनातल्या मनात खूष झाला होता. तो राजाच्या सेवकांबरोबर त्या महालात जातो.

शांती पर्व भाग एकशे पासष्ठावा संपला.

## शांती पर्व

## भाग एकशे सहासष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, गौतम एका प्रशस्थ दालनात आणला जातो. त्याची ओळख राक्षस राजाशी केली जाते. ते वैभव पाहून गौतम नवल करत असतो. राजा त्याला त्याची माहिती विचारतो. त्याचा वेदाचा अभ्यास वगैरे बाबींची चौकशी करतो. त्याच्या ब्रह्मचर्याबद्दल सुद्धा विचारतो. गौतम त्याचे नांव सांगतो व गप्प होतो. त्यानंतर राजाला समजते कीं, तो एक दरिद्री ब्राह्मण आहे ज्याला वेदाचा अभ्यास सुद्धा नाही. राजा त्याचा रहाण्याच्या जागेबद्दल विचारतो. तो बोलतो की गौतम सगळे खरे सांगेल. गौतम सांगू लागतो, कीं, तो मध्यदेशाचा रहिवाशी आहे व धनाच्या भिक्षेसाठी फिरत आहे. तो पुढे सांगतो, कीं, तो एका शिकार्यांच्या गावात रहात होता व तेथे त्याने एका शुद्र विधवा स्त्रीबरोबर पाट लावला होता व त्याला तिच्यापासून मुलं झाली आहेत आणि उपजिविकेसाठी तो शिकार करत असे. ते सगळे खरे आहे असे तो शेवटी सांगतो.

भिष्म पुढे सांगतात, राजा विचार करतो की ह्याला दान करणे पाप होईल कारण तो ब्राह्मण जातीचा असला तरी शुद्र झाला आहे. तरी तो राजधर्माचा विचार करतो. त्याला राजधर्माची नाराजी नको असते म्हणून तो शेवटी सांगतो कीं, तो गौतमाला इतर ब्राह्मणां बरोबर सोन्याचे दान करण्यास तयार आहे. त्या कार्तिक महिन्याच्या दिवशी शेकडो विद्वान ब्राह्मण तेथे जमलेले असतात व त्यांना सोन्याचे मोठ्या प्रमाणात दान होत असते. त्यामध्ये गौतमाला सुद्धा सोन्याचे दान दिले जाते. त्यातील कांही विश्वदेव बनतात. तो मान त्यांना दिला जातो. त्यांना सोन्याच्या ताटांतून जेवण दिले जाते. तसे दर वर्षी दिले जात होते. साजूक तुपात व मधात बनवलेले जेवण ते खात होते. त्यात गौतमसुद्धा खात होता. ब्राह्मणांना भरभरून सोने, चांदी, रत्न, हिरे माणके असे जडभारी दान केले गेले होते. त्यात गौतमाने भरपूर सोने उचलले होते जे त्याला पेलत नव्हते. राक्षस राजा गौतमाला बोलतो तू ज्या ताटात जेवलास ते ताटसुद्धा घेऊन जा. त्याप्रमाणे ते ब्राह्मण त्यांची दक्षिणा घेऊन त्यांच्या देशाला पसार झाले. गौतम त्याचे दान घेऊन राजधर्माच्या वृक्षाकडे जातो. तो भार घेऊन आल्याने तो थकला होता. राजधर्म त्याच्या अतिथीची

सेवा करत होता. आपल्या पंखाने तो त्याला वारा घालत होता. त्याची माशांच्या जेवणाची तो व्यवस्था करतो. निमकहराम गौतम वेगळाच विचार करत होता. मी लोभाने जडभारी सोने उचलले आहे ते माझ्या शिकार्यांच्या गावाला कसे घेऊन जाणार त्याचा तो विचार करत होता. तेथवर जाण्यासाठी मला खाणे कसे मिळणार ह्याचा त्याला प्रश्न पडला होता. त्याच्या मनात पाप निपजले. तो ठरवतो कीं, तो राजधर्मालाच मारून त्याचे मांस शिजवून भाजून तयार करून घेईल जे तो प्रवासात खाईल. राजधर्म त्याच्या बाजूला निजत होता त्याला मारण्याचे तो ठरवतो. त्याप्रमाणे राजधर्म झोपल्यावर गौतम त्याला मारतो, त्याची शिकार करण्याची सवय त्याला कामी येते.
शांती पर्व भाग एकशे सहासष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे सदुसष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, त्या वडाच्या झाडाखाली एक शेकोटी राजधर्माने पेटवलेली होती. त्याच्या उबेत तो निजला होता. तो अग्नी गौतम वापरून राजधर्माचा बळी घेतो. त्याला सोलतो, त्याची हाड तेथेच टाकतो व मांस भाजतो व बांधून घेतो. त्या कामाचा त्याला चांगलाच अनुभव होता. ते व सोने घेऊन तो रात्रीच प्रवासास, त्याच शेकोटीतून एक मशाल करून ती घेऊन, तो निघतो. त्याला फार आनंद झालेला असतो. राजधर्माला मारल्याचे त्याला कांहींच वाटत नसते. दुसर्या दिवशी विरुपाक्ष त्याच्या मित्राची वाट पहात असतो त्याच्या वाड्याच्या आगाशीवर जसे ते दररोज भेटत होते. पण त्याचा मित्र राजधर्म येत नाही. राजाला गौतमाचा संशय येतो व तो त्याचे सेवक राजधर्माच्या झाडाकडे पाठवतो. तेथे ते पहातात कीं. राजधर्माची पिसं सगळीकडे पडली आहेत व फक्त हाड आहेत आणि गौतमाचा कोठे पत्ता नाही. ती वार्ता राजाकडे जाते. राजा त्याचे दूत व सैनिक गौतमाच्या मागावर धाडतो. गौतमाला ते पकडतात. त्याला घेऊन ते त्यांच्या राज्यात मेरूव्रजकडे निघतात. सगळे राज्य फार दुःखात जाते. आता ह्या नीचाचे काय करावे ते ठरवतात. त्याला खाण्याचे ठरवतात पण आपल्या मित्राला मारणार्याचे मांस खाण्यास राक्षस तयार नव्हते. ते ठरवतात की, त्याला शिकार्यांच्या ताब्यात देऊ. ते ठरवल्यानंतर ते गौतमाचे तुकडे करतात व चोरांना (शिकार्यांना) देतात खाण्यासाठी. चोराना समजते कीं ते मांस एका निमकहराम्याचे आहे तेव्हां तेसुद्धा ते खाण्याचे नाकारतात. ते सांगतात कीं, निमकहराम्याचे मांस ते खात नाहीत. ते जाळून टाकावे असे ठरते किंवा, ते कुजत ठेवावे कारण ते जंतू पापकारक असतात ते त्याला खाऊ शकतील.

शांती पर्व भाग एकशे सदुसष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे अडूसष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, राक्षस राजा त्याच्या मित्राची चीता तयार करतो व त्याला रितसर अग्नीसंस्कार करण्याची तयारी करतो. त्याचे शव मौल्यवान रत्नाने तो सजवतो. त्याला अग्नी देणार तेवढ्यात आकाशातून सुरभी तिच्या आचळांतून अमृत धारा राजधर्माच्या कलेवरावर टाकू लागते. त्याबरोबर राजधर्म त्यातून उठून उभा रहातो. ते होत असतांना स्वर्गाचा राजा इंद्र स्वता तेथे येतो. तो विरुपाक्षाला सांगतो बरे झाले वेळीच सुरभीने त्याला जीवंत केले. तो विरुपाक्षाला एक जुनी गोष्ट सांगतो एका शापाची, जो राजधर्माला मिळाला होता. राजधर्म ब्रह्माच्या सेवेत असावयाचा पण एकदा तो गैरहजर होता म्हणून त्याला देवांनी शाप दिला होता. त्या शापामुळे जरी त्याला गौतमांने मारले होते त्याला स्वर्गात जाता येणार नव्हते म्हणून सुरभी त्याला पुन्हा जीवंत करण्यासाठी आली होती. राजधर्म इंद्राला विनंती करतो कीं, जर माझ्यावर कांहीं कृपा आपल्याला करावयाची असेल तर ह्या ब्राह्मणाला जीवंत करावे. ते ऐकल्यावर इंद्र थोडे अमृत गौतमाच्या खांडोळी केलेल्या शरीराच्या भागांवर शिंपतो. त्यातून गौतम पुन्हा जागा होतो. त्यानंतर राजधर्म त्याला त्याच्या घरी ते सोने घेऊन जाण्यास सांगतो. राजधर्म दुसर्या दिवशी ब्रह्माकडे जातो. त्याचा शाप संपला होता. तेथे गौतम त्याच्या शुद्र बायकोबरोबर राहतो व पुष्कळ शुद्र मुलांना जन्माला घालत असतो. तो मृत्यूनंतर नरकात कित्येक वर्षे खितपत पडणार होता. भिष्म सांगतात कीं त्यांना हि कथा नारदांनी सांगितली होती ज्यात कसा मित्र नसावा त्याचे एक उदाहरण होते. विश्वसघातक्यावर कधी भरोसा करावयाचा नसतो असे त्याचे तात्पर्य होते. विश्वासघात करणारा नरकात जातो हा त्याचा आणखीन एक अर्थ होता. चांगला मित्र कसा अगदी हरामखोर मित्राला सुद्धा मदत करत असतो तेसुद्धा त्यात दाखवले आहे, ह्यातून मी तुम्हाला कसा मित्र नसावा व कसा असावा हे दोनही ह्या कथेतून दाखवले आहे, भिष्म सांगतात. वैशंपायन पुढे सांगतात, भिष्माचे ते ऐकल्यावर पांडव समाधानी होतात.

शांती पर्व भाग एकशे अडूसष्ठावा संपला.

# शांती पर्व

## भाग एकशे एकोणसत्तरावा

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा पितामहा, जगाच्या सुरूवातीला पुण्य होते त्यानंतर ब्रह्माच्या मानसकन्यांच्या अपत्यांतून पाप करणारे दैत्य, दानव, असूर, राक्षस असे अनेक उत्पन्न झाले ही पापाची निर्मिती होण्याची काय आवश्यकता होती? जे होते सुरूवातीला तेंच योग्य असतांना ही गुंतागुंत उत्पन्न कां केली ब्रह्माने"?

भिष्म सांगतात, जे मला समजले ते सांगतो. अघमर्शन ऋषींनी ते त्यांचा शिष्य गुणी ह्याला सांगितले होते. ते असे, स्वयंभूने इच्छा केली व म्हणून हा संसार सुरू झाला. स्वयंभूचे खरे स्वरुप आहे अध्यात्मिक उर्जा. हि प्राथमिक उर्जा आहे. त्याआधी कांहीं नव्हते. स्वयंभूने प्रथम आकाश उत्पन्न केले त्याच्या विचारातून व त्यात तो अध्यात्म स्वरुप स्वयंभू पसरला. परंतु, ते होतांना सगळ्या भागात ती उर्जा समान पसरली नाही. कांहीं ठिकाणी जास्त व कांहीं ठिकाणी कमी अशी ती पसरली. त्यामुळे त्या मूळभूत उर्जेचा प्रवास जास्त कडून कमी कडे होणे आवश्यक होते ज्याने ती सगळीकडे सारखी पसरेल. त्यासाठी जास्त भागाला पुण्य प्रदेश अथवा तीर्थक्षेत्र आणि कमी भागांना पापक्षेत्र असे समजले जाऊ लागले. ते पापाच्या उत्पत्तीचे कारण आहे. ज्याप्रमाणे पुण्याची अभिव्यक्ती चराचरांच्या अस्तित्वाने साध्य झाली तशी पापाची होणे शक्य नव्हते म्हणून ब्रह्माने त्याच्या कन्यांच्या द्वारा अनेक पापकारक शक्तीस्थानं तयार केली त्यातून दैत्य, दानव, राक्षस आणि असूर असे उत्पन्न झाले ज्यांचे कार्य पुण्याचा र्हास करणे एकढेच होते. म्हणजे ती सारखी पसरेल. ते कार्य अजून पुरे झालेले नाही व जोवर ते पूर्ण होत नाही तोवर हा पाप व पुण्याचा खेळ असांच चालू असेल.

भिष्म पुढे सांगतात, ह्या जगाचे तीन भाग तयार झाले, त्यांना स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ अशी नांव आहेत. त्यातील स्वर्ग व पाताळ हे अदृष्य आहेत माणसाला त्याच्या चर्मचक्षूना ते दिसत नाहीत. पृथ्वी मात्र दृष्य असते. स्वर्गात पुण्यवंत असतात व पाताळात पापवंत असतात आणि मनुष्य पृथ्वीवर असतात. स्वर्गाचे अनेक लोक आहेत व त्यात पुण्यवंत त्यांच्या पुण्याच्या शक्तीनुसार ते रहात असतात. पाताळात पापवंत रहातात. त्याचेसुद्धा

अनेक लोक आहेत. गुणी अघमर्शन ऋषीला विचारतो, आकाशात ते तीन नेमके कोठे असतात. तेव्हां अघमर्शन सांगतात की, आकाशात ते एकाच जागी असतात पण कारण ते अदृष्य आहेत मनुष्य ते पाहू शकत नाही. गुणी विचारतो, पाप व पुण्य ह्यांच्या इतर कोणत्या अभिव्यक्ती आपण सांगू शकाल त्या मला सांगा. अघमर्शन सांगतात की, सृष्टीच्या सगळ्या गोष्टी ज्या तीन गुणात विभागलेल्या आहेत ते सत्त्व, रज आणि तम हे गुण पाप पुण्याच्या कमी जास्त होण्यामुळे असतात. जेथे अध्यात्मिक उर्जा उच्चतेची असते ते सात्त्विक समजले जाते व ते अधिकाधिक सात्त्विक होत जाऊ शकते. त्यात कमी होत गेली कीं, त्यातून प्रथम रजोगुण व्यक्त होत असतो व त्यात क्रमाक्रमाने कमी होत गेली कीं, एका अवस्थेला आपण तमो अवस्था असे सांगत असतो. त्याही पेक्षा कमी झाल्याने अखेरी, ते पूर्ण पापमय होते तेव्हां त्याला असुरीसंपदा असे समजले जात असते. अध्यात्मिक उर्जेचे गणिती मुल्यमापन म्हणजे आकड्यात करता येत नाही. म्हणून कमी व जास्त अशा संज्ञा वापरावयाच्या असतात. गुणी त्याच्या गुरूला अघमर्शन ऋषींना विचारतो, मला सांगा, अहो गुरूवर्य, मनुष्याने पुण्य का कमावत रहावयाचे असते ते सांगा. तो पाप करत राहीला तर काय बिघडते ते सुद्धा सांगा.

अघमर्शन सांगतात, सृष्टीतील चराचराचे विभाजन त्याप्रमाणे करण्यात आले आहे त्याची माहिती मी तुला सांगतो. मनुष्य पुण्यकारक प्राणी अशी विधात्याची रचना असल्यांमुळे त्याने पुण्य कमवावयाचे असते तरच त्याची मुक्ती होऊ शकते. तो पाप करत राहीला तर त्याची मुक्ती होत नाही. सर्वच मोठे प्राणी त्यात सगळे पशू, पक्षी आणि मासे येतात ते पुण्यकारक सांगितले आहेत. त्याउलट सगळे सुक्ष्म जीव जे रोगराई उत्पन्न करतात ते, कुजवणारे, सडवणारे, दुर्गंध पसरवणारे असे जीव पापकारक समजले जातात. आपल्याला रोग होतात त्याच्या मागे असे पापकारक जीव असतात. म्हणून असें सांगतात कीं, पाप करणारा त्याचा पुढील जन्म किड्या मुंगीत घेईल ते बर्याच अंशी सत्य असते.

गुणी विचारतो, अहो गुरूवर्य मला सांगा जर सगळे मोठे प्राणी पुण्यकारक असे सांगितले आहे तर ते सगळे मोक्षापर्यंत जाऊ शकतात कां?

अघमर्शन सांगतात, सगळे मोठे प्राणी कृत युगात मोक्षाला जाऊ शकत होते. त्यानंतर पापाचे प्रमाणे वाढले व त्रेता युगात मनुष्य, वानर आणि सुग्रीव (अस्वलं) मोक्षाकडे जाऊ

शकत होते. त्यापुढे जसे पापाचे प्रमाण आणखीन वाढेल तसे द्वापार युगात फक्त मनुष्य मोक्षाला जाऊ शकेल. त्याही पुढे कलीयुगात जे पापाचे युग समजले जाते, मनुष्यातील फक्त सात्त्विक माणसेच मोक्षाकडे जाऊ शकतील. त्या प्रमाणे कलीयुगात कित्येक मोठे प्राणीसुद्धा पापमय जीवन जगत असतील कारण पुण्याचे प्रमाण पृथ्वीवर फार कमी झालेले असेल.

गुणी विचारतो, मला सांगा, वेद कोणी व कां सांगितले"?

अघमर्शन सांगतात, वेद ब्रह्माने उत्पन्न केलेल्या अनेक ऋषींनी गाईले आहे. त्याचे कारण सांगतो, जसे कृतयुगात पापाचे प्रमाण वाढू लागले व कर्माने पुण्य मिळवणे सोपे राहीले नाही तसे ब्रह्माच्या आज्ञेने ते ऋषी कांहीं मंत्र रचू लागले ज्याच्या जपाने व सात्त्विक जीवन जगण्याने पुण्य कमावणे म्हणजे अध्यात्मिक उर्जा वाढवण्याचे काम होत असते. कारण ते मंत्र कांहीं देवतांना प्रसंन्न करण्यात साधकाला मदत करत असतात. त्या देवता अध्यात्मिक उर्जा वाढवण्याचे काम करत असतात. अशारितीने जपाच्या माध्यमाने मनुष्य त्याचे पुण्य वाढवू शकत होता व तोंच उद्देश आहे वेदांचा. ते मंत्र ऋचा आणि साम ह्या रुपात आहेत. वेदांच्या शब्दांचे अर्थ काढण्याचे व्यर्थ प्रयत्न करू नये कारण ते सामान्य काव्य नाही. तसेंच त्या शब्दांचे उद्देश त्या देवतांप्रती असतात. म्हणून अज्ञानी लोकांना वेद समजत नाहीत. परंतु, पुढे ते जपण्याची परंपरा विसरली गेली. तेव्हां कांहीं ऋषी जसें याज्ञवलक्य झाले त्यांनी यजू सांगण्यास सुरूवात केली जे सामांच्या पेक्षा वेगळे होते. त्यातून यजूर्वेद आला. त्याच्या मदतीने यज्ञ करणे सोपे झाले. तरी ब्राह्मणांच्या शंका कमी होत नव्हत्या. त्यांचे समाधान करण्यासाठी ऋषी अंगिरसाने अथर्ववेद रचला त्यातून सगळ्या वास्तविक जगाचे ज्ञान सांगण्याचा प्रयत्न पुन्हा तशांच प्रकारच्या मंत्राने झाला. अशारितीने माणसाच्या उद्धारासाठी ब्रह्माने चार वेद दिले आहेत. यज्ञ करतांना त्या विविध देवतांना आळवणी केली जात असते त्या ऋचा व सामांच्या गायनाने, ज्याचे अर्थ फक्त त्या देवता समजता व जर सर्व कांहीं योग्य असेल तर त्या देवतां यजमानावर प्रसन्न होतात. त्यांची रचना करण्यासाठी अधिक मार्गदर्शन व्हावे म्हणून स्कंधाने व क्षुपाने पुढे आगम शास्त्र तयार केले ज्याच्या मदतीने ऋद्विक, पुरोहित इत्यादी, कर्मकांड उत्तम प्रकारे करू शकतात. सनातन परंपरेत कर्मकांडाचे महत्व अनन्यसाधारण आहे. माणसाला त्याचे

पुण्य वाढवण्याच्या कामात ज्या देवतां मदत करण्यासाठी नेमलेल्या आहेत त्या प्रसन्न करण्यासाठी कर्म कांडाचा उदय झाला. एवढे सांगून ऋषी अघमर्शन शांत झाले.

तेवढ्याने समाधान न झालेले युधिष्ठीर भिष्माला विचारतात, देवतांमध्ये अनेक प्रकार आहेत त्यांची माहिती मला सांगा,

भिष्म सांगतात, देवतांचे प्रामुख्याने तीन प्रकार सांगितले आहेत. पुण्यकारक देवता, पापकारक अथवा अघोरी देवता आणि पितर देवता अर्थात् पिशाच्च देवता. ब्रह्माने ज्या ऋषींच्या मदतीने माणसाला मत करण्यासाठी देवता उत्पन्न केल्या त्या पुण्यकारक देवता आहेत व त्यांची संख्या खूप आहे. आगम शास्त्रात ज्या दिल्या आहेत त्या देवता बहुधा पापकारक असतात. त्याच्या साधनेचे नियम अघोर योगविद्येत आहेत. त्याच प्रमाणे पितर देवता आहेत त्या मेलेल्या माणसांच्या विशाच्चांतून तयार झाल्या आहेत. ब्रह्माच्या कृपेने उत्पन्न झालेल्या देवता नित्य असतात म्हणजे त्या युगाच्या अंतापर्यंत कार्यरत असतात. पापकारक देवता तशा नित्य नसतात. त्यांना निश्चित समयाच्या मर्यादा असतात. तसेंच पिशाच्च देवता ज्याना आपण सामान्य भाषेत भुत प्रेत म्हणून बोलतो त्यांच्या काल मर्यादा फार कमी असते त्यानंतर त्या पुन्हा जन्म घेऊन येत असतात. वेदांत पुण्य देवतांच्या सिद्धतेचे मार्गदर्शन दिले आहे. त्यांच प्रमाणे आगम शास्त्रात पापकारक देवतांचे व पुण्यकारक देवतांच्या सिद्धतेचे मार्गदर्शन आहे. पिशाच्च देवतांच्या कडून काम करण्यासाठी त्यांना श्राद्धविधीच्या मदतीने प्रसन्न करणे सोपे असते. त्याची माहीतीसुद्धा आगम शस्त्रात आहे. देवता विज्ञान हा कर्मकांडाचा गाभा असतो. एवढे सांगून ते गप्प झाले. सगळ्या देवता अदृष्य जगात असतात, त्यांचे लक्ष असते दृष्य जागावर व त्यातील ज्या ब्रह्माने नियुक्त केलेल्या असतात त्या जगरहाटीचे नियंत्रण करत असतात. युधिष्ठीर त्या स्पष्टीकरणाने समाधानी होतो.

- शांती पर्व भाग चौथा संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,